सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर मंगळवार, दि. २७ मे २०२५ वर्ष - तिसरे अंक ५५ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## मार्च २६ पर्यंत देशातुन नक्षलवाद संपविणार : अमित शहा




**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि.२६ मे-**

ऑपरेशन सिंदूर बरोबरच ऑपरेशन ब्लॅक फारेस्ट सुरु असून, या ऑपरेशन अंतर्गत ३६ नक्षलवाद्यांना ठार करण्यात आले आहे. अनेक नक्षलवादी शरण आले आहेत तर अनेकांना अटक करण्यात आली असून, ३१ मार्च २०२६ पर्यंत देशातून नक्षलवाद समाप्त करणार असे आश्वासन गृहमंत्री अमित शहा यांनी दिले.

शहरातील नविन मोंढा येथे भारतीय जनता पार्टीच्या वतीने शंखनाद जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. या सभेस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपाचे कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, खासदार अशोक चव्हाण, खासदार अजित गोपछडे, पालकमंत्री अतुल सावे, आमदार पंकजाताई मुंढे, आमदार मेघना बोर्डीकर, भाजपा नेते रावसाहेब दानवे आदीसह अनेकांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हणाले की, २२ एप्रिल रोजी पहलगाम येथे यात्रेकरुंना त्यांचा धर्म विचारुन त्यांची हत्या करण्यात आली. परंतु हे कृत्य करण्यापूर्वी पाकिस्तान विसरले होते की भारतात कॉंग्रेसचे नसून भाजपाचे सरकार आहे. या हल्ल्याचा भारताने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून बदला घेतला. या ऑपरेशनमध्ये शेकडो आतंकवादी, आतंकवाद्यांचे अड्डे उध्दवस्त करण्यात आले. ऑपरेशन सिंदूरने जगाला दाखवून दिले असून, गोळीचे उत्तर गोळ्याने देण्यात येईल, असा इशारा पंतप्रधान मंत्र्यांनी दिला आहे. दि.७ मे रोजी ऑपरेशन सिंदूर अंतर्गत नऊ आतंकवादी ठिकाणी २२ मिनिटांत नष्ट करण्यात आली. ८ मे रोजी पाकिस्तानी ड्रोन मिसाईल हवेतच समाप्त करण्यात आले. तर ९ मे रोजी पाकिस्तानची डिफेन्स उदध्वस्त करत सिंदूर स्वस्त नसल्याचे दाखवून देण्यात आले. नविन भारत हा विकसित होण्याबरोबरच बलाढ्य आणि शक्तीमान होणार असून, यापुढे भारताकडे कुणीही वाकड्या नजरेने पाहणार नाही. ऑपरेशन सिंदूर बरोबरच पंतप्रधान मंत्री मोदी यांनी सिंधू जल करार रद्द केला आहे. पुढच्या पिढ्या लक्षात ठेवतील असे उत्तर भारताने दिले आहे.

मराठवाड्यात दुष्काळ भागात पाणी मिळावे यासाठी २०१९ मध्ये चाळीस हजार कोटी खर्च करुन वॉटर ग्रीड योजना राबविण्यात आली. परंतु तत्कालीन सरकारने हि योजना बंद पाडली. परंतु आगामी काळात ११ प्रमुख प्रकल्पांना सोडून प्रत्येक गावात पाणी पोहंचविण्याचा प्रयत्न महाराष्ट्र सरकार करणार आहे. अनेक वर्ष केंद्रीय मंत्रिमंडळात असताना मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याचे राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांना जमले नाही. परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मराठी भाषाला अभिजात दर्जा मिळवून दिला. आगामी निवडणुकीच्या माध्यमातून देखील भारतीय जनता पार्टी देशात नंबर एक राहणार असून, विकसित भारतात महाराष्ट्राचे योगदान मोठे राहणार आहे. विकसित महाराष्ट्रानानंतरच विकसित भारत होणार असल्याचे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यावेळी म्हणाले.

यावेळी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आगामी काळात व्हाट्सअप वरून ५०० सेवा देण्यात येणार असल्याचे सांगितले. नदीजोड प्रकल्प हातात घेऊन मराठवाडा दुष्काळ मुक्त करायचा असुन महाराष्ट्राच्या काना कोपऱ्यात पाणी पोहोचवणार असा विश्वास देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. नांदेड जिल्ह्यातील बाभळी, उनकेश्वर तर आता लेंडभ प्रकल्प देखील पूर्ण होणार आहे. जालना -नांदेड समृद्धी महामार्ग तसेच वर्धा-यवतमाळ-नांदेड हा रेल्वे मार्ग देखील होणार असल्याचे आश्वासन यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

या सभेत खा. अशोक चव्हाण, कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनीही मनोगत व्यक्त केलले. सभेस हजारोंच्या सख्येने जनसमुदाय उपस्थित होता.

## माजी आमदार आर. टी. (जीजा) देशमुख यांचे भीषण अपघातात निधन

### राजकीय वर्तुळात शोककळा; औसा रोडवर हृदयद्रावक घटना; तपास सुरू

बीड (त भा वृत्तसेवा)

माजलगाव मतदारसंघाचे माजी आमदार आणि जनमानसात 'जीजा' या नावाने लोकप्रिय असलेले आदरणीय आर. टी. जीजा देशमुख (वय अंदाजे ७०) यांचे बेलकुंड, ता. औसा, जि. लातूर जवळ भीषण अपघातात निधन झाले आहे. या हृदयद्रावक घटनेने बीड आणि लातूर जिल्ह्यासह संपूर्ण माजलगाव मतदारसंघात शोककळा पसरली असून, राजकीय वर्तुळातून तीव्र दुःख व्यक्त केले जात आहे.



मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, देशमुख हे आपल्या गाडीने (गाडी क्रमांक एमएच ४४ एडी २७९७) प्रवास करत असताना बेलकुंड गावाजवळ औसा रोडवर त्यांच्या गाडीला आज दिनांक २६ मे रोजी दुपारी भीषण अपघात झाला. अपघाताची तीव्रता इतकी होती की, गाडीचे मोठे नुकसान झाले असून, देशमुख यांना वाचवण्याची संधीच मिळाली नाही. या अपघातात त्यांचा जागीच मृत्यू झाल्याचे सांगण्यात येत आहे.

अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. समोरून येणाऱ्या वाहनाशी धडक झाली की, गाडीवरील नियंत्रण सुटले, याबाबत तपास सुरू आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पंचनामा करून देशमुख यांचा मृतदेह पुढील कार्यवाहीसाठी रुग्णालयात हलवण्यात आला आहे.

आर. टी. जीजा देशमुख हे माजलगाव मतदारसंघाचे माजी आमदार होते. त्यांनी आपल्या आमदारकीच्या काळात मतदारसंघाच्या विकासासाठी मोठे योगदान दिले होते. सर्वसामान्यांशी त्यांचे थेट आणि जिव्हाळ्याचे संबंध होते. जनतेच्या सुख-दुःखात ते नेहमीच सहभागी होत असत, त्यामुळे 'जीजा' या नावाने ते जनमानसात प्रिय होते. त्यांच्या निधनाने माजलगावची मोठी हानी झाली असून, एक तळमळीचा आणि जनतेच्या हितासाठी झटणारा नेता हरपल्याची भावना सर्वसामान्यांमध्ये व्यक्त होत आहे.

त्यांच्या निधनाची बातमी पसरताच अनेक राजकीय नेते, कार्यकर्ते आणि हजारो समर्थकांनी तीव्र शोक व्यक्त केला आहे. देशमुख यांच्या आकस्मिक निधनाने जिल्ह्याच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

## स्वस्त सोन्याचे आमिष दाखवून चार लाखाचा गंडा

शेवगाव ( प्रतिनिधी )-ओळखीचा फायदा घेत स्वस्तात सोने देतो असे सांगून येथील शिवसेनेच्या नेत्या व त्यांच्या पतीने मुंबई येथील रिलायन्स कॉर्पोरेटच्या मॅनेजरला चार लाख रुपयांचा गंडा घातल्याचा प्रकार शेवगावी घडला आहे.या प्रकरणी शेवगाव पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महिन्याभरापूर्वी शिवसेनेत प्रवेश केलेल्या नेत्या, विद्याताई जावेद गाडेकर व त्यांचे पती जावेद यासीन पठाण ( रा.शेवगाव ) यांच्या विरोधात शेवगाव पोलीस ठाण्यात रिलायन्स कॉर्पोरेटचे मॅनेजर अतुल नामदेव अटकळे, ( वय ३७ रा.जुना ठाणे शहर ) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून फसवणूक,मारहाण,धमकी व सामूहिक सहभाग अशा विविध कलमा अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.फिर्यादीत म्हटले आहे की, दि.२३ डिसेंबर २०२० रोजी जावेद यासीन पठाण याने अटकळे यांना त्याचे राहते घरी विद्यानगर येथे बोलावून घेतले. त्यावेळी त्याची पत्नी विद्या या देखील घरीच होत्या.यावेळी घरात असलेली चैतन्य कानिफनाथ मढी यांच्या गादीचे दर्शन घेण्यास सांगितले. आणि त्यांचे घरात असलेले सोन्याचे दागिने दाखविले. त्यावेळी जावेद पठाण अटकळे यांना म्हणाला की, त्याचा सोने विक्रीचा व्यवसाय आहे.मोठ्या प्रमाणात सोने खरेदी करतो. सोने खरेदी विक्रीचा व्यवसाय असल्याने इतरांना कमी दरात शुद्ध सोने विक्री करुन त्याचा फायदा करुन दिलेला आहे.जास्तीत जास्त पैशाची गुंतवणुक केली तर कमी दरात सोने देईन, असे आश्वासन दिले.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून दोन दिवसीय गुजरात दौऱ्यावर

### गुजरातच्या शहरी विकासाच्या २० वर्षांच्या यशोगाथेचा गौरव सोहळा

नवी दिल्ली : पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी २६ व २७ मे रोजी गुजरातच्या दौऱ्यावर असतील. २६ मे रोजी ते दाहोद येथे जातील. सकाळी सुमारे ११:१५ वाजता ते दाहोद येथील लोकोमोटिव्ह उत्पादन प्रकल्प राष्ट्राला समर्पित करतील आणि एका इलेक्ट्रिक लोकोमोटिव्हला हिरवा झेंडा दाखवतील. त्यानंतर ते सुमारे २४,००० कोटी रुपये किंमतीच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी व लोकार्पण करतील. पंतप्रधान यावेळी एका सार्वजनिक सभेला देखील संबोधित करतील.

पुढे, पंतप्रधान भुज येथे जातील. सायंकाळी ४ वाजता ते सुमारे ५३,४०० कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी व लोकार्पण करतील आणि एका सार्वजनिक कार्यक्रमात मार्गदर्शन करतील.

२७ मे रोजी पंतप्रधान गांधीनगर येथे 'गुजरात अर्बन ग्रोथ स्टोरी'च्या २० वर्षांचा गौरव सोहळ्यात सहभागी होतील आणि ' नागरी विकास वर्ष २०२५' चा शुभारंभ करतील. हे कार्यक्रम सकाळी ११ वाजता होतील. या कार्यक्रमातही ते जनतेला संबोधित करतील.

देशातील प्रवास व वाहतूक सुविधा सुधारण्याच्या आपल्या संकल्पनेनुसार, पंतप्रधान दाहोद येथील भारतीय रेल्वेच्या लोकोमोटीव्ह उत्पादन प्रकल्पाचे उद्घाटन करतील. या प्रकल्पात देशांतर्गत वापरासाठी व निर्यातीसाठी ९००० अश्वशक्ती क्षमतेच्या इलेक्ट्रिक लोकोमोटिव्हचे उत्पादन केले जाईल. पंतप्रधान या प्रकल्पातून तयार झालेल्या पहिल्या इलेक्ट्रिक लोकोमोटिव्हला देखील हिरवा झेंडा दाखवतील. हे लोकोमोटिव्ह भारतीय रेल्वेच्या मालवाहतूक क्षमतेत वाढ करतील. यामध्ये ऊर्जा-बचत करणारी 'रिजेनेरेटिव्ह ब्रेकिंग सिस्टीम' असेल, जी पर्यावरणपूरक आहे.

यानंतर पंतप्रधान दाहोदमधील सुमारे २४,००० कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांचे पायाभरणी व लोकार्पण करतील. यामध्ये रेल्वे प्रकल्प, गुजरात सरकारच्या विविध योजना, वेरावल-अहमदाबाद दरम्यान वंदे भारत एक्सप्रेसचे उद्घाटन व वलसाड-दाहोद दरम्यान जलदगती रेल्वेचा शुभारंभ समाविष्ट आहे. तसेच कटोसन-कलोल विभागाचे रुंदीकरण रूपांतरण पूर्ण झाल्यानंतर मालगाडीला देखील हिरवा झेंडा दाखवण्यात येईल.

भुज येथे पंतप्रधान सुमारे ५३,४०० कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी व लोकार्पण करतील. या प्रकल्पांमध्ये खावडा अक्षय उर्जा उद्यानामध्ये निर्माण होणाऱ्या अक्षय ऊर्जेच्या वहनासाठी प्रसारण प्रकल्प, विद्युत प्रसारण जाळे विस्तार, तापी येथील अत्यंत उच्चदाब तापीय विद्युत प्रकल्प केंद्र, कांडला बंदर प्रकल्प, तसेच रस्ते, पाणीपुरवठा व सौरऊर्जा यासारखे अनेक प्रकल्प समाविष्ट आहेत.

गुजरातमध्ये २००५ साली सुरू झालेल्या नागरी विकास वर्ष या तत्कालीन मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने सुरू झालेल्या उपक्रमाला २० वर्षे पूर्ण होत आहेत. या पार्श्वभूमीवर नागरी विकास वर्ष २०२५, राज्य स्वच्छ हवामान कार्यक्रम यांची सुरुवात गांधीनगर येथे केली जाईल. यावेळी पंतप्रधान शहरी विकास, आरोग्य व पाणीपुरवठा यासंबंधी विविध प्रकल्पांचे उद्घाटन व पायाभरणी करतील. प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत २२,००० हून अधिक घराचे लोकार्पण देखील केले जाईल.

## ''फडणवीसांनी वेदनेला सेवेत परावर्तीत केले'' - अमित शाह

नागपूर, २६ मे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि शैलेश जोगळेकरांच्या कुटूंबात कॅन्सरमुळे दुःख आले होते. मात्र वैयक्तीक दुःखाला आणि वेदनेला त्यांनी सार्वजनिक सेवेत परावर्तीत केल्याचे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केले, नागपुरातील नॅशनल कॅन्सर इन्स्टिटयूट मध्ये स्वस्ति निवास पंथागार या कॅन्सर पीडित रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांसाठीच्या निवासगृहाचा भूमिपूजन सोहळा कार्यक्रमात शहा बोलत होते.

याप्रसंगी फडणवीसांचे कौतुक करताना शहा म्हणाले की नॅशनल कॅन्सर इन्स्टिटयूट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा ड्रीम प्रोजेक्ट असून फडणवीसांनी त्यांच्या वडिलांच्या कॅन्सर आजाराने मृत्यूनंतर नागपूरसह मध्य भारतातील कॅन्सर रुग्णांसाठी एक चॅरिटेबल हॉस्पिटल सुरू करण्याचा स्वप्न पाहिले होते. २०१२ पासून टप्प्याटप्प्याने कॅन्सर रुग्णालयाचं स्वप्न पूर्ण होत गेलं आणि एप्रिल २०२३ पासून नॅशनल कॅन्सर इन्स्टिटयूट नागपुरात पूर्ण क्षमतेने कार्यरत झालंय. यासोबतच अमित शाह म्हणाले की, देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राचे मुख्यमंत्री दुसऱ्यांदा बनले आहे, मात्र जेव्हा फडणवीस यांनी कॅन्सर इन्स्टिटयूटचं काम सुरू केले, तेव्हा ते काहीच नव्हते. तरी त्यांनी सुरुवात केली. अशा सेवा कार्यांना देवाचा आणि समाजाचा आशीर्वाद मिळतो आणि म्हणूनच नॅशनल कॅन्सर इन्स्टिटयूटचा वटवृक्ष इथे उभा आहे आणि हजारो गरजूंच्या जीवनातून दुःख दूर करत आहे. पश्चिमी देशात जेव्हा रुग्ण आजारी पडतात, तेव्हा त्याला रुग्णालयाच्या भरवशावर सोडून दिलं जातं. मात्र आपल्याकडे जेव्हा कुटुंबातील एक व्यक्ती आजारी पडतो, तेव्हा संपूर्ण कुटुंब त्याच्या सेवेमध्ये योगदान देत असतं.

## पावसामुळे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करा : अजित पवार

### उपमुख्यमंत्री अजित पवारांनी घेतला मुसळधार पाऊस असलेल्या जिल्ह्यांतील परिस्थितीचा आढावा

पुणे: राज्याच्या विविध भागात मुसळधार पाऊसाने कहर केला आहे. ज्यामुळे अनेक भागातील जनजीवन विस्कळीत झालं आहे. या पार्श्वभूमीवर राज्य व जिल्हा यंत्रणांनी संपर्कात राहून समन्वयानं नागरिकांच्या बचाव व मदतकार्याला प्राधान्य द्यावं, अशा सूचना राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रशासनाला दिल्या आहेत. अजित पवार यांच्याकडून बारामती, इंदापूर, पुणे जिल्ह्यासह मुसळधार पाऊस असलेल्या अन्य जिल्ह्यांतील परिस्थितीचा आढावा घेतला.

'या' जिल्ह्यांना पावसाचा रेड अलर्ट, नागरिकांना सावध राहण्याचे केले आवाहन

मुसळधार पाऊस होत असलेल्या भागातील नागरिकांनी सतर्क, सुरक्षित राहून प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. मान्सून महाराष्ट्रात दाखल झाला असून हवामान खात्याने मुंबई, रायगड, रत्नागिरी जिल्ह्यांना मुसळधार पावसाचा रेड अलर्ट जारी केला आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी उद्या रेड अलर्ट देण्यात आला असून, पालघरला यलो अलर्ट आहे. मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे. पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूरच्या घाट परिसरात पावसाचा जोर आणखी काही दिवस कायम राहणार आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित जिल्हा यंत्रणांनी सतर्क राहून नागरिकांची सुरक्षितता, बचाव व मदतकार्याला सर्वोच्च प्राधान्य द्यावे. त्यासाठीच्या उपाययोजना तात्काळ राबवाव्यात. मुसळधार पावसाची शक्यता असलेल्या भागातील नागरिकांनी सावध रहावे. सुरक्षितस्थळी आसरा घ्यावा. स्थानिक प्रशासनाच्या संपर्कात राहून त्यांच्या सूचनांचे पालन करुन सहकार्य करावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले आहे.

मुसळधार पाऊस सुरु असलेल्या भागातील नागरिकांनी शक्यतो घरीच थांबावे.

## नाशिकमध्ये रा.स्व.संघाच्या प्रशिक्षणार्थी स्वयंसेवकांचे सघोष संचलन

नाशिक, ता. २७, मंगळवार : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रशिक्षित स्वयंसेवकांचे शिस्तबद्ध पथसंचलन अनुभवण्याची संधी नाशिककरांना मंगळवारी (दिनांक २७ मे) मिळणार आहे. संघाच्या पश्चिम क्षेत्राचा 'कार्यकर्ता विकास वर्ग- प्रथम' (सामान्य) वर्ग नाशिकमध्ये सुरु आहे. महाराष्ट्र, गोवा आणि गुजरात या तीन राज्यातून आलेल्या २८५ स्वयंसेवकांचे सघोष संचलन संध्याकाळी ६ वाजून ४५ मिनीटांनी विद्याप्रबोधिनी शाळा (भोंसला) येथून प्रारंभ होईल.

संघ रचनेतील विदर्भ, देवगिरी, पश्चिम महाराष्ट्र, कोकण, गुजरात आणि सौराष्ट्र अशा सहा प्रांतातील स्वयंसेवकांचा प्रशिक्षणात सहभाग आहे. यामध्ये शेतकरी, लघुउद्योजक, डॉक्टर्स, वकिल, व्यापारी, शिक्षक आदिंसह उच्च महविद्यालयीन विद्यार्थ्यांचा समावेश आहे. देशभक्ती, शारिरीक व बौध्दिक विषयाचे या संघ शिक्षा वर्गात स्वयंसेवकांना प्रशिक्षण दिले जाते. यासोबतच शिस्ती, वेळेचा सदुपयोग, आदींचे प्रशिक्षण दिले जाते. मंगळवार (ता.२७) सायंकाळी या प्रसंगी वर्गाचे सर्वाधिकारी विष्णु वझे, कार्यवाह जयदीप धर्माधिकारी हे प्रशालेच्या मैदानावर संघ शिक्षा वर्गातील स्वयंसेवकांचे संपूर्ण गणवेशातील संचलन (एकत्रीकरण व सुरूवात) होणार आहे.

यानिमित्ताने शहरवासियांना संघ शिक्षा वर्गात देशभक्तीने भारावलेल्या स्वयंसेवकांना दिल्याजाणाऱ्या प्रशिक्षणाची व देशभक्तीची चुणूक पहायला मिळणार आहे. पथसंचलन मार्गावर घोषवादनाच्या निनादात निघणारे हे संचलन पाहण्यासाठी शहरातील जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने नाशिककरांना करण्यात आले आहे. पथ संचलनाचा मार्ग खालीलप्रमाणे असणार आहे.

मार्ग :- विद्याप्रबोधिनी शाळा(भोंसला), नंदन स्वीट्स, शहीद सर्कल, प्रसाद सर्कल, आकाशवाणी भाजी मार्केट, मधुर स्वीट्स, सावरकर गेट (भोंसला), जेहान सर्कल, विद्याप्रबोधिनी शाळा(भोंसला) असा संचलनाचा मार्ग असणार आहे.

## प्रशासन व वारकऱ्यांच्या समन्वयाने आषाढी वारी दिंड्यांचे उत्तम नियोजन - पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील

### वारकऱ्यांची चोख व्यवस्था ठेवण्याच्या पालकमंत्र्यांच्या प्रशासनाला सूचना



अहिल्यानगर, दि.२६ - जिल्ह्यातील दिंडी सोहळ्याचे प्रमुख, वारकरी व प्रशासनातील अधिकारी - कर्मचाऱ्यांच्या एकमेकांमधील समन्वय व सहकार्याने पालखी सोहळ्याचे उत्तम नियोजन करण्यात येईल, अशी ग्वाही राज्याचे जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. वारकऱ्यांची गैरसोय होऊ नये यासाठी चोख व्यवस्था ठेवण्यात यावी, अशा सूचना त्यांनी जिल्हा प्रशासानातील अधिकाऱ्यांना केल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आषाढी वारी नियोजन बैठकीत पालकमंत्री श्री.विखे पाटील बोलत होते. याप्रसंगी आमदार शिवाजी कर्डिले, आमदार विठ्ठलराव लंघे, आमदार अमोल खताळ, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संभाजी लांगोरे, ह.भ.प.अशोक सावंत आदी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री.विखे पाटील म्हणाले, आपल्या जिल्ह्यातून २६० दिंड्या करमाळा मार्ग सोलापूर जिल्ह्यात मार्गस्थ होतात. संत निवृत्तीनाथ पालखी मार्ग निर्हेण ते शेगुड पर्यंत रस्त्यांचे खड्डे बुजविण्यात यावे. साईड पट्ट्या दुरूस्त कराव्यात. दिंडी मार्गावरील पारेगाव येथे मुलभूत सुविधा पुरवाव्यात. संपूर्ण पालखी मार्गावर रूग्णवाहिका तयार ठेवण्यात यावेत. दिंड्याच्या नोंदणीसाठी प्रत्येक तहसील कार्यालयात शिबिर आयोजित करण्यात यावे.

यावर्षी पालखीच्या सुरूवातीलाच पाऊस होत आहे, त्यामुळे वारकऱ्यांची सुरक्षा म्हणून यापुढे पावसाचे अंदाज वर्तविणारी अद्यावत यंत्रणा उभारण्यात येणार आहे. जिल्ह्यातून जाणाऱ्या २६० दिंड्यांच्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी प्रशासनातील अधिकारी - कर्मचाऱ्यांची संपर्क अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. प्रत्येक दिंडीत पुरेसे औषधे उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची ग्वाही पालकमंत्र्यांनी यावेळी दिली.

श्री.विखे पाटील म्हणाले, ज्या गावात अथवा शहरामध्ये या दिंड्या मुक्कामी थांबणार आहेत त्या ठिकाणच्या शाळा, महाविद्यालय, मंगल कार्यालयामध्ये वारकऱ्यांची मुक्कामाची व्यवस्था करण्यात येणार असून त्याठिकाणी शुद्ध पिण्याचे, पाणी, अखंडितपणे वीज, आरोग्य व शौचालयाची व्यवस्थाही केली जाणार आहे. मागील वर्षीच्या दिंडीतील वारकऱ्यांच्या अडचणी यावर्षी दूर केल्या जातील. वारकऱ्यांच्या सूचनांची दखल घेतली जाईल.

वारकरी पायी चालत असलेल्या मार्गावर वाहतुकीचे नियमन करण्याबरोबरच वारकऱ्यांना कुठलाही त्रास होऊ नये यासाठी दिंड्यासोबत पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवावा. दिंड्या ज्याठिकाणी मुक्कामी राहतील तेथेही पोलीस कर्मचारी उपस्थित राहतील दृष्टीने नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

पालखीमार्गावर आवश्यक साधनांसह तात्पुरते आरोग्य केंद्र उभारण्यात यावे, श्रीक्षेत्र नेवासा येथील ज्ञानेश्वर देवस्थानाचा ७०० कोटींचा विकास आराखडा तयार केला जाणार आहे, मागील वर्षाप्रमाणे यावर्षी प्रत्येक दिंडीला २० हजार रूपये अनुदान व प्रत्येक वारकऱ्यास पाच लाख रूपयांचा विमा देण्यास शासन कटिबद्ध आहे, असे त्यांनी सांगितले.

अनेकवेळा मुक्कामाच्या ठिकाणी अशुद्ध पाणी पिल्याने अनेक वारकरी आजारी पडतात. त्यामुळे प्रत्येक दिंड्यातील वारकऱ्यांना पिण्याच्या शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्यात यावा. ज्या दिंड्याकडे स्वतःचे पाणी टँकर आहेत, त्यांच्या टँकरमध्ये शुद्ध पिण्याचे पाणी भरून देण्याची व्यवस्था करण्यात यावा, अशा सूचनाही त्यांनी केल्या.

दिंडीमध्ये अस्वच्छता होऊ नये यासाठी 'हरित वारी - निर्मल वारी' उपक्रम राबविण्यात येणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

आमदार शिवाजीराव कर्डीले, आ.विठ्ठलराव लंघे, आ.अमोल खताळ यांनीही वारीच्या नियोजनाच्या दृष्टीने सूचना केल्या.

याबैठकीला जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी, तहसीलदार दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. तसेच जिल्ह्यातील ७६ दिंडीचे प्रमुख तसेच वारकरी प्रतिनिधी उपस्थित होते.

CMYK

धाराशिव • दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## पत्रकारांसह त्यांच्या कुटुंबीयांना निशुल्क दर्शन पास द्या : ताकमोघे

तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.२६ मे -

शासन मान्यता प्राप्त दैनिकांच्या प्रतिनिधींना आणि त्यांच्या कुटुंबीयांना निशुल्क दर्शन पास देण्यात यावा म्हणून जिल्हाधिकारी तथा मंदिर संस्थानचे अध्यक्ष कीर्ती किरण पुजार यांना तुळजापूर पत्रकार संघाचे अध्यक्ष सचिन ताकमोघे यांनी निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

नुकतीच तुळजाभवानी मंदिर संस्थाननें तुळजाभवानी देवीच्या महत्वाच्या व अतिमहत्त्वाच्या व्यक्तींकरिता प्रस्तावित दर्शन संदर्भात नियमावली जाहीर केली असून त्याम ध्ये तुळजाभवानी देवीच्या आणि मंदिराच्या प्रसिद्धीकरिता बातमीदारी करणारे तुळजापूर स्थानिक मंदिरशी निगडित असणाऱ्या पत्रकारांना आणि



त्यांच्या कुटुंबीयांना निशुल्क दर्शन पास देण्यात यावा.

तसेच तुळजाभवानी देवीच्या मंदिरात होणाऱ्या दैनंदिन पूजाविधी आणि घडामोडींची माहिती प्रसिद्धी होण्यासाठी स्थानिक पत्रकारांना कायम स्वरूपीचे पासेस देण्यात यावे अशी मागणी सदरील निवेदनातून केली आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### समता परिषदेच्या वतीने मंत्री छगन भुजबळ यांचा सत्कार

धाराशिव, दि.२६ मे -

महाराष्ट्र राज्याचे नवनियुक्त अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री ना. छगन भुजबळ यांचा अखिल भारतीय समता परिषद धाराशिव जिल्ह्याच्या वतीने सर्व तालुकाध्यक्ष व पदाधिकाऱ्यानी महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानीची प्रतिमा कवड्याची माळ व प्रसादरुपी आशीर्वाद देऊन सत्कार करण्यात आला. मंत्री भुजबळ यांच्या बांद्रा येथील निवासस्थानी झालेल्या या सत्कार समारंभात अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद धाराशिवच्या वतीने जिल्ह्यातील कार्याचा आढावा सादर करण्यात आला. यावेळी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे मराठवाडा प्रदेशाध्यक्ष आबासाहेब खोत, जिल्हाध्यक्ष विभीषण खुणे, संतोष डोरले, प्रशांत वेदपाठक, रॉबिन बगाडे, मनोज वाघमारे यांच्यासह समता परिषदेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## एक रुपयात पीक विमा योजना बंद...

# शेतकऱ्यांवर दरवर्षी ७०० कोटींचा अतिरिक्त आर्थिक भार

### अनिल जगताप यांची माहिती



तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२६ मे -

नैसर्गिक आपत्ती, अवकाळी, पाऊस, गारपीट, पूर, दुष्काळ, कीड, रोगराई यामुळे शेती पिकाचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना त्यांची भरपाई मिळावी आर्थिक नुकसान होऊ नये म्हणून सन २०१६ पासून राष्ट्रीय कृषी विमा योजना बंद करून प्रधानमंत्री पिक विमा योजना सुरू केली गेली. प्रधानमंत्री पिक विमा योजनेत शेतकरी हिस्सा, राज्य शासनाचा हिस्सा व केंद्र शासनाचा हिस्सा असे मिळून एकूण रक्कम विमा हप्त्यापोटी पिक विमा कंपनीला दिली जाते. पीक विमा अभ्यासक अनिल जगताप यांनी ही माहिती प्रसिद्ध माध्यमांद्वारे दिली असून त्यांनी चिंता व्यक्त केली आहे.

प्रधानमंत्री पिक विमा योजने अंतर्गत स्थानिक नैसर्गिक आपत्ती, हंगामातील प्रतिकूल, परिस्थिती काढणी पश्चात नुकसान व ती कापणी प्रयोगा आधारे शेतकऱ्यांना चार टप्प्यात नुकसान झाले तर त्याची नुकसान भरपाई मिळत होती. २०१६ पासून २०२२ पर्यंत या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी एकूण नुकसान भरपाई रकम ...च्या दोन टक्के तर रब्बी हंगाम ...साठी दीड टक्के फळबागासाठी पाच टक्के रक्कम शेतकरी हिस्सा



म्हणून भरावी लागत होती राज्य शासनाने २०२३ मध्ये केवळ एक रुपया मध्ये पिक विमा योजना आणली होती ही योजना दोन वर्ष चालली त्याचा बऱ्यापैकी आर्थिक फायदा शेतकऱ्यांना झाला कारण या दोन वर्षात त्यांना त्यांच्या हिश्याची रक्कम केवळ एक रुपया भरावी लागत होती.

राज्य शासनाने या योजनेत भ्रष्टाचार होत असल्याचे कारण सांगून एक रुपयात पिक विमा योजना चालू खरीप हंगामापासून बंद केलेली आहे.

त्याचा फटका आता शेतकऱ्यांना बसणार आहे. महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांना दरवर्षी साधारणपणे ७०० कोटी रुपये पेक्षा जास्तीची रक्कम शेतकरी हिस्सापोटी भरावी लागणार आहे. चालू खरीप हंगामापासून शेतकऱ्यांना आता केवळ कापणी ते काढणे या कालावधीत पीक कापणी प्रयोगावर आधारितच विमा नुकसान भरपाई मिळणार आहे.

शेतकरी संघटनांनी यासंदर्भात तीव्र नाराजी व्यक्त केली असून, शासनाने पुन्हा एकदा शेतकऱ्यांसाठी लाभदायक योजना सुरू करावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

**शेतकऱ्याने भरलेला आतापर्यंतचा शेतकरी हिस्सा...**

| वर्ष | शेतकरी संख्या | शेतकरी हिस्सा (खरीप | - रब्बी |
|---|---|---|---|
| २०१८ | ९५ लाख ३५ हजार | ४८७ कोटी | १२५ कोटी |
| २०१९ | १ कोटी २६ लाख | ५७६ कोटी | ३७ कोटी ३८ लाख |
| २०२० | १ कोटी ७५ लाख | ५३० कोटी | ४२ कोटी २८ लाख |
| २०२१ | ८३ लाख ९३ हजार | ४४० कोटी | ४८ कोटी ७३ लाख |
| २०२२ | ९६ लाख ६१ हजार | ६५६ कोटी | ३३ कोटी |
| २०२३ | १ कोटी ७० लाख | १ कोटी ७० लाख | ८३ लाख |
| २०२४ | १ कोटी ६५ लाख | १ कोटी ६५ लाख | ८० लाख |

## ऑपरेशन सिंदूरच्या वीरांना मानवंदना; उमरग्यात तिरंगा यात्रा



तभा वृत्तसेवा
उमरगा, दि.२६ मे -

देशासाठी अपार शौर्य गाजवणाऱ्या ऑपरेशन सिंदूरमधील वीर जवानांच्या सन्मानार्थ भारतीय जनता पार्टीच्या उमरगा शहर मंडळातर्फे तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात आले.

या यात्रेला आदर्श महाविद्यालय येथून भारत मातेच्या पूजनाने आणि माजी सैनिकांच्या सत्काराने प्रारंभ झाला. उमरगा आणि लोहारा तालुक्यातील हजारो नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होत भारत माता की जय, वंदे मातरम, जय जवान, जय किसान अशा घोषणांनी शहरात देशभक्तीचे वातावरण निर्माण केले. यात्रा शहरातील प्रमुख मार्गांवरून पुढे जात हुतात्मा स्मारकाजवळ समाप्त झाली. ही तिरंगा यात्रा राष्ट्रप्रेम, एकात्मता व अभिमानाचे प्रतीक ठरली.

भाजपा उमरगा मंडळाच्या पुढाकाराने पार पडलेल्या या उपक्रमामुळे जनतेत राष्ट्रभक्तीचा संदेश पोहोचल्याची भावना व्यक्त होत आहे.

## धाराशिवमध्ये भीषण अपघात; वृद्धाचा दुर्दैवी मृत्यू

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२६ मे -

धाराशिव शहरातील एनएच ५२ महामार्गावर दिनांक २४ मे २०२५ रोजी सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास डिमार्टजवळ एक भीषण अपघात घडला. या अपघातात श्रीमंत गुंडीबा पाटील (वय ७५, रा. रुई भालगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर) यांचा जागीच मृत्यू झाला.

श्रीमंत पाटील हे मोटारसायकलवरून संभाजीनगर रोडने प्रवास करत असताना कंटेनर क्रमांक चक ४६ उङ ९४६७ ने त्यांच्या दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिली. सदर कंटेनरचा चालक मनोहरसिंग नंदकिशोरसिंग (रा. लक्ष्मीनगर सोसायटी, शंकर देऊळ, माहुल रोड, चेंबूर, मुंबई) याने अत्यंत निष्काळजीपणे वाहन चालवत असताना हा अपघात घडवून आणल्याची माहिती आहे.

अपघातात गंभीर जखमी झालेल्या श्रीमंत पाटील यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. या घटनेनंतर दुसऱ्या दिवशी दिनांक २५ मे २०२५ रोजी मृताचे पुत्र सचिन श्रीमंत पाटील (वय ४४) यांनी आनंदनगर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**कंटेनर वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल...**

## व्यक्तिमत्व विकास शिबिरामध्ये अभिनेता संदिप पाठक यांचे मार्गदर्शन




तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.२६ मे -

येथील पंचरंग प्रतिष्ठान, तुळजापूर आयोजित व्यक्तिमत्व विकास व अभिनय शिबिर दि.२१ मे पासुन सुरू असून २४ मे पर्यंत आहे. या शिबीरात अभिनेते नाट्य दिग्दर्शक लेखक तुषार भद्रे, नाट्य शास्त्रविभाग प्रमुख के.एस.के. महाविद्यालयल बीड, परिनिरीक्षण मंडळ सदस्य डॉ. संजय पाटील देवळाणकर व सिनेनाट्य अभिनेते संदिप पाठक तसेच अनिरुद्ध खुटवड दिग्गज लेखक, दिग्दर्शक, सिने नाट्य अभिनेते मार्गदर्शन करत आहेत.

शिबिराचे उद्घाटन उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. निलेश देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रसंगी पंचरंग प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्रीकांत नाडापुडे प्रा. संभाजी भोसले सरांनी पंचरंग प्रतिष्ठानच्या सामाजिक कार्याची, सिनेनाट्य कार्याची माहिती देत, व्यक्तिमत्व विकास, अभिनय शिबिराचे महत्त्व स्पष्ट केले.

शिबिरात जगदिप तिकोने यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## भूतान दौऱ्याच्या अनुभवातून धाराशिवसाठी नवदृष्टी...

# उद्योगवाढीसाठी 'रुपामाता' सज्ज : ॲड. व्यंकटराव गुंड

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२६ मे -

रुपामाता उद्योग समूहाचे संस्थापक तसेच भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य ॲड. व्यंकटराव गुंड यांनी अलीकडेच केलेल्या भूतान दौऱ्यानंतर धाराशिव जिल्ह्याच्या औद्योगिक आणि सामाजिक विकासासाठी नव्या दृष्टीकोनातून संकल्पना मांडल्या आहेत. भूतानमधील विविध औद्योगिक, कृषी व पर्यावरणस्नेही उपक्रमांचा सखोल अभ्यास करत त्यांनी धाराशिवमध्ये शाश्वत उद्योगांची उभारणी करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

भूतानमध्ये प्राधान्याने पाहिल्या गेलेल्या ग्रॉस नॅशनल हॅपिनेस या संकल्पनेपासून प्रेरणा घेत तेथील लघुउद्योग, स्थानिक उत्पादने, हस्तकला, पर्यावरणपूरक पर्यटन अशा क्षेत्रातील कार्यपद्धतींचा अभ्यास करत त्यांनी धाराशिवसाठी योग्य मॉडेल तयार करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. भूतानचा हा दौरा



केवळ पर्यटन नव्हे, तर धाराशिवच्या प्रगतीसाठी नवा दृष्टीकोन घेऊन आलेला आहे.

येथे स्थानिक उत्पादकता, शाश्वत विकास व सामूहिक सकारात्मकतेचा मंत्र आहे. हा अनुभव जिल्ह्यातील तरुण उद्योजकांसाठी मार्गदर्शक ठरेल, असे ॲड. गुंड यांनी सांगितले. या दौऱ्यात मल्हारी माने, संजय पटवारी, यू.एन. भोसले, मनोहर सूर्यवंशी यांचा समावेश होता.

तसेच, धाराशिव जिल्ह्यातील युवकांना अधिकाधिक रोजगार उपलब्ध होण्यासाठी आणि उद्योग क्षेत्राला चालना मिळावी यासाठी युती सरकारच्या माध्यमातून विशेष सवलती व धोरणात्मक मदतीची मागणी करण्यात येणार असल्याचेही ॲड. व्यंकटराव गुंड यांनी स्पष्ट केले.

## लाठी, काठी आणि दांडपट्टा स्पर्धेत धाराशिवचा दिल्लीत दबदबा

### गुरुकुल प्रायमरी इंग्लिश स्कूल मुरुमला फर्स्ट चॅम्पियनशिप ट्रॉफी

तभा वृत्तसेवा
उमरगा, दि.२६ मे -

दिल्ली येथे आयोजित २ री नॅशनल इंडोर मार्शल आर्ट गेम्स व पहिली लाठी फेडरेशन कप, अग्रवाल भवन बुद्ध विहार न्यू दिल्ली येथे २२ व २५ मे २०२५ यादरम्यान आयोजित स्पर्धेत विविध राज्यातील खेळाडूंनी सहभाग नोंदवला यामध्ये धाराशिव जिल्ह्याच्या खेळाडूंनी लाठी व दांडपट्टा या क्रीडा प्रकारात घवघवीत यश संपादन केले.

या स्पर्धेत विद्यार्थ्यांना पदक व प्रमाणपत्र मार्शल आर्टस् गेम्स फेडरेशन ऑफ इंडियाचे सचिव व दिल्ली ऑलम्पिक चे सहसचिव दीपक अग्रवाल, लाठी इंटरनॅशनलचे फाउंडर सुभाष मोहिते, लाठी इंडियाचे अध्यक्ष अजय शहा



यांच्या उपस्थितीत मिडलवर प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आला.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा अभिनंदन गुरुकुल इंग्लिश स्कूलचे सचिव आनंद चौधरी, मुख्याध्यापक पद्माकर मोरे, रामानुजन इंग्लिश स्कूलचे अध्यक्ष महेश अंबर, उस्मानाबाद जिल्हा लाठी असोसिएशनचे अध्यक्ष अमोल पाटील व सर्व पालकांनी अभिनंदन केले, विद्यार्थ्यांसोबत उस्मानाबाद जिल्हा दांडपट्टा असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. प्रीती चिलोबा, गुरुकुलच्या मुख्याध्यापिका मयुरी चौधरी, टीम कोच गौतम विधाते, टीम मॅनेजर आदिनाथ गोरे, ऑफिशियल वजीर शेख, धनराज तेलंग, लाठी इंडियाचे डायरेक्टर महंमदरफी शेख यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## वाहनातून १४ बॅग चोरीस; ४० हजारांचा मुद्देमाल लंपास

तभा वृत्तसेवा
येरमाळा, दि.२६ मे -

दिल्लीहून केरळकडे जात असलेल्या एका प्रवाशाचे वाहन पारगाव ते वडगाव (ज) दरम्यान राष्ट्रीय महामार्ग क्र. ५२ वर अज्ञात चोरट्यांनी फोडून सुमारे ४० हजार किंमतीचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना घडली. याप्रकरणी येरमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी मेलबीन मॅथ्यु मैथेव (वय ४५, रा. एफ १०३/एफ, दिशाद कॉलनी, ओल्ड सिमापुरी, झिलमील, शाहदरा, दिल्ली) हे आपल्या कुटुंबियांसोबत दिल्लीहून केरळकडे वाहन (क्र.डीएल ०१/व्हीसी ५४४६) ने प्रवास करत होते. दि.२५ मे रोजी पहाटे ५.१५ ते ६ दरम्यान, पारगाव ते वडगाव (ज.) या मार्गावर त्यांच्या वाहनाच्या कॅरिअरमध्ये ठेवलेल्या १४ विविध रंगांच्या व कंपनीच्या बॅग अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्या.

या बॅगांमध्ये प्रमाणपत्रे, कपडे, दागिने यांचा समावेश असून एकूण ४० हजारांचा ऐवज चोरीस गेला आहे, असे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

## कडकनाथवाडी ग्रामपंचायत हद्दीत पवनचक्की उभारण्यास ग्रामस्थांचा विरोध

### पुन्हा पवनचक्की कंपनीची दादागिरी आली समोर...

तभा वृत्तसेवा
वाशी, दि.२६ मे -

पवनचक्कीकडून तालुक्यात सुरू असलेला धुमाकूळ आणि अनागोंदी कारभार याला शेतकरी आणि नागरिक वैतागलेले आहेत. पवनचक्की ने ठेवलेले दलाल शेतकऱ्यांच्या जमिनी कमी दराने खरेदी करून पवनचक्क्या उभारणीसाठी भाडेतत्त्वावर देत आहे. दलाल पवनचक्क्याकडून मोठ्या प्रमाणात रक्कम उकळतात आणि शेतकऱ्याची मध्यस्थी करत जमिनीचा मोबदला कवडीमोल देतात. तालुक्यातील शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला समान दिला जात नाही. शेतकऱ्यांच्या भोळेपणाचा फायदा पवनचक्कीने ठेवलेले दलाल आणि पवनचक्कीचे अधिकारी घेत आहेत. शेतकऱ्यांना या गावात जास्त रक्कम तर त्या गावात कमी दिली जात असलेला प्रकार समोर आल्यानंतर शेतकऱ्यांनी जमिनी देण्यास विरोध दर्शविला जात आहे. तालुक्यातील शेतकरी आता जागरूक झाले,असल्याने इतर गावातील शेतकऱ्यांना फोन करून माहिती घेत आहेत. असाच प्रकार लक्षात आल्यानंतर धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील कडकनाथवाडी येथील ग्रामस्थांनी गावाच्या हद्दीत पवनचक्की उभा करण्यास विरोध केला आहे. सर्व गावकऱ्यांनी मिळून तसा ग्रामसभेत ठराव देखील घेतला आहे. मात्र ग्रामस्थांनी घेतलेल्या ठरावाला न जुमानता पवनचक्कीकडून गुंड उभारून तसेच दलालांना मध्येस्थी घालत कडकनाथवाडी गावच्या हद्दीत काम सुरू केली आहेत. ग्रामसभेत घेतलेल्या ठरावात कडकनाथवाडी या शिवारामध्ये पवनचक्की उभारण्यासाठी टाटा पावर रिन्यूएबल एनर्जी लि. या कंपनीचे पत्र दि.१४ सप्टेंबर



२०२३ रोजी ग्रामपंचायतला प्राप्त झाले होते. पत्राच्या संदर्भानुसार टाटा पावर रिन्यूएबल एनर्जी लि. कंपनीने पवनचक्की उभारण्याकरिता ना हरकत ची मागणी केली होती. त्याकरिता दि.२ मार्च २०२४ रोजी मागील ग्रामसभेचा संदर्भ व ग्रामसभेचा ठराव क्रमांक एक नुसार व ऑक्टोंबर २०१३ रोजी झालेल्या ग्रामसभेतील विषयाप्रमाणे गावांमध्ये पवनचक्या उभा करण्यास कोणत्याही कंपनीला ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येऊ नये असे ठरले आहे. ग्रामपंचायतच्या निदर्शनास आले, की पवनचक्की उभा करण्याकरिता लागणारी जमीन यांची खरेदी विक्रीचे व्यवहार चालू असून ते कंपनीने त्वरित बंद करण्यात यावेत त्याचप्रमाणे आजच्या ग्रामसभेत पुन्हा कोणत्याही कंपनीला पवनचक्कीचे काम करण्याकरिता ना हरकत देण्यात येणार नाही. त्यामुळे गावामध्ये काम करताना ग्रामपंचायत व ग्रामस्थांना विचारणा केल्याशिवाय गावात कामे चालू करू नये.

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन हा ठराव गावच्या मतास टाकला असताना तो सर्वांमध्ये पास करण्यात आला,असा गावकऱ्यांनी ग्रामसभेत ठराव घेतला असताना देखील पवनचक्क्या कंपनीकडून त्याचे उल्लंघन करत ग्रामस्थांना तसेच ग्रामपंचायतला न विचारात घेता कामे सुरू केली आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा पवनचक्की ची सुरू दादागिरी समोर येत आहे. याकडे कोणत्याही अधिकाऱ्यांचे लक्ष नाही. अधिकाऱ्यांनी पवनचक्कीकडून हप्ते घेतले असल्यामुळे लक्ष दिले जात नाही,अशी चर्चा नागरिकांत आहे. नेमका काय प्रकार सुरू आहे, हे पवनचक्कीचे अधिकारी आणि प्रशासनातील मलई खाणारे अधिकारी यांनाच माहिती!

त्यामुळे या प्रकाराकडे जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष द्यायची गरज असल्याचे बोलले जात आहे.

## जयप्रकाश विद्यालयातील विशाखा कोळी हिची पोस्ट मास्तरपदी निवड

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२६ मे -

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे विशाखा अभिमान कोळी यांची पोस्ट ऑफीस धाराशिव येथे असिस्टंट ब्रँच पोस्ट मास्टर (BPM²) पदी निवड झाली आहे.

या निवडीबद्दल प्राचार्य जयप्रकाश कोळगे यांच्या हस्ते विशाखा कोळी व त्याचे वडील अभिमान कोळी यांचा बुके देऊन सत्कार करण्यात आला. जयप्रकाश माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाची ती माजी विद्यार्थीनी आहे. तिने आपल्या अथक प्रयत्नातून हे यश संपादन केले आहे. आपल्या आई-वडिलांच्या श्रमाचे फलित तिने करून दाखवले आहे. या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

यांप्रसंगी डॉ. आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षण महर्षी सुभाष कोळगे,



माजी जि.प. सदस्य रामदास कोळगे, माजी ग्रा.प. सदस्य राजनारायण कोळगे, प्रशासकिय अधिकारी शिवकन्या सांळुके, पर्यवेक्षक काकासाहेब डोंगरे, तानाजी कोळगे, प्रा. नानासाहेब पवार, गणेश जाधव, अथर्व क्षिरसागर, शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. प्रशांत कोळगे यांनी मानले.

## अत्याधुनिक रेडिओसर्जरी मुळे रिलॅप्स्ड एव्हीएम रुग्णांना मिळाली नवी आशा

अहमदनगर - २४ वर्षीय मेंदूतील रिलॅप्स्ड आर्टेरिओव्हेनस मालफॉर्मेशन (एव्हीएम) ने त्रस्त असलेल्या रुग्णाला पुण्यातील बाणेर येथील मणिपाल हॉस्पिटल मध्ये यशस्वी उपचार करण्यात आले, हे उपचार करण्यासाठी स्टिरिओटॅक्टिक रेडिओसर्जरी (एसआरएस) चा वापर करण्यात आली. मेंदूच्या अगदी जटील ठिकाणी आणि ज्या ठिकाणी पूर्वी म्हणजे २०२१ मध्ये करण्यात आलेल्या गॅमानाईफ सर्जरीची जागा पुन्हा खुली झाल्याने ही सर्जरी खूपच जटील बनली होती. एव्हीएम म्हणजे मेंदूतील गुंतलेल्या रक्तवाहिन्या असतात, ज्या मेंदूच्या महत्त्वाच्या भागात निर्माण होतात ज्यामुळे मेंदूचे कार्य बाधित होते, परिणामी परंपरागत न्युरोसर्जरी करणे कठीण होते.

## आईकू भारतातील पहिला स्मार्टफोनआईकू नियो १० घेऊन येत आहे

नवी दिल्ली : उच्च-कार्यक्षमता स्मार्टफोन ब्रँड असलेल्या आईकू ने आज त्यांचे नवीन पॉवरहाऊस - आईकू नियो १० लाँच करण्याची घोषणा केली. तरुण पिढीला - जसे की तरुण व्यावसायिक आणि उच्च-कार्यक्षमता वापरकर्ते - लक्षात घेऊन डिझाइन केलेला हा स्मार्टफोन त्याच्या विभागात एक नवीन बेंचमार्क स्थापित करतो. त्याची अत्याधुनिक ड्युअल-चिप आर्किटेक्चर, प्रगत कूलिंग सिस्टम आणि अनेक उद्योग-प्रथम नवोपक्रम यामुळे ते अत्यंत खास बनते. आईकू नियो १० हा भारतातील पहिला स्मार्टफोन आहे जो स्नैपड्रैगनएँ ८एस जेन ४ चिपसेटने सुसज्ज आहे आणि त्यात ७०००एमएएच ची शक्तिशाली बॅटरी आहे जी अत्यंत पातळ डिझाइनमध्ये सुंदरपणे पॅक केली आहे.

## धानुका ॲग्रीटेक लिमिटेडने टरगा सुपरची गौरवशाली २५ वर्षे पूर्ण

पुणे - भारतातील कृषि निविष्ठा क्षत्रतील अग्रगण्य कंपनी धानुका ॲग्रीटेक लिमिटेडने टरगा सुपर या ब्रँडचा रौप्य महोत्सव साजरा केला. टरगा सुपर ब्रँडने २५ व्या वर्ष यशस्वी पूर्ण करून कृषी निविष्ठा ब्रँड मध्ये एक महत्वाचा टप्पा गाठला आहे. टरगा सुपर एक ब्रँड नसून विश्वासाचा एक वारसा आहे. टरगा सुपर हे निसान केमिकल कार्पोरेशन यांच्या अत्याधुनिक विज्ञानातून उद्भवलेले आणि धानुका ॲग्रीटेक लिमिटेडच्या भारतीय शेतकऱ्यांच्या प्रती असलेल्या अटल वचनबद्धतेमुळे बळकट झालेल्या नावीन्यपूर्णता आणि विश्वासाच्या वारश्याचे प्रतीक आहे.हा साजरा केलेला प्रसंग उत्पादना पेक्षाही महत्वाचा आहे. हा राष्ट्राच्या कृषी क्षेत्रामध्ये नवोपचार, दोघांचे संयुक्तिक प्रयत्न आणि वचनबद्धतेच्या परंपरेचा सन्मान आहे. या प्रवासाचे नेतृत्व धानुका ॲग्रीटेक लिमिटेडचे दूरदर्शी दृष्टिकोणअसलेल्या व्यवस्थापकीय संचालक श्री राहुल धानुका, श्री संजय पाटील जनरल मॅनेजर आणि निसान केमिकल कार्पोरेशन जपानचे आंतरराष्ट्रीय ऑपरेशन प्रमुख श्री उचियामा सॅन, जनरल मॅनेजर मिउरा सॅन आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. आर.के. यादव यांच्या उपस्थितीमुळे जागतिक सहकार्याच्या आणि नवोपचारच्या भावनेला बळ मिळाले. त्यांचा धोरणात्मक दृष्टिकोण आणि अविरत समर्पणाने देशभरात टरगा सुपरला परिणामकारक गुणवत्तेचे विश्वसनीय प्रतीक म्हणून स्थापित करण्यात महत्वाची भूमिका बजावली आहे.

## 'सुपर डान्सर चॅप्टर ५' परत येत आहे, सोनी एन्टरटेन्मेंट टेलिव्हिजनवर!



उत्साही बॉलीवूड सुदरी शिल्पा शेट्टी कुंद्रा आणि सदैव प्रसन्न असणारी गीता कपूर (गीता मा) परीक्षकांच्या रूपात या शोमध्ये जिवंतपणा आणतील आणि यावेळी त्यांच्यासोबत परीक्षकांच्या पॅनलमध्ये आहे प्रसिद्ध कोरिओग्राफर मर्झी पेस्तनजी. हे तिघे मिळून प्रत्येक स्पर्धकाच्या परफॉर्मन्समध्ये जीव, गंमत आणि प्रामाणिकपणा आणण्याचा प्रयत्न करतील. आपल्या अनोख्या आणि रंजक शैलीबद्दल ओळखला जाणारा परितोष त्रिपाठी नव्या सीझनचे सूत्रसंचालन करण्यासाठी सज्ज आहे.

या शोविषयी बोलताना शिल्पा शेट्टी म्हणते, आपल्या मुलाने नाव काढावे असे प्रत्येक आईला वाटत असते. मी स्वतः आई असल्यामुळे एक आई आपल्या मुलाला किती निरपेक्ष प्रेम आणि आधार देते हे मी जाणते. एक परीक्षक म्हणून मी नेहमी डान्सचा प्रभाव कसा आहे हे बघत असते. त्यामुळे त्यातील तांत्रिक बाजूबरोबरच माझ्या मनाला स्पर्शून जाणाऱ्या परफॉर्मन्सच्या शोधात मी असते. नवीन सीझनबद्दल मी खूप उत्साही आहे आणि सगळे सुपरस्टार आणि त्यांच्या असामान्य मातांना भेटण्यास उत्सुक आहे.

या शोविषयी गीता कपूर म्हणते, एक आई आणि तिच्या मुलामधील मंगल नात्यास अधोरेखित करून या सीझनने एक पुढचे पाऊल टाकले आहे. सोशल मीडियावर आधीच खूप चाहते असलेले स्पर्धक या मंचावर अस्सलतेची चुणूक दाखवतील, आपल्यातली निडर प्रयोगशीलता आणि आपली कल्पना जबरदस्त परफॉर्मन्समध्ये रूपांतरित करण्याची वचनबद्धता दाखवतील. या सगळ्या प्रतिभावान आणि लोकप्रिय स्पर्धकांना भेटण्यास मी उत्सुक आहे. या शोविषयी बोलताना मर्झी पेस्तनजी म्हणतो, या पूर्वी 'सुपर डान्सर'मध्ये अतिथी परीक्षक म्हणून येण्याचे भाग्य मला लाभले आहे. आणि प्रत्येक वेळी, या मुलांमधील जबरदस्त प्रतिभा, त्यांची अदम्य ऊर्जा आणि त्यांनी घेतलेला ध्यास पाहून मी अचंबित झालो आहे. यावेळी पहिल्यांदाच मी या शो मध्ये परीक्षक म्हणून येत आहे. त्यामुळे मला छान वाटते आहे आणि मी थोडा भावुक देखील झालो आहे. सुपर डान्सर सीझन ५ लवकरच येत आहे सोनी एन्टरटेन्मेंट टेलिव्हिजन आणि सोनी लिव्हवर

## शशिकांत धोत्रे निर्मित आणि दिग्दर्शित 'सजना' चित्रपटाचं, मनाला गुंतवून ठेवणारं एक कोवळं प्रेमगीत झोका प्रदर्शित

छत्रपती संभाजीनगर - प्रेम कधी शब्दांत नाही मावत, ते डोळ्यांत दिसतं, हसण्यात मिसळतं आणि शांततेत गुंजतं. दोन मनं एकत्र येत असताना त्यांच्यातली नाजूकशी चाल, हेच त्या प्रेमाचं खरं संगीत असतं. याच भावनेला स्वरबद्ध करत शशिकांत धोत्रे निर्मित आणि दिग्दर्शित 'सजना' चित्रपटाचं एक हळवं गीत झोका आता प्रदर्शित झालंय. प्रेक्षकांच्या हृदयात ठसा उमटवण्यासाठी सज्ज असलेलं झोका हे नवीन मराठी रोमान्टिक गाणं भुंगा म्युझिकच्या बॅनरखाली प्रदर्शित झालं आहे. सूर्यमुखी फुलांच्या सोनसळी शेतात आणि पाण्याखालच्या अद्भुत दृश्यांमध्ये चित्रीत झालेलं हे गाणं प्रेमाच्या कोवळ्या भावना आणि नाजूक क्षणांची प्रभावी पद्धतीने मांडणी करतं.झोका हे गाणं निसर्गाच्या साक्षीने उलगडणाऱ्या एका प्रेमकथेचे सुंदर चित्रीकरण आहे. प्रेमाच्या आठवणींना जागवणारे शब्द आणि सोपं पण सुंदर संगीत या गाण्याची खासियत आहे. गायक-गायिकेचा आवाज आणि त्यांच्या भावना आपल्याला प्रेमातली ती पहिली झोक्याची क्षणं आठवायला लावतात. मराठीत अशा प्रकारचं दृश्य आणि भावनिक सादरीकरण खरंच कौतुकास्पद आहे. हे गाणं नव्या पिढीच्या प्रेमकथेचं एक सुंदर दर्शन घडवतं.ह्या गाण्याचे गायक राजेश्वरी पवार आणि ओंकारस्वरूप हे आहेत. तर संगीतकार सुद्धा ओंकारस्वरूप आहे, गीतकार हे सुहास मुंडे आहेत. या चित्रपटाची निर्मिती स्वतः शशिकांत धोत्रे ह्यांनी केली आहे तर कथा, पटकथा, संवाद आणि दिग्दर्शन सुद्धा शशिकांत धोत्रे ह्यांनी केलं आहे.

# अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या भागाची प्रत्यक्ष पाहणी

## करून अहवाल द्या- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

छत्रपती संभाजीनगर, दि.२६(जिमाका)- गेल्या आठवड्यात जिल्ह्यात अनेक ठिकाणी अवकाळी पाऊस, वीजा, वादळ इ. घटना घडल्या आहेत. यामुळे शेतकऱ्यांचे तसेच अन्य जीवित वा मालमत्तेच्या नुकसानीचे प्राथमिक पाहणी अहवाल प्राप्त असले तरी यंत्रणेने प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन नुकसानीची पाहणी करावी,असे निर्देश आज जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, गटविकास अधिकारी यांच्याशी दुरदृष्य प्रणालीद्वारे संवाद साधला. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित हे सुद्धा या बैठकीस दुरदृष्यप्रणालीद्वारे सहभागी झाले होते. जिल्हा मुख्यालयातून अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर हे उपस्थित होते.

मे महिन्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे जिल्ह्यात ९८ गावे बाधीत झाली असून ५ व्यक्ती मयत तर ५ व्यक्ती जखमी झाले आहेत.६६ जनावरे दगावली आहेत. ६२ पक्क्या घरांची तर ११२ कच्च्या घरांची अंशतः पडझड झाली आहे.जिल्ह्यात एकूण १२४६ शेतकऱ्यांचे ६१६.३ हेक्टर क्षेत्र बाधीत झाले आहे, अशी माहिती देण्यात आली.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, गेल्या आठवड्यात अवकाळी पाऊस झाला आहे. विजा कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत. या नुकसानीची क्षेत्रीय यंत्रणेने प्रत्यक्ष पाहणी करावी. पंचनामे इ. प्रक्रिया करावी व आपला अहवाल पाठवावा.

## मंडळ अधिकारी कार्यालयांच्या सक्षमीकरणासाठी विशेष अभियान

छत्रपती संभाजीनगर, दि.२६(जिमाका)- महसूल प्रशासनातील महत्वाचा दुवा असलेल्या मंडळ अधिकारी यांची कार्यालये जिल्ह्यात सोमवार दि.२ जून पासून कार्यान्वित करण्यात यावी,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले आहेत.मंडळ अधिकाऱ्यांना अधिक कार्यक्षम करण्यासाठी विशेष अभियान राबविण्यात येत आहे. जिल्ह्यात ८९ महसूल मंडळे आहेत. त्यातील काही ठिकाणी मंडळ अधिकाऱ्यांची स्वतंत्र कार्यालये आहेत. काही ठिकाणी ते ग्रामपंचायत, तलाठी कार्यालय येथून कामकाज करतात.

मंडळ अधिकारी हे तलाठी आणि तहसीलदार यांच्यातील महत्वाचा दुवा आहेत. मात्र, सध्या अनेक मंडळ अधिकारी कार्यालये अस्तित्वात नसल्याने महसूल कामकाजाला अडथळा निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर सर्व तहसीलदार आणि उपविभागीय अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील मंडळ अधिकारी कार्यालये सुरू करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

शुक्रवार दि.३० मे पर्यंत आवश्यक जागा निश्चित करून सोमवार दि.२ जून रोजी मंडळ अधिकारी कार्यालये कार्यान्वित करावीत,असे निर्देश देण्यात आले आहेत. शासकीय इमारती उपलब्ध नसल्यास, शासनाच्या नियमांनुसार भाड्याने जागा घेण्याची मुभा देण्यात आली आहे. मंडळ अधिकाऱ्यांना महसूल अधिनियमातील अधिकार, जबाबदाऱ्या आणि कामकाजाबद्दल तातडीने प्रशिक्षण देण्याचेही आदेश आहेत.

या उपक्रमामुळे महसूल कामकाजाला वेग येणार असून, तलाठ्यांना वेळेवर मार्गदर्शन मिळणार आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना फेरफार व तत्सम कामांसाठी स्थानिक स्तरावरच सेवा मिळणार असल्यामुळे महसूल विभागाचा कामाचा दर्जा उंचावेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

## विकसीत कृषी संकल्प यात्रेचा गावनिहाय कार्यक्रम

छत्रपती संभाजीनगर, दि.२६ (जिमाका)- वसंतराव नाईक कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत कृषि विज्ञान केंद्र, पैठण रोड, द्वारे दि.२९ मे ते १२ जून या कालावधीत 'विकसित कृषि संकल्प यात्रा' आयोजीत करण्यात येणार आहे. या यात्रेचा गावनिहाय प्रवास कार्यक्रम या प्रमाणे-

छत्रपती संभाजीनगर तालुक्यात दि.२९ मे कुंभेफळ, भांबरडा, दुधड, मुरुमखेडा, पिंपळखुंटा, लाडसावंगी, दि.३० मे- टोणगाव, हिवरा, जडगाव, जडगाव -२, पिंप्री राजा, आडगाव,दि.३१ मे- सय्यदपूर, औरंगपुरा, ढासला, ढवहापूरी, कासनापूर, फेरण जळगाव दि.१ जून- शेलूद, चारठा, हातमाळी, नायगव्हाण, लामकाना, लामकानावडी

पैठण तालुक्यात दि.२ जून- आडूळ, रजापूर, देवगाव, दाभरूळ, आंतरवाली, एकतूनी, दि.३ जून- बिडकीन, शेकटा, तोंडोळी, लोहगाव खु, लोहगाव खु, लोहगाव बु, मुलानी वडगाव, दि.४ जून- ढोरकीन, कारकीन, टाकळी पैठण, बोरगाव, भालगाव, इसारवाडी, दि.५ जून- पांगरा, निलजगाव, पोरगाव, लाखेगाव, पाडळी, डोणगाव, फुलंब्री तालुक्यात दि.६ जून - सांजूळ, बिल्डा, विटेकरवाडी, गणोरी, किनगाव, वारेगाव,दि.७ जून -पिंपळगाव देव, पिंपळगाव वळण, आडगाव, वाहेगाव, डोंगरगाव शिव, शिरोडी खु., दि.८ जून - पाल/पाथ्री, डोंगरगाव कवाड, पीर बावडा, गिरसावळी, मारसावळी, बाभूळगाव, दि.९ जून- बाबरा, वाहेगाव, निधोना, चिंचोली नकीब, कान्हेगाव, चिंचोली हिवरा, सिल्लोड तालुक्यात दि.१० जून - बनकिन्होळा, निल्लोड, गेवराई सेमी, भवन, केऱ्हाळा, पळशी, दि.११ जून- अन्वी, रहिमांबाद, आसाडी, सारोळा, पानवडद, पांगरी, सोयगाव तालुक्यात दि.१२ जून- जांगला, लोणापूर, सावरखेडा, वरखेडी, फर्दापूर, जामठी.

## एमजीएमच्या प्रा.डॉ.शहनाज बासमेह यांना सुभद्रा कुमारी चौहान पुरस्कार प्रदान

### प्रयागराज येथे पुरस्कार वितरण सोहळा संपन्न



छत्रपती संभाजीनगर, दि.२६ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या प्राध्यापिका डॉ. शहनाज जाफर बासमेह यांना सुभद्रा कुमारी चौहान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हिंदी साहित्यातील त्यांच्या सर्जनशील कार्याबद्दल त्यांना हा सन्मान देण्यात आला आहे. प्रयागराजची साहित्यिक संघटना गुफ्तागुने त्यांची अखिल भारतीय स्तरावर या पुरस्कारासाठी निवड केली. संस्थेच्या निवड समितीने देशभरातील विविध राज्यांमधून क्रीडा, वैद्यक, कला, साहित्य, समाजसेवा आणि पत्रकारिता यासारख्या क्षेत्रात सक्रिय असलेल्या लोकांची निवड केली. या सर्वांना संस्थेच्या वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रमात सन्मानित केले गेले. हा कार्यक्रम प्रयागराज येथे संपन्न झाला.

डॉ.शहनाज जाफर बासमेह यांच्या कविता आणि आलोचनात्मक लेख अखिल भारतीय स्तरावरील विविध वर्तमानपत्रे आणि मासिकांमध्ये प्रकाशित होतात. त्यांची अनेक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. हिंदी साहित्यात त्यांच्या सततच्या अमूल्य योगदानाबद्दल त्यांना प्रतिष्ठित सुभद्रा कुमारी चौहान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. सुप्रसिद्ध अभिनेता राजेंद्र गुप्ता, इलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती क्षितिज शैलेंद्र व न्यायमूर्ती अशोक कुमार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला.

गुफ्तागूच्या निवड समितीच्या बैठकीत गुफ्तागूच्या निवड समितीचे अध्यक्ष डॉ. इम्तियाज अहमद गाझी, नरेश कुमार महारानी, प्रभाकर शर्मा, मनमोहन सिंग, डॉ.वीरेंद्र कुमार तिवारी, अनिल मानव, शिवाजी यादव, अर्चना जैस्वाल, भारत भूषण, शैलेंद्र जय, दयाशंकर मोहन प्रसाद, नेवाशंकर मोहन प्रसाद, कश्मीर शर्मा आणि डॉ.रामनारायण मान्यवर आदि उपस्थित होते.

हा पुरस्कार मिळाल्याबद्दल प्रा.डॉ.शहनाज बासमेह यांचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ.रेखा शेळके,संचालक डॉ.के.पी.सिंग यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## छत्रपती संभाजीनगरमध्ये औद्योगिक व घरगुती ग्राहकांना वीजपुरवठ्यासाठी ट्रान्सफॉर्मर क्षमतेत वाढ

छत्रपती संभाजीनगर : शहर व परिसरातील विजेच्या वाढत्या वापरामुळे यंत्रणेवर येणारा ताण आणि त्यातून वीजपुरवठा खंडित होण्याची समस्या सोडविण्यासाठी महावितरणतर्फे शिवाजीनगर, सातारा व रोशनगेट या निवासी क्षेत्रांसोबतच वाळूज औद्योगिक वसाहतीमध्ये अवघ्या पंधरा दिवसांत २५ एमव्हीएची पॉवर ट्रान्सफॉर्मर क्षमता वाढविण्यात आली. यामुळे २५ हजार घरगुती ग्राहकांसोबत १५०० औद्योगिक ग्राहकांना अधिक दर्जेदार वीजपुरवठा होईल.

महावितरणचे तत्कालिन संचालक (संचालन) अरविंद भादिकर व प्रभारी सहव्यवस्थापकीय संचालक धनंजय औंढेकर यांच्या नेतृत्वात मुख्य अभियंता पवनकुमार कच्छोट, अधीक्षक अभियंता मनीष ठाकरे, बीना सावंत, महेश पवार, कार्यकारी अभियंता प्रसाद महातोले, अविनाश चांदेकर, तत्कालिन कार्यकारी अभियंता महेश पाटील यांच्यासह अभियंते व कर्मचाऱ्यांनी ही कामगिरी केली.

वाळूज एमआयडीसीतील महावितरणच्या ३३ केव्ही ई सेक्टर उपकेंद्रात १० एमव्हीए क्षमतेचे दोन व ५ एमव्हीएचा एक पॉवर ट्रान्सफॉर्मर होता. त्याद्वारे सुमारे ७५२ उद्योगांना वीजपुरवठा करण्यात येतो. एम सेक्टर उपकेंद्रात १० एमव्हीएचा एका व ५ एमव्हीएचे दोन पॉवर ट्रान्सफॉर्मर होते. त्याद्वारे सुमारे ६३१ उद्योगांना वीजपुरवठा करण्यात येतो. मात्र दिवसेंदिवस वाढणाऱ्या विजेच्या मागणीमुळे सुरळीत वीजपुरवठा करण्यात अडथळा निर्माण होत होता. त्यामुळे पॉवर ट्रान्सफॉर्मरची क्षमता वाढविण्यात आली. आता ई व एम उपकेंद्रांची एकत्रित क्षमता अनुक्रमे ३० व २५ एमव्हीए झाल्याने औद्योगिक ग्राहकांना अखंडित व दर्जेदार वीजपुरवठा मिळणार आहे.

शिवाजीनगर परिसरातील ग्राहकांना अखंडित व दर्जे दार वीजपुरवठा करण्यासाठी महावितरणने ३३ केव्ही उपकेंद्रातील पॉवर ट्रान्सफॉर्मरची क्षमतावाढ केली. शिवाजीनगर उपकेंद्रात १० एमव्हीएचा ट्रान्सफॉर्मर नुकताच कार्यान्वित करण्यात आल्यामुळे ७ हजार वीजग्राहकांना दिलासा मिळाला आहे. शिवाजीनगर उपकेंद्रात याआधी ५ एमव्हीए क्षमतेचे प्रत्येकी दोन पॉवर ट्रान्सफॉर्मर होते. उपकेंद्रातून परिसरातील जवळपास १४ हजार ग्राहकांना वीजपुरवठा करण्यात येतो. मात्र दिवसेंदिवस वाढणारी ग्राहकांची संख्या व विजेच्या मागणीमुळे मोरेश्वर व देवगिरी फीडरवर सुरळीत वीजपुरवठा करण्यात अडथळा निर्माण होत होता. आता उपकेंद्रातील दोन्ही पॉवर ट्रान्सफॉर्मरची एकत्रित क्षमता १५ एमव्हीए झाल्याने ग्राहकांना दर्जे दार वीजपुरवठा मिळणार आहे.

सातारा व देवळाई परिसरातील ग्राहकांना अखंडित व दर्जेदार वीजपुरवठा करण्यासाठी महावितरणने ३३ केव्ही उपकेंद्रातील पॉवर ट्रान्सफॉर्मरची क्षमतावाढ केली आहे. यामुळे १२ हजार वीजग्राहकांना दिलासा मिळाला आहे. सातारा उपकेंद्रात १० व ५ एमव्हीए क्षमतेचे दोन पॉवर ट्रान्सफॉर्मर होते. उपकेंद्रातून सातारा व देवळाई परिसरातील जवळपास २८ हजार ग्राहकांना वीजपुरवठा करण्यात येतो. उपकेंद्रात ५ एमव्हीएच्या पॉवर ट्रान्सफॉर्मरची क्षमतावाढ करून तो १० एमव्हीए करण्यात आला. आता उपकेंद्रातील दोन्ही पॉवर ट्रान्सफॉर्मरची एकत्रित क्षमता २० एमव्हीए झाल्याने ग्राहकांना अखंडित व दर्जेदार वीजपुरवठा मिळणार आहे.

## सोयगाव तालुक्यातील जंगलातांडा येथील नवनिर्वाचित सरपंच,उपसरपंच यांची बिनविरोध निवड



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२६ मे : सोयगाव तालुक्यातील जंगलातांडा येथे सोमवार रोजी ग्रामपंचायत कार्यालय मध्ये सरपंच पदी डॉ.वसंत चव्हाण यांच्या पत्नी दुर्गाबाई वसंत चव्हाण तर उपसरपंच पदी हिरा प्रधान राठोड यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

यावेळी सोयगांव येथील आमदार अब्दुल सत्तार यांच्या संपर्क कार्यालयात शिवसेनेच्या वतीने नवनिर्वाचित उमेदवारांचा सत्कार करण्यात आला.सोयगाव येथे शुभेच्छा दिल्या,यावेळी नगरसेवक हर्षल काळे,मोलाना आझाद विकास महामंडळाचे उपाध्यक्ष शेख जावेद,माजी सरपंच विशाल चव्हाण,सामाजिक कार्यकर्ते श्रावण राठोड,रमेश राठोड,डॉ.वसंत चव्हाण,विजय राठोड आदींची उपस्थिती होती.

## सोमवारी (दि.२ जून) लोकशाही दिन

छत्रपती संभाजीनगर, दि.२६ - दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन आयोजित केला जातो. एप्रिल महिन्यासाठी सोमवार दि.२ जून रोजी जिल्हास्तरीय लोकशाही दिन आयोजित करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवार दि.२ रोजी दुपारी १२ वाजता हा लोकशाही दिन होईल, असे उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) श्रीमती संगीता राठोड यांनी कळविले आहे. नागरिकांनी आपले अर्ज, निवेदने सकाळी ११ ते १२ या वेळात दाखल करावे. अर्ज विहित नमुन्यात असावा. तक्रार वैयक्तिक असावी. तालुकास्तरीय लोकशाही दिनात अर्ज दाखल केला असल्यास त्याची पोहोच सोबत आणावी. तसेच न्याय प्रविष्ठ प्रकरण, राजस्व अपिल, सेवाविषयक व आस्थापनाविषयक व लोकशाही दिनात यापूर्वी दाखल केलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

## शिक्षक अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणी आज पासून

छत्रपती संभाजीनगर, दि.२६ - महाराष्ट राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था व खासगी व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये 'पवित'र या संगणकीय प्रणालीद्वारे शिक्षक भरती करीता शिक्षक अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणी -२०२५ या परीक्षेचे ऑनलाईन पद्धतीने नियोजन दि.२७ मे ते ३० मे तसेच २ जून ते ५ जून या कालावधीत करण्यात आलेले आहे. त्यासाठी ऑनलाईन आवेदनपत्र सादर केलेल्या उमेदवारांना प्रवेशपत्राची वेबलिंक महाराष्ट्र राज्य परीक्षा परीषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे आयुक्त अनुराधा ओक यांनी केले आहे.

## मुंबईत पावसाने मोडला १०७ वर्षांचा विक्रम

मुंबई - महाराष्ट्रातील मुंबईत मुसळधार पाऊस सुरू असताना, सोमवारी शहरात मान्सूनच्या पहिल्याच दिवशी १०७ वर्षांतील सर्वाधिक पाऊस नोंदवला गेला आहे. भारतीय हवामान खात्यानुसार, मुंबईत झालेल्या पावसासह, मान्सून नेहमीपेक्षा १६ दिवस आधी शहरात दाखल झाला. नैऋत्य मान्सून आज, २६ मे २०२५ रोजी मुंबईत दाखल झाला आहे, मान्सून नेहमीपेक्षा १६ दिवस आधी मुंबईत दाखल झाला आहे. २००१-२०२५ या कालावधीत मुंबईत दाखल झालेला हा सर्वात जास्त पावसाचा विक्रम आहे,असे आयएमडीने जारी केलेल्या अधिकृत निवेदनात म्हटले आहे.

जा.क्र./नपंसो/नामांतर/२०२५/२०२६ कार्यालय नगर पंचायत सोयगांव
दिनांक : २६-०५-२०२५

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, **भगवान कान्हु सपकाळ** यांनी मोहल्ला ---- सोयगांव स.नं. ----- मधील प्लॉट **१३९१** त्यांचे नांवे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. अर्जानुसार जागेची चतु:सीमा खालील प्रमाणे आहे.

**पूर्व : शेख जाकीर शेख समद यांची जागा** **पश्चिम : सरकारी रस्ता**
**दक्षिण : आज रोजीस मी. ज्योती विठ्ठल सपकाळ यांना कायम खरेदी खताने विक्री केलेली जागा.** **उत्तर : हारुण युसुफ यांची जागा**
आकार : पूर्व पश्चिम **२०×४० = ८००** दक्षिणोत्तर..........
वरील नामांतराबाबतच्या कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसांचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे. मुदती नंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मुख्याधिकारी
नगरपंचायत सोयगाव

जा.क्र./नपंसो/नामांतर/२०२५/२०२६ कार्यालय नगर पंचायत सोयगांव
दिनांक : २६-०५-२०२५

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, **जयश्री रविंद्र मंडवे** यांनी मोहल्ला **सोनसवाडी वार्ड क्र १६** सोयगांव स.नं. ----- मधील घर क्र **१३८१-१३८२** त्यांचे नांवे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. अर्जानुसार जागेची चतु:सीमा खालील प्रमाणे आहे.

**पूर्व : शे. अशिफ युसूफ** **पश्चिम : रस्ता**
**दक्षिण : शे. फारुख शे. हनीफ उत्तर : शे. फारुख शे. हनीफ**
आकार : पूर्व पश्चिम **२०×४० = ८०० चौ. फु.** दक्षिणोत्तर..........
वरील नामांतराबाबतच्या कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसांचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे. मुदती नंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मुख्याधिकारी
नगरपंचायत सोयगाव

### कार्यालय हिंगोली नगर परिषद हिंगोली जि. हिंगोली.

फोन न. (०२४५६) २२१७२७ फक्स ०२४५६) २२१७२७
E-Mail- coud.hingolimaharashtra.gov.in
PMAY घरकुल विभाग जा.क्र. न./पा/ २०२४-२५

### जाहिरात प्रगटन

प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत (pmay) शहरस्तरिय तांत्रिक तज्ञ कशातील (CLTC) तज्ञाची एकत्रित वेतनावर तात्पुरत्या स्वरुपात केवळ केवळ थेट मुलाखतीने (Walk In Interview) नियुक्ती करावयची आहे. खालील नमूद केलेले कंत्राटी पद भरण्यासाठी दि.२८/०५/२०२५ ते ०३/०६/२०२५ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत नगरपरिषद हिंगोली कार्यालयात कार्यालयीन वेळेत आवश्यक कागदपत्रासह खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून अर्ज सादर करावा.

| अ.क्र. | पदाचे नाव | पदसंख्या | मासिक मानधन |
|---|---|---|---|
| १. | शहरस्त्रीय तांत्रिक तज्ञ | ०१ | ३५०००/- |

शेक्षणिक अहर्ता :- मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी (स्थापत्य अभियंता BE-CIVIL).

वयोमर्यादाः कमाल वयोमर्यादा ३८ वर्ष.

अटी व शर्तीः-१. अर्जासोबत १० ते पदवी पर्यंतचे सर्व गुणपत्रक सादर करावे.

२. अनुभव प्रमाणपत्र व गुणपत्रक याशियाय कोणतेही कागदपत्र सादर करू नये.

३. सदर नियुक्ती हि म्हाडाच्या निर्देशानुसार कंत्राटी स्वरुपात राहील.

४. मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान गरजेचे आहे.

५. सर्व आधिकार निवड समितीकडे राखीव ठेवण्यात येईल.

**स्वाक्षरीत**
**(श्री. अरविंद मुंढे)**
**मुख्याधिकारी, हिंगोली नगरपरिषद**

## अग्रलेख...

# अस्तनीतील साप ठेचावेच लागतील

गेल्या १३०० वर्षांपासून हिंदुस्थान सातत्याने परकीय आणि अंतर्गत धोक्यांचा सामना करतो आहे. असा एकही शतकीय कालखंड नाही ज्यामध्ये भारतवासी आनंदाने, सुखाने नांदले असतील. प्रत्येकवेळी कुणाची ना कुणाची वाईट नजर या देशावर पडली. सम्राट चंद्रगुप्त मौर्याच्या काळापर्यंत हिंदुस्थान एक शक्तिशाली देश म्हणून नांदत होता. पण वाळवंटातील हिंस्त्र धार्मिक क्रांतीचे लोट इ. स. ७११ पासून हिंदुस्थानच्या दिशेने वेगाने सरकण्यास प्रारंभ झाला आणि येथूनच या देशातील अशांततेच्या आणि हिंसक पर्वाला सुरुवात झाली. सिंधचा राजा दाहिर हा सुखाने राज्यकारभार करीत असताना अरब सेनापती मोहम्मद बीन कासीमने इ स. ७११ च्या सुमारास सिंधवर पाशवी आक्रमण करीत दाहिरला ठार मारले आणि त्याचा कुटुंब कबिला लुटला. पश्चिमेकडील कुभा अर्थात् आताचे काबूलनंतर राजा दाहिर हाच शेवटचा हिंदू राजा ठरला. राजा दाहिरने तीन युद्धांमध्ये अरब फौजांचा पराभव केला पण सिंधू नदीच्या काठावरील अरोर येथील युद्धात मात्र, या शेवटच्या हिंदू राजाला ठार मारण्यात आले. अरोर हे ठिकाण सध्या रोहरी नावाने ओळखले जाते आणि ते पाकिस्तानच्या सिंध प्रांतातील सुक्कूर जिल्ह्यातील तहसीलचे ठिकाण आहे. अरोरच्या युद्धानंतर सिंध प्रांत हिंदूंच्या ताब्यातून निसटले ते कायमचेच. या युद्धातही दाहिरला त्याच्या राज्यातील काही दगाबाजांनी अरबांना मदत केल्याचा इतिहास आहे. दाहिरनंतर नंबर लागला तो कुभाचा हिंदू राजा जयपालचा. आताच्या अफगाणिस्तानात सन १०११ पर्यंत हिंदुशाही नांदत होती. या हिंदुशाहीचा विस्तार गांधार, सरहिंद आणि हिमाचलमधील कांगडा खोऱ्यापर्यंत होता. म्हणूनच जोपर्यंत हिंदुशाही शाबूत होती तोपर्यंत एकही अरब आक्रमक सिंधू नदी ओलांडू शकला नाही. जयपाल हा शक्तिशाली राजा होता. त्याचे राज्य थेट काश्मीरपर्यंत विस्तारलेले होते. कल्लार, सामंथा, भीमदेवसारखे पराक्रमी आणि शक्तिशाली राजे त्याच्यापूर्वी होऊन गेले. जयपालकडे असलेल्या गजसेनेचा त्याकाळी सर्वत्र दरारा होता. पण, कंदहारचा शासक सबुक्तगीनने वारंवार हल्ले करून जयपालचे राज्य खिळखिळे केले. शेवटच्या युद्धात सबुक्तगीनने दगाबाजी करीत जयपालच्या गजसेनेतील हत्तींना रात्रीच्या सुमारास चोरून मद्य पाजले. त्यामुळे मस्तावलेल्या हत्तींनी जयपालच्या सेनेत गोंधळ घातला. परिणामी जयपालची सेना पराभूत झाली. पुढच्या काही वर्षांमध्येच म्हणजे १०११ च्या आसपास अफगाणिस्तानातील हिंदुशाही कायमची लोप पावली. पुढचा सारा इतिहास आक्रमकांचा आहे. कुणीही रोखणारे नसल्याने महंमद गझनी ते अहमदशहा अब्दालीपर्यंत आणि इंग्रज ते १९४७-४८ मध्ये काश्मिरात घुसलेले पश्तून, बलुच टोळीवाले, असा सारा इतिहास आहे. म्हणजेच इ. स. ७११ पासून तर १९४७ पर्यंत हिंदुस्थानवर परकीय आक्रमकांनी सातत्याने युद्ध लादले. पण, हा किस्सा इथेच संपत नाही. अजूनही आक्रमणे सुरूच आहेत. १९४७-४८, १९६५,१९७१, १९९९ यावर्षी पाकिस्तानने भारतावर आक्रमण केले. वास्तविक पाहता आपल्या उत्तर प्रदेश एवढाही नसलेला पाकिस्तान भारताला नष्ट करण्याची भाषा करतो. म्हणजेच मानसिकदृष्ट्या ते किती कणखर आहेत हे दिसून आले. बेनझीर भुट्टो यांनी तर पंतप्रधान असताना काश्मीरसाठी हिंदुस्थानसोबत एक हजार वर्षे लागली तरी चालतील पण युद्ध करू, अशी घोषणा जाहीरपणे केली होती. वास्तविक पाहता पाकिस्तान्यांमध्ये मुळात एवढी हिंमत येतेच कुठून. त्यांच्यात एवढी हिंमत येण्याचे एकच कारण होते ते म्हणजे हिंदुस्थानने आतापर्यंत दाखविलेला नेभळटपणा, सहिष्णुता आणि आंतरराष्ट्रीय राजकारणात ज्याला कुणीही मोजत नाही, अशी अनावश्यक आणि एकतर्फी शांतता. ज्यांच्या डीएनएमध्येच शांतता नाही त्यांच्यासमोर शांततेची पुंगी वाजवून फायदा तरी काय?

दुसऱ्या महायुद्धानंतर जगात शांतता नांदत असल्याचे वरकरणी वाटत असले तरी जगात कुठल्या ना कुठल्या भागात सातत्याने संघर्ष सुरूच होते आणि आजही आहेत. काश्मीर हा त्यापैकीच एक संघर्षबिंदू. १९४७ पासून सुरू असलेल्या संघर्षात हजारो नागरिकांचा मृत्यू झाला. भारताला संधी असूनही केवळ तत्कालीन राज्यकर्त्यांच्या कचखाऊ धोरणांमुळेच हा प्रश्न चिघळत राहिला. आता संघर्षाचे स्वरूप बदलले आहेत. दोन्ही देशांकडे अण्वस्त्रासाठी मानवी विनाशक अस्त्रे-शस्त्रे असल्याने पूर्ण युद्धाची शक्यता कमीच आहे. अशावेळी लढले जाते ते छद्मी युद्ध, ज्याचा अवलंब पाकिस्तान १९७० पासून करीत आहे. या छद्मी, छुप्या युद्धाची ना सीमा असते ना निश्चित वेळ. या युद्धातील अस्त्रे-शस्त्रे असतात ते देशद्रोही, दगाबाज आणि देशाचा विचार न करता धर्मासाठी वेडे झालेले अस्तनीतील सर्प. 'ऑपरेशन सिंदूर'नंतर भारतीय गुप्तचर विभाग आणि राष्ट्रीय तपास संस्थेने १४ गद्दारांना पकडले आहे. ते कुठल्या जातीचे अथवा धर्माचे आहेत हा भाग सोडा पण अशा जयचंद आणि मिरजाफर प्रवृत्तीच्या लोकांमुळे देशाला वारंवार जखमा होत आहेत. पहलगाम हे त्यातील ताजे उदाहरण. जम्मू-काश्मीरमध्ये विकास झपाट्याने सुरू आहे म्हणून सारेच गाफील असताना पंचस्तंभी नागरिकांची मदत घेऊन दहशतवाद्यांनी बैसरणचे खोरे निष्पाप पर्यटकांच्या रक्ताने लाल केले. १९९३ च्या मुंबईतील साखळी बॉम्बस्फोटाचा कट तर देशद्रोह्यांच्या घरात शिजला. ज्यांना आपण आपले समजत होतो त्यांनीच आपल्याच लोकांचे प्राण घेतले. संसदेवरील हल्ला, मुंबई लोकलमधील बॉम्बस्फोट, अक्षरधाम मंदिर, उरी, पुलवामा येथे सुरक्षा सैनिकांवरील हल्ला असो की पहलगाम, या सर्वच घटनांमध्ये देशद्रोह्यांचा पूर्णपणे सहभाग होता. स्थानिकांच्या सहकार्याशिवाय परकीय आक्रमक देशात घुसणे अशक्य आहे. त्यामुळे अस्तनीतील या सापांना जागीच ठेचणे आवश्यक झाले आहे जे देशाला वारंवर डंख मारत आहेत.

स्थानिक नागरिकांना फितवून, पैशाचे आमिष दाखवून अथवा बळजबरीने शत्रूकडील माहिती मिळविण्याचे प्रकार जगात सर्वत्र सुरू असतात. गेल्या पंधरा दिवसांमध्ये काही लोकांना हेरगिरीच्या आरोपाखाली अटक करण्यात आली. हेरगिरी हे एक अंतर्गत वलय असले तरी दुसऱ्या बाजूला एक इको सिस्टिमही पद्धतशीरपणे कार्यरत असते. २०१४ नंतर ही सिस्टिम अधिकच सक्रिय झाली आहे. २०१६ मध्ये त्राल येथे लष्कराने बुऱ्हान वाणी या दहशतवाद्याला चकमकीत ठार केल्यानंतर तो जणू देशभक्त होता, अशा आर्विभावात त्याच्या समर्थनार्थ खोऱ्यातील नागरिक उतरले होते. वास्तविक पाहता तो एका हेडमास्तरचा मुलगा होता. या हेडमास्तरला सरकारच्या खात्यातून वेतन मिळत असे. पण, आपल्याच पुत्राला मादरे-ए-वतनचा धडा देण्यास हेडमास्तर कमी पडले. पाकिस्तानात तर बुऱ्हानला नायकाच्या रूपात जनमानसात रंगविण्यात आले. काश्मीर खोऱ्यातही बंडखोरांनी नुसता उच्छाद मांडला होता. प्रत्येक शुक्रवारी हिंसाचार ठरलेलाच होता. तो वाकड्या तोंडाचा हुरियतचा नेता यासिन मलिक तर श्रीनगरमधील त्याच्या घरात काश्मिरी मखमलीच्या लोडाला पाठ टेकवून भारताला धमक्या देत होता. नेतृत्व कणखर, देशप्रेमाने ओतप्रोत असले आणि दिशा स्पष्ट असली तर काय होते हे २०१९ नंतर स्पष्टपणे दिसून आले. काळ्या नागासारखा भारतावर फुत्कारणारा बंडखोर यासिन मलिकच्या मुसक्या आवळून त्याचा माज उतरविला. आता तो जन्मभरासाठी चार भिंतींच्या आत सडणार आहे. 'अजय्यां च विश्वस्य देहीश शक्तिं, सुशीलं जगद्येन नम्रं भवेत्' या ओळीप्रमाणे आपण इतके शक्तिशाली व्हावे की जगात आपल्यावर कुणीही विजय मिळवू शकणार नाही. त्यामुळे आपण सज्जनतेचा दागिना अंगावर घालून चालणार नाही. कारण, केवळ सज्जनता हे रक्षण करू शकत नाही, हे आपला इतिहास ओरडून सांगत आहे. सज्जनतेबरोबर बलशाली असणेही आवश्यक आहे. बाह्य धोक्यांचा आपण ब्रह्मोस, आकाश, भार्गवास्त्र, नागास्त्राचा वापर करून सामना करू शकतो, पण आपल्याच घरात लपलेल्या विषारी नागांचे काय? हे अस्तनीतील साप सातत्याने डंख मारत असतात. या विषारी नागांना ठेचण्यासाठी सनातनी शक्ती एकाच झेंड्याखाली एकत्र येणे आवश्यक आहे.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# सर्वोच्च न्यायालयासमोरील 'धर्मसंकट'!

सर्वोच्च न्यायालयासमोर एक धर्मसंकट उभे होऊ घातले आहे. हे धर्मसंकट आहे आपल्याच एका निवाड्यावर फेरविचार करून त्यावर कायम राहावयाचे की राष्ट्रपतींनाही एक मर्यादा सांगण्याचे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी कलम १४३ (१) अंतर्गत सर्वोच्च न्यायालयाकडे एका प्रकरणात अभिमत मागितले असून, न्यायालयासमोर १४ प्रश्न उपस्थित केले आहेत. याचे उत्तर देताना हे धर्मसंकट उभे होणार आहे.

**८ एप्रिलचा निवाडा** : सर्वोच्च न्यायालयाचे न्या. पारडीवाला व न्या. महादेवन् यांनी ८ एप्रिल रोजी एक निवाडा देत, राष्ट्रपती व राज्यपालांसमोर विचाराधीन असलेल्या विधेयकांवर त्यांनी ९० दिवसांत निर्णय घ्यावा असे बंधन घालण्यात आले आहे. आजवर राष्ट्रपती वा राज्यपालांवर असे कोणतेही बंधन नव्हते. राज्य विधानसभेने पारित केलेल्या विधेयकांना मंजुरीसाठी राज्यपालांकडे पाठविले जाते. त्यावर राज्यपालांनी एका विशिष्ट कालावधीत निर्णय करावा असे राज्यघटनेत कुठेही म्हटलेले नाही. हीच बाब देशाच्या राष्ट्रपतींनाही लागू होत असे. संसदेने पारित केलेल्या विधेयकांना राष्ट्रपतींनी किती दिवसांत मंजुरी द्यावी वा देऊ नये असे घटनेत कुठेही म्हटलेले नाही.

**प्रकरण तामिळनाडूचे** : पंजाब, केरळ व तामिळनाडू या राज्यांमध्ये राज्य सरकार आणि राज्यपाल यांच्यात यावरून वाद सुरू झाला. राज्य विधानसभांनी पारित केलेली विधेयके मंजुरीसाठी राज्यपालांकडे पाठविण्यात आली असता, राज्यपालांनी त्यावर कोणताही निर्णय घेतला नाही. कारण, राज्यपालांनी ते विधेयक फेरविचारार्थ विधानसभेकडे परत पाठविल्यास आणि विधानसभेने ते पुन्हा मंजूर केल्यास त्याला मंजुरी देणे राज्यपालांवर बंधनकारक असते. बहुधा याचाच विचार करीत राज्यपालांनी काही विधेयकांबाबत कोणताही निर्णय न घेण्याचे धोरण स्वीकारले होते. आता यासाठी सर्वोच्च न्यायालयाने एक कालावधी निर्धारित केला असून, राज्य विधानसभेने पुन्हा एकदा पारित केलेल्या विधेयकास राज्यपालांनी एका महिन्याच्या कालावधीत मंजुरी द्यावी असे बंधन त्यांच्यावर घालण्यात आले आहे.

**तामिळनाडूतील शीतयुद्ध** : तामिळनाडूतील स्टॅलिन सरकार आणि राज्यपाल रवि यांच्यात यावरून शीतयुद्ध सुरू होते. प्रकरण चिघळल्यानंतर तामिळनाडू सरकारने सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याचा निर्णय घेतला. यावर न्यायालयात जोरदार सुनावणी झाली आणि ८ एप्रिल रोजी न्यायालयाने आपला निवाडा देत राष्ट्रपती व राज्यपाल यांच्यासाठी ९० दिवसांची कालमर्यादा निश्चित केली. वास्तविक हा सारा विषय राज्य सरकार आणि राज्यपाल यांच्या संदर्भात होता. पण, न्यायालयाने आपल्या आदेशात राष्ट्रपतींनाही ही बाब लागू केली. भारतीय राज्यघटनेत जी बाब राज्यपालांसाठी सांगण्यात आली आहे,



तीच बाब राष्ट्रपतींसाठीही सांगण्यात आली आहे असा युक्तिवाद देत सर्वोच्च न्यायालयाने ९० दिवसांची कालमर्यादा राष्ट्रपतींनाही लागू केली.

**सावध प्रतिक्रिया** : सर्वोच्च न्यायालयाच्या या निवाड्यावर देशाचे ॲटर्नी जनरल आर. वेंकटरामाणी यांनी सावध प्रतिक्रिया दिली. राष्ट्रपतींना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिली जाणे आवश्यक होते असे मत त्यांनी नोंदविले. ही प्रतिक्रिया योग्य अशीच होती. राष्ट्रपती हे देशाचे प्रमुख. भारतीय राज्यघटनेत त्यांचे स्थान सर्वोच्च ठेवण्यात आले आहे. त्यामुळे त्यांना एखादी बाब लागू करण्यापूर्वी त्यांची बाजू ऐकून घेणे योग्य ठरले असते. पण, सर्वोच्च न्यायालयाने राज्यपाल व राष्ट्रपती यांना एकच निकष लावीत राज्यपालांबाबत निवाडा देताना तो राष्ट्रपतींनाही लागू केला.

**आव्हान अपेक्षितच** : सर्वोच्च न्यायालयाच्या या निवाड्यास केंद्र सरकारकडून आव्हान दिले जाईल हे अपेक्षित होतेच. त्याचे प्रारूप- स्वरूप कसे असेल हे फक्त स्पष्ट झाले नव्हते. आता राष्ट्रपतींनी कलम १४३ (१) अतंर्गत यासंदर्भात न्यायालयाचे अभिमत मागताना १४ प्रश्नही उपस्थित केले आहेत. राष्ट्रपती वा राज्यपाल यांनी त्यांच्याकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आलेल्या विधेयकांबाबत विशिष्ट कालावधीत निर्णय घेतलाच पाहिजे अशी कोणतीही तरतूद राज्यघटनेत नाही. अशा स्थितीत सर्वोच्च न्यायालयाने, ९० दिवसांत निर्णय करा अन्यथा मंजुरी गृहीत धरली जाईल हा जो नवा सिद्धांत सांगितला आहे, त्यावरही राष्ट्रपतींनी सर्वोच्च न्यायालयाचे मत मागितले आहे आणि असे करताना सर्वांत मोलाचा प्रश्न न्यायालयासमोर उपस्थित केला आहे.

**लाखमोलाचा प्रश्न** : संसद वा विधानसभा यांनी कितीही मोठ्या मताधिक्याने एखादा कायदा पारित केला असला तरी, राष्ट्रपती वा राज्यपालांची मंजुरी मिळेपर्यंत त्याला कायद्याचे स्वरूप येत नाही. ही बाब राज्यघटनेत नमूद करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या निवाड्याचा विचार करता, ९० दिवसांची कालमर्यादा उलटून गेल्यानंतर राज्यपाल व राष्ट्रपतींच्या मंजुरीची आवश्यकता राहणार नाही. आणि म्हणून राष्ट्रपतींनी सर्वोच्च न्यायालयासमोर उपस्थित केलेला महत्त्वाचा प्रश्न आहे, राज्यपालांनी राज्यघटनेच्या कलम २०० अंतर्गत मंजुरी न दिलेला कायदा, हा कायदा मानला जाईल काय?

**बंधनकारक नाही** : सर्वोच्च न्यायालयाला या सर्व प्रश्नांची उत्तरे वा अभिमत राष्ट्रपतींना सादर करावयाचे आहे. मात्र, तो स्वीकारणे राष्ट्रपती वा केंद्र सरकारसाठी बंधनकारक राहणार नाही. सर्वोच्च न्यायालयाचा निवाडा बंधनकारक असतो. मात्र, कलम १४३ (१) अंतर्गत मागण्यात आलेला व देण्यात आलेला सल्ला बंधनकारक मानला जात नाही.

**दोन पर्याय** : सर्वोच्च न्यायालयसमोर दोन पर्याय आहेत. एकतर न्यायालय आपल्या निवाड्यावर कायम राहून तसा निवाडा देईल वा मग आपलाच निवाडा बाजूला सारीत नवी भूमिका मांडेल. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या ८ एप्रिलच्या निवाड्यावर ठाम राहण्याचा निर्णय घेतल्यास, मग हा सारा विषय एखाद्या मोठ्या घटनापीठाकडे जाऊ शकतो. केंद्र सरकार फेरविचार याचिका दाखल करीत, ८ एप्रिलच्या निवाड्यावर फेरविचार करण्याची मागणी करू शकते. मात्र, त्यापूर्वी सर्वोच्च न्यायालय राष्ट्रपतींसमोर कोणते अभिमत सादर करते हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

**तोडगा काय?** : सर्वोच्च न्यायालयाने आपला निवाडा बदलल्यास, मग काही राज्यांमध्ये पुन्हा एकदा लोकनिर्वाचित सरकार विरुद्ध केंद्र सरकार नियुक्त राज्यपाल असा संघर्ष सुरू होऊ शकतो. राज्यपाल पुन्हा एकदा विधानसभेने पारित केलेल्या विधेयकांना व्हेटो लावू शकतात. त्या स्थितीत राज्य सरकारांनी सर्वोच्च न्यायालयाकडे धाव घेतल्यास, न्यायालय आम्ही काहीच करू शकत नाही असे म्हणत स्वत:ची असहायता जाहीर करणार काय अशी स्थिती निर्माण होऊ शकते.

**उपराष्ट्रपतींचे टीकास्त्र!** : सर्वोच्च न्यायालयाच्या ८ एप्रिलच्या निवाड्यानंतर उपराष्ट्रपती जगदीप धनकड यांनी सर्वोच्च न्यायालयावर जोरदार टीकास्त्र सोडले होते. सर्वोच्च न्यायालय आता 'सुपर संसद' झाली आहे, अशा शब्दांत धनकड यांनी आपली नाराजी नोंदविली होती. सर्वोच्च न्यायालयाला न्यायदानाचा अधिकार आहे. पण, आता न्यायालये स्वत:चा वापर लोकशाही शक्तींच्या विरोधातील अण्वस्त्राप्रमाणे करू लागली आहेत अशी परखड भाषा धनकड यांनी वापरली होती. या साऱ्या पृष्ठभूमीवर राष्ट्रपतींनी सर्वोच्च न्यायालयाकडे मागितलेले अभिमत महत्त्वाचे ठरणार आहे.

## वेध

**अनिल फेकरीकर**

# जैविक कुंपण लावा, वन्यप्राण्यांना रोखा!

वन्यप्राण्यांचा शेतमालावर हल्ला, हा प्रकार आता शेतकऱ्यांसाठी नवीन राहिलेला नाही. यामुळे शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान होते. आता नुकसान होते हीच चर्चा करण्यापेक्षा उपाय शोधायला हवेत. तो उपाय जैविक कुंपणात दडलेला आहे. नव्हे विदर्भात हा प्रयोग काही शेतकऱ्यांनी करून तो यशस्वी करून दाखविला आहे. म्हणूनच जैविक कुंपण लावा अन् वन्यप्राण्यांना रोखा हा नवा फॉर्म्युला शेतकऱ्यांनी मनापासून अंगीकारण्याची वेळ आली आहे. हा फॉर्म्युला त्यांनी अंमलात आणल्यास केवळ शेतीचे संरक्षणच होणार नाही, तर त्यातून त्यांना पैसाही मिळेल. जैविक कुंपण लावायचे झाल्यास उंच झाडांची गरज भासते. यात काटेरी बांबू, बेल, हिंगणबेट, शमी, भराटी, बोर, सिंधी, जंबेरी, चिचबिलाई, करवंद, सागरगोटी, येरुणी, हिनामेहंदी, अगेव, नागफणी, निरगुडी, रुई, चिलार, लॅनटेना आदींचा वापर केला जातो. ही सर्व झाडे लावल्यानंतर त्यांना चार वर्षे जपावे लागते. त्यानंतर पुढील ३० ते ४० वर्षे त्याचा फायदा शेतकऱ्यांना होत असल्याची माहिती कृषी महाविद्यालय नागपूरचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. विजय इलोरकर यांनी दिली. वनांलगत असलेल्या शेतीला नेहमीच वन्यप्राण्यांचा धोका असतो. वन्यप्राणी थेट शेतात घुसतात आणि होत्याचे नव्हते करून निघून जातात. मात्र जेव्हा केव्हा जैविक कुंपणाचा प्रयोग शेतीभोवती केला जाईल, तेव्हा या प्राण्यांना आत घुसणे कठीण होईल. कारण या सर्व झाडांना काटे असतात. ते काटे वन्यप्राण्यांसाठी



कर्दनकाळ ठरतात. म्हणून ती जनावरे अशा काटेरी झुडपातून जाणे टाळतात. आता शेतीच्या सभोवताल समजा काटेरी झाडांचे सुरक्षा कवच लावले तर ते प्राणी जातील कुठून? परिणामी शेतातील शेतमाल सुरक्षित राहून शेतकरी संकटमुक्त होऊ शकतो.

पूर्वी उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी असेच समीकरण होते. कालांतराने यात बदल झाला अन् नोकरी उत्तम ठरली. व्यापारही मालामाल झाला. पण जी शेती उत्तम होती ती केव्हा तोट्याचा धंदा झाली हे कळलेच नाही. तसे पाहता शेती संपुष्टात आली तर आपण खायचे काय? दगड, विटा, संगणक आपण खाणार आहोत का? याचे उत्तर नाही असेच द्यावे लागेल. मग शेती उत्तम कशी होईल, अशा स्वरूपातील मार्ग शोधणे आवश्यक आहे. तोच मार्ग जैविक कुंपणातही दडलेला आहे. दुर्दैवाने हा मार्ग अनेक शेतकऱ्यांनी अद्याप स्वीकारलेला नाही. ते पारंपरिक पद्धतीने बोराचे झाड तोडतात आणि दरवर्षी कुंपण लावतात. यातून त्यांना फारसा फायदा होत नाही. उत्पन्न तर मिळतच नाही. यात त्रास खूप होतो. मग शेतकऱ्यांनी जैविक कुंपणाचा पर्याय का निवडू नये, असाही सर्वोत्तम विचार आता पुढे आला आहे. शेतकऱ्यांची मानसिकता आता बदलली आहे. पूर्वी एखाद्या शेतात कुणाची गाय आली तर चिंता नव्हती. आता गाय धुऱ्याजवळही दिसू नये असाच प्रयत्न शेतकऱ्यांचा असतो. त्यांचे पीक महत्त्वाचे आहेच, पण मग गाईचा एवढा द्वेष का सुरू झाला, याचेही उत्तर शोधावे लागेल. त्याचे उत्तर जैविक कुंपणातून मिळेल. जैविक कुंपण केवळ वन्यप्राण्यांनाच रोखणार असे नसून, ते उत्पन्नाचा मोठा स्रोतही देणार आहे. या बळावर काही शेतकरी स्वत:चा उद्योगही उभारू शकतात. समजा दहा एकर शेती आहे. त्या सभोवताल करवंदाचे जैविक कुंपण केले तर मोठ्या प्रमाणात त्याचे उत्पन्न मिळेल. त्यातून लोणचे आणि इतरही पदार्थ तयार करता येतील. तेही विकून शेतकरी पैसा मिळवू शकतात. पण हे करणार कोण? तसे पाहता याकरिता शासनाच्या योजना आहेत. फक्त त्या योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाहीत. विद्यार्थी शाळेत येत नसेल तर शाळेनेच त्याच्या घरी जावे, असा फॉर्म्युला स्वामी विवेकानंदांनी १५० वर्षांपूर्वी सांगितला होता. त्यातूनच डीटीएच सुरू झाले. मग प्रशासन तो प्रयोग का करीत नाही, यावर चिंतन व्हायला हवे. संत म्हणतात, 'जे जे आपणाशी ठावे, ते इतरांना सांगावे, शहाणे करून सोडावे सकळजन ।' मग येथे ती संतांची भूमिका प्रशासन स्वीकारत का नाही? प्रशासकीय अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांनी फक्त पगार घ्यायचा, खुर्च्या तोडायच्या अन् घरी जायचे हा प्रकार आता थांबायला हवा. प्रत्येकाची जबाबदारी निश्चित व्हावी. त्यानुसार त्याचे प्रगतिपुस्तकही तयार व्हावे. त्याच बळावर त्यांची पदोन्नती, पगारवाढ व्हावी. जेव्हा हे सर्व प्रत्यक्षात होईल, तेव्हा जैविक कुंपणाचा प्रयोग विदर्भात यशस्वी होईल. नव्हे तोच प्रयोग वन्यप्राण्यांना रोखण्याचा राजमार्ग ठरेल.

९८८१७१७८५९

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# स्वा. सावरकर आणि सामाजिक समरसता

स्वातंत्र्यवीर सावरकरांचे नाव उच्चारल्याबरोबर आपल्याला त्यांच्या जीवनातील विविध देदीप्यमान गोष्टी आठवतात. सावरकर म्हणजे त्याग, सावरकर म्हणजे तेजस्विता, सावरकर म्हणजे तपस्विता, सावरकर म्हणजे जहाजातून मारलेली साहसी उडी, सावरकर म्हणजे अंदमानातील काळ्या पाण्याची शिक्षा, सावरकर म्हणजे अभिनव भारत, सावरकर म्हणजे क्रांतिकारकांचे प्रेरणा केंद्र. परंतु त्यांच्या जीवनातील त्यांनी रत्नागिरीच्या स्थानबद्धतेमध्ये असताना केलेल्या सामाजिक सुधारणांच्या प्रयत्नांना फारशी प्रसिद्धी दिली गेली असे वाटत नाही. सामाजिक समरसतेसाठी त्यांनी केलेले श्रम आणि प्रयत्न हे फार कोणाच्या बोलण्यात दिसत नाही. परंतु सामाजिक समरसतेसाठी कार्य करणाऱ्या समाजातील सर्वांनीच या क्रांतिकारक शिरोमणीचे जीवन आणि त्यांनी सामाजिक सुधारणेसाठी केलेले प्रयत्न अभ्यासण्याची आवश्यकता आहे.

अंदमानातून सुटल्यावर सावरकरांना रत्नागिरीमध्ये स्थानबद्ध करण्याचा आदेश सरकारने दिला होता. अशा वेळेस एखादी आसेतुहिमाचल फिरणारी व्यक्ती नाराज झाली असती, खचली असती परंतु सावरकरांनी रत्नागिरीच्या वास्तव्याचा सामाजिक सुधारणांसाठी सर्वोच्च वापर करून घेतला. प्लेगच्या निमित्ताने काही काळ सरकारने त्यांना नाशिकमध्ये राहण्याची अनुमती दिली. त्यावेळेला त्यांनी सरकारची परवानगी घेऊनच नाशिकच्या आजूबाजूच्या भगूर, त्र्यंबकेश्वर, येवला, नगर इत्यादी ठिकाणी भेटी दिल्या. रत्नागिरी येथील अस्पृश्यता नष्ट करण्याच्या कार्याला सुरुवात व्हायची होती तरीसुद्धा भगूरला त्यांनी एका दलित समाजाच्या व्यक्तीच्या घरी चहा घेतला. शंभर वर्षांपूर्वी स्वा. सावरकरांनी केलेले हे कार्य किती मोठे होते त्याची प्रचीती आपल्याला येईल.

१९२७-२८ च्या काळात स्वातंत्र्यवीर सावरकर रत्नागिरी येथे स्थानबद्ध असताना त्यांना समाजात अशी एक समस्या दिसली ती म्हणजे शाळांमध्ये दलित विद्यार्थ्यांना इतरांच्या बरोबर बसविले जात नव्हते, तर त्यांना वेगळे बसविले जात होते. या प्रकरणी सावरकरांनी विविध ठिकाणी व्याख्याने दिलीत व विविध शाळांच्या संस्थाचालकांशीही चर्चा केली. सावरकर त्यांना म्हणाले, ज्या दलित बंधूंच्या मुलांना तुम्ही सर्वांसोबत बसवत नाही तीच व्यक्ती ख्रिश्चन किंवा मुसलमान झाल्यावर तुमच्या बाजूला बसू शकते ही किती लाजिरवाणी गोष्ट आहे. त्यामुळे ती परधर्मात जायच्या आधीच जर तिला आपण आपल्याबरोबर बसविले, सन्मानाने वागणूक दिली तर लोक आपला धर्म सोडून इतर धर्मात जाणार नाही.



हळूहळू सावरकरांच्या या समजूतदारीने केलेल्या भाषणाचा संस्थाचालकांवरही परिणाम होऊ लागला व विविध शाळांमध्ये सर्वच जाती-जमातीच्या मुलांना एकमेकांच्या सोबत बसविण्यात येऊ लागले. पूर्वी ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या शाळेतच अशा पद्धतीने मुलांना एकत्र बसविण्यात येत होते. परंतु त्या ठिकाणी एखाद्या मुलाचा स्पर्श ख्रिश्चन किंवा मुस्लिम विद्यार्थ्याला झाला तर मिशनरी त्यांना म्हणायचे की, आता तू हिंदू राहिलेला नाही. आता तू आमच्या धर्मात येऊन जा. परंतु सावरकरांनी चालविलेल्या या कार्यामुळे त्यावेळेस अमेरिकी ख्रिश्चन मिशनला आपले चंबू गबाळे उचलावे लागले आणि मोठ्या निराशेने त्यांना रत्नागिरी सोडून परत जावे लागले. अशाप्रकारे सावरकरांनी एक मोठी सुधारणा घडवून आणली.

१९२४ झाली डॉ. आंबेडकर यांनी अस्पृश्यांच्या उद्धारासाठी चळवळ उभी केली. त्याला सगळ्यात पहिले पाठिंबा स्वा. सावरकरांनी दिला. त्या काळामध्ये अस्पृश्यांना मंदिरामध्ये प्रवेश नव्हता. रत्नागिरीचे विठोबाचे मंदिर संपूर्ण जिल्ह्यात प्रसिद्ध होते. या मंदिरामध्ये अस्पृश्यांना प्रवेश द्यावा यासाठी स्वा. सावरकर आणि मंदिराचे विश्वस्त तसेच गावातील इतर सनातनी कर्मठ हिंदू यांच्यामध्ये बरेच वादविवाद झाले. पण सरतेशेवटी सावरकरांनी अस्पृश्यांसह विठ्ठल मंदिरात प्रवेश केला. त्यांनी अखिल हिंदू गणेशोत्सव सुरू केले. या गणेशोत्सवांमध्ये सुद्धा अस्पृश्यांना पूजा करण्यापासून, आरती करण्यापर्यंत सर्वच प्रकारचे अधिकार देण्यात आलेले होते. हिंदू गणेशोत्सवात एका भंगी समाजाच्या हिंदू माणसाने गायत्री मंत्र व वेदमंत्र म्हटले ही त्यावेळी खूप मोठी घटना होती.

मालवणमध्ये अस्पृश्यता विमोचन परिषद भरलेली होती. त्याचे अध्यक्षस्थान सावरकरांनी स्वीकारावे अशी त्यांना दलित समाजाकडून विनंती करण्यात आली. येथे केलेल्या आपल्या भाषणामध्ये स्वा. सावरकर म्हणाले, अनेक पिढ्यांपासून वेदाध्ययन कोणी करावे याबाबत वाद सुरू आहे. परंतु मी आज तो वाद संपवणार आहे. सावरकर म्हणाले, हे घ्या ते वेद आणि हे घ्या ते जानवे. तुम्हीही वेद वाचा आणि यज्ञोपवीत घाला. भूतकाळात जे झाले ते झाले. आता आपण अशी प्रतिज्ञा करू की, आम्ही आमच्या भूतकालीन चुका सुधारू आणि हिंदू वैभव व हिंदू गौरव पुन्हा प्राप्त करून घेऊ. १९३१ मध्ये भागोजी कीर यांना सावरकरांनी एक सुंदर मंदिर बांधायला सांगितले व पुढे तेच पतीत पावन मंदिर असे ओळखले जाऊ लागले. या मंदिरामध्ये सर्वच जाती-जमातीच्या हिंदूंना मुक्त द्वार देण्यात आले होते. सावरकरांची ही एक मोठी युगप्रवर्तक कामगिरी होती.

त्यावेळेस फारशी उपाहारगृहे नव्हती आणि जी होती त्यामध्ये सुद्धा सर्व हिंदू एकत्र बसून अल्पाहार करीत नव्हते. हे बघून सावरकरांच्या प्रेरणेने एका ब्राह्मण तरुणाने अखिल हिंदू उपाहारगृह सुरू केले. त्या काळामध्ये रोटीबंदी हा सुद्धा एक प्रकार फार मोठ्या प्रमाणावर होता. सर्व जातीचे लोक एकत्र बसून जेवत नव्हते. त्यामुळे स्वा. सावरकरांनी सर्व जातीच्या लोकांना एकत्र करून त्यांचे एक मोठे सहभोजन घडवून आणले व त्यानंतर अशा पद्धतीचे सहभोजन अनेक ठिकाणी झाले. स्वा. सावरकर हे एक असे युगपुरुष होते ज्यांनी सामाजिक सुधारणेच्या ज्या कामासाठी मोठमोठे सुधारणावादी पुढे जायला धजत नसत अशा कामालाच त्यांनी हात घातला. इंग्रज सरकारने त्यांना रत्नागिरीला स्थानबद्ध केले होते जेणेकरून त्यांनी रत्नागिरीच्या बाहेर कुठे जाऊ नये परंतु या शिक्षेचे सुद्धा त्यांनी संधीमध्ये रूपांतर केले आणि आपल्या जिल्ह्यापुरते का होईना त्यांनी सामाजिक सुधारणा घडवून आणून दाखविली.

दलित समाजामध्ये जन्माला आलेल्या महापुरुषाने त्या समाजाच्या उद्धारासाठी जर काही केले तर ती एक अतिशय नैसर्गिक आणि स्वाभाविक गोष्ट आहे. परंतु ''आम्ही सकल हिंदू बंधू बंधू'' या गोष्टीचे सत्यत्व अंत:करणाला पटून त्यानुसार कार्य करणारे स्वातंत्र्यवीर सावरकर हे खरे हिंदुत्ववादी व समाजसुधारक होते असे आपणास म्हणावे लागेल.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### या देशांना दहशतवाद मान्य आहे तर!

जगाच्या पाठीवर दहशतवादाचे सावट असताना, जगामध्ये असेही देश आहेत, जसे की चीन, अझरबैजान हे देश दहशतवादाला खतपाणी घालतात. २२ एप्रिलला हिंदूंना धर्म विचारून मारण्यात आले. प्रत्येक देशात दहशतवादी कारवाई थोड्या किंवा मोठ्या प्रमाणात झालेली आहे. अमेरिका सुद्धा या दहशतवाद्यांच्या हल्ल्यापासून सुटली नाही. एवढे असून सुद्धा आज दहशतवाद्यांना पोसणारा नव्हे, दहशतवादी कारवाई करणारा देश म्हणजे पाकिस्तान. याला युद्धासाठी हवी ती मदत काही देशांकडून पुरवण्यात येत आहे. मग ते अस्त्रे-शस्त्रे असो किंवा पैशांच्या माध्यमातून दहशतवाद्यांचे मनोबल वाढवण्यात येत आहे. म्हणजे या देशांना दहशतवाद मान्य आहे तर. मग दहशतवादापेक्षा हे देश वेगळे कसे, हा प्रश्न मनात येतो. पाकिस्तानसोबत अशा देशांशी सुद्धा कुठलेही राजकीय, व्यापारी, आर्थिक आणि सामाजिक व्यवहार न करता त्याचा भारताने बहिष्कार करावा असे वाटते.

**डॉ. भारती अनिल हेडाऊ**/यवतमाळ

### सज्जनहो, सोशीकता आणखी वाढवा!

वर्तमानपत्रात, टीव्ही चॅनेलवर पिंपरी-चिंचवडच्या हगवणे कुटुंबातील पुरुषांनी व महिलेने दोन वर्षांपूर्वी विवाह केलेल्या आपल्या तरुण सुनेचा अधिक पैशाकरिता अनन्वित छळ केला व तिच्या मृत्यूला कारणीभूत ठरले. त्याच सुनेच्या लग्नात लाखो रुपये, मोठी कार, लाखोंचे सोने, चांदी, महागडा लग्न सोहळा असा दीड दोन कोटींचा खर्च झाला आणि तोही प्रेमविवाहात.

एवढा अमानवीय भीषण गुन्हा झाला असताना आपल्या प्रथेप्रमाणे, राग, संताप व्यक्त करण्याकरिता घराची किंवा कार्यालयाची तोडफोड न करण्याचे कारण आता आपण सज्जन, शांत, सोशीक, कितीही अमानुष गुन्हा घडो आपले धैर्य सोडायचे नाही अशा उच्च विचारांचे झालो ही आहे काय? खरे तर कालपर्यंत हीच स्टाईल होती ना आंदोलन करण्याची? फार पूर्वीचे सोडून द्या (आपण त्याशिवाय काय करू शकतो) पण नुकत्याच घडलेल्या दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल प्रकरणी, डॉ. घैसास यांच्या प्रकरणी काय घडले, कसे आंदोलन झाले ही आठवण करायची पण प्राज्ञा नाही ना? तेव्हा प्रचंड नाहक बदनामीही केली राजकीय धुरंधरांनी. पण आता ते तोंडात मूग गिळून बसले आहेत. आरोपींमध्ये माणसं कोणत्या जातीची आहेत, त्यांचे धनदांडगेपण, राजकीय वजन, उपद्रवमूल्य पाहून आंदोलनाचं, बदनामीचं स्वरूप ठरतं, या दाव्याला यामुळे पुष्टी मिळते. सुशिक्षित, समंजस, कायद्याचा आदर करणाऱ्या आणि सोशीक समाजाचे दुर्दैव, असे म्हणून पुढचा वार झेलायची तयारी ठेवायची. बाकी काही नाही.

**रवी वाघमारे**/नागपूर

### वैष्णवीचा नाहक गेलेला बळी

गेले चार-पाच दिवस दूरदर्शनवर वैष्णवी हगवणेच्या दुर्दैवी मृत्यूच्या बातम्या ऐकल्या आणि मन विषण्ण झाले. सध्या समाजात पालक वर्ग आपल्या मुलीच्या विवाहसंबंधी हतबद्ध झालेले असल्याचे चित्र समोर येताना दिसते. हुंडाबळीच्या १९९० ते २०००च्या काळातील बातम्यांना परत जाग आली की काय? शिक्षण, सुबत्ता आणि सुसंस्कृतपणा यांचा मेळ बसविणे सर्वस्वी पालकांच्या हातात असताना विचारात एवढा निष्काळजीपणा कुठून येतो? आणि त्याची साक्ष म्हणजेच वैष्णवीचा मृत्यू म्हणावा लागेल.

केवळ आणि केवळ घराण्याची इभ्रत आणि लोक काय म्हणतील या भ्रामक कल्पनेतच पालकांनी तिचा बळी दिला असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. कारण सासरच्या लोकांचा पैशाचा मोह, मोठ्या सुनेचा त्यांनी केलेला छळ आणि त्यांच्यावर तिने केलेली पोलिस केस हे माहीत असून सुद्धा मुलीला परत सासरी पाठविणे हे अयोग्यच ठरते. मुलीला असणारे लहान बाळ मोठ्या कुटुंबाचे माहेर असून सुद्धा कोणाच्या आशेवर जगणार? या विचारानेच मन हेलावून जाते. त्या बालकाचा काय दोष आहे? मुली शिकल्या, आधुनिक झाल्या, वेशभूषा बदलली, अपेक्षा वाढल्या म्हणजे नेमके काय बदलले याचा शोध पालकांनीच घ्यायचा आहे. नराधमांना नुसती शिक्षा नाही तर मरेपर्यंत फाशीची शिक्षा व्हावी यात शंकाच नाही.

दुसरा विचार असा येतो की आईने मुलीवर जे संस्कार करायला हवेत ते सुद्धा लोप पावलेले दिसतात. त्यातूनच मुलीच्या फॉरवर्ड विचारांना नकळत चालना मिळते. आयुष्य फार सुंदर असताना संस्कृती, मानसन्मान, कुळाचार, घराचे घरपण शाश्वत राहिले तरच लग्न ही व्यवस्था व संसार म्हणजे तडजोड आहे याचे महत्त्व पटेल आणि अस्ताव्यस्त पडे, नाद झाला भलं तैसा हे चित्र लोप पावेल. यावर उत्तम उपाय म्हणजे आईची उपासना करावी, पत्नीला मित्र बनवून आयुष्य जगा, सुनेला आपली लहान मुलगी समजून तिच्या लहानसहान चुकांकडे दुर्लक्ष करा, सून आनंदी असेल तर मुलगाही आपली काळजी घेईल. श्रीमंतीच्या थाटात गरिबांना दुखवू नका तरच अबद्ध -सुबद्ध गुण वर्णियले तुझे असे म्हणून देवाची कृपा संपादन होईल.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### मांडाखळीत ५० फूट उंच धम्म ध्वजाचे ध्वजारोहण

#### बौध्द उपासक-उपासिकांची उपस्थिती

**परभणी,/प्रतिनिधी :** संपूर्ण विश्वाला प्रज्ञा, मैत्री, करूणा व शांततेचा संदेश देणारे तथागत भगवान गौतम बुध्द यांच्या २५८७ व्या जयंती निमित्त तालुक्यातील मांडाखळी परिसरात नियोजित बुध्द विहाराच्या जागेवर आज सोमवारी (दि. १२) सकाळी १० वाजता ५० फूट उंच धम्म ध्वजाचे ध्वजारोहण पूज्य भंते मोगलायन यांच्याहस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी काँग्रेसच्या अनु.जाती विभागाचे प्रदेशाध्यक्ष डॉ. सिद्धार्थ हत्तीअंबिरे यांची उपस्थिती होती. प्रारंभी तथागत भगवान बुध्द, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर भंते मोगलायन यांनी उपस्थित सर्वांनाच त्रिशरण पंचशील दिले. यावेळी हत्तीअंबीरे यांनी जागतिक दर्जाच्या लवकरच साकार होणाऱ्या गोल्डन बुध्द विहाराच्या या जागेवर भव्य बुध्द मूर्ती लवकरच बसवण्यात येणार आहे, अशी माहिती दिली.
यावेळी मांडाखळी, उमरी तसेच आजूबाजूच्या गावातील बौध्द उपासक व उपासिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. दरम्यान, व्हीएतनाम या देशात आयोजित वैशाख पौर्णिमेच्या उत्सवाला डॉ. हत्तीअंबीरे यांना आमंत्रित करण्यात आले होते, त्याबद्दल उपस्थित मान्यवरांच्या हस्ते त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

### रायरेश्वर माध्यमिक विद्यालयाचा १०० टक्के निकाल

**परभणी,/प्रतिनिधी :** ज्ञानसाधना प्रतिष्ठान संचलित रायरेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा दहावी बोर्ड परीक्षेचा १०० टक्के निकाल लागला आहे.

या विद्यालयाची श्वेता प्रदीप खवले हीने ९९ टक्के गुण घेवून प्रथम, शितल भारत गायकवाड व चैतन्य उमाकांत जोशी या दोघांनी ९८ टक्के गुण घेवून द्वितीय तर श्रुती अच्युतराव गरुड हिने ९७.२० टक्के गुण घेवून तृतीय क्रमांक पटकावला आहे. या परिक्षेत रायरेश्वर विद्यालयाचे एकूण २३० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. यामध्ये ९० टक्के पेक्षा जास्त गुण घेणारे ५४ विद्यार्थी, ७५ टक्के पेक्षा जास्त गुण घेणारे १७७ विद्यार्थी आहेत. विषयनिहाय निकालामध्ये मराठी ९८, हिंदी ९७, संस्कृत १००, इंग्रजी ९९, गणित ९९, विज्ञान ९७ सामाजिक शास्त्र ९७ गुण विद्यार्थ्यांनी संपादन केले.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थाध्यक्ष प्राध्यापक किरण सोनटक्के, संस्था सचिव प्राचार्या सौ. शितल सोनटक्के, समन्वयक आर. जी. पोले, विभाग प्रमुख चिंचाने, कुलकर्णी, परीक्षा प्रमुख परडे, सौ. लोहट, निवासी प्रमुख श्री. चव्हाण, श्री. शेख सलीम तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

### पारवा गुन्ह्यातील आरोपीस लावला मोक्का जिल्हा पोलिस अधिक्षक कार्यालयाद्वारे कारवाई

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी ग्रामीण पोलिस ठाणे हद्दीतील पारवा शिवारातील एका आखाड्यावरील महिलेवर अमानूष अत्याचार करुन तीचे दागिणे लूटणाऱ्या टोळीवर जिल्हा पोलिस अधिक्षकांनी मोक्का कायद्यांतर्गत कठोर स्वरुपाची कारवाई केली आहे.

२ फेब्रुवारी रोजी पारवा शिवारातील शेत आखाड्यावर राहणाऱ्या कुटूंबियांवर दरोडा टाकून एका टोळीने तेथील महिलेवर अत्याचार केला. त्यामुळे संपूर्ण जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली. स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाने या प्रकरणातील आरोपीस शोधून काढले. सदर आरोपीकडे तपास करीत असतांना चौकशी केली तेव्हा या आरोपींवर यापूर्वी देखील गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल झाले आहेत. त्यांच्या या कृत्याला पायबंद घालण्यासाठी कठोर कारवाईची गरज होती. त्याकरीता मकोका संघटीक गुन्हेगारी प्रतिबंध कायदा अन्वये त्यांच्या विरुध्दचा प्रस्ताव नांदेड परिक्षेत्राचे पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्याकडे पाठविण्यात आला होता. तो त्यांनी मंजूर केला. त्यामुळे आता या आरोपींविरोधात मोक्का कायदा लावण्यात आला आहे.

पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलिस निरीक्षक विवेक पाटील, ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक श्रीकांत डोंगरे यांच्या नेतृत्वाव सहाय्यक पोलिस निरीक्षक विक्रम हराळे, साईप्रकाश चन्ना, केंद्रे, चट्टे, भूजबळ, गणेश कौटकर, आगळे यांचा सहभाग असून संघटीत गुन्ह्याचा तपास उपविभागीय पोलिस अधिकारी चंद्रसेन देशमुख यांच्याकडे सुपूर्त करण्यात आला आहे.

### सामाजिक न्याय विभागाचा निधी वळविणाऱ्यांविरुध्द कठोर कारवाई करा- परभणी जिल्हा काँग्रेस कमिटीची मागणी

**परभणी,/प्रतिनिधी :** सामाजिक न्याय विभागाचा लाडकी बहिण योजनेत गैरवापर करणाऱ्या व एससी,एसटी अॅट्रोसिटी कायद्याखाली निधी वळविणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांविरोधात राज्यपालांनी कठोर कारवाई करावी, अशी मागणी परभणी जिल्हा काँग्रेस कमिटीने केली आहे.

राज्याचे समाजकल्याण मंत्री संजय सिरसाट यांनी माध्यमांशी बोलतांना सामाजिक न्याय विभागाचा निधी इतरत्र वळविण्यात आल्याबद्दल विधान केले. वास्तविकतः सामाजिक न्याय विभागाचा निधी वळविणे हे आर्थिक संकट आणि अनुसूचित जाती जमातीवर अन्यायकारक आहे. कारण हे पैसे संविधानाच्या नियमातून आलेले आहेत. त्यामुळे एससी, एसटी कायदा १९८९ चे कलम ३ (१) (एक्स) नुसार एससी, एसटी समूदायाच्या हक्कांना धक्का देणारे आहे. त्यामुळेच या प्रकरणात जो कोणी असेल त्या विरोधात कठोर कारवाई करावी, अशी मागणी काँग्रेसचे जिल्हा प्रवक्ते तथा मिडीया विभागाचे उपाध्यक्ष सुहास पंडीत, जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष अमोल जाधव, वैजनाथ देवकते, अनिल सुर्यवंशी, सिध्दार्थ उघाडे, दिगंबर खरवडे आदींनी केली.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५. ९२८४६६४४३०. ९२८४६९५५८३

# ग्राम महसुल अधिकारी यांचा तलाठी सज्जा चालतो शहरातूनच

## जिल्हाधिकारी यांचे दुर्लक्ष, जिल्हाभर महसुल प्रशासन मस्त, जनता त्रस्त

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर,/प्रतिनिधी-** जल्हाधिकारी परभणी यांच्याकडे संजय रामराव आडे सामाजिक कार्यकर्ते जिंतूर यांनी दिनांक ८ मे २०२५ रोजी निवेदन केले आहे.
जिंतूर तालुक्यातील महसूल कार्यक्षेत्रातील सर्वच तलाठी सज्जा हे जिंतूर शहरात खाजगी कार्यालय थाटून खाजगी मदतनीस नेमत त्यांच्याकडे अति महत्त्वाचे शासकीय दस्तऐवज ठेवत असल्याचे निदर्शनास आले असून सदरचे तलाठी सज्जे हे जिंतूर शहरात टेलिफोन ऑफिस रोड ते शिवाजीनगर, तहसील कार्यालयाच्या पाठीमागे, आमदार कॉलनी आदी भागात सद्यस्थितीला चालू आहे ते आपल्या महसूल कार्यक्षेत्रात येत असल्याने तलाठी सज्जे हे तलाठ्यांच्या त्यांच्या नेमणूक आदेशानुसार त्यांच्या नेमणूक केलेल्या ठिकाणी सुरू करणे व शासन आदेशानुसार खाजगी मदतनीस नेमणूक केलेले खाजगी व्यक्ती काढून टाकण्यासंबंधी आपल्या स्तरावरून आदेशित करणे संबधीचे निवेदन दिले असुन त्यामध्ये कार्यासन अधिकारी महसूल व वन विभाग मंत्रालय मुंबई महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयीन आदेश क्रमांक संकीर्ण २०२४/ प्र.क्र.३६३/ई-१० दिनांक १९ डिसेंबर २०२४ रोजी सर्व विभागीय आयुक्त व सर्व जिल्हाधिकारी यांना दिलेल्या आदेशात स्पष्ट नमूद केले आहे की,अप्पर महासंचालक लाच लुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई यांनी सापळा पडताळणी कारवाईदरम्यान तलाठी हे शासकीय कामकाज एखाद्या खाजगी जागेतून खाजगी कार्यालयात करतात तसेच त्यांचे शासकीय कामे करण्यासाठी अनाधिकृत पणे खाजगी इसम नेमतात व त्यांच्याकडून खाजगी कामे करून घेतात तसेच खाजगी कार्यालयात शासकीय दस्तऐवज ठेवतात ही बाब उचित कारवाई करण्यासाठी शासनाच्या निदर्शनास आणून दिली आहे त्या अनुषंगाने महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाच्या संहिता १९६६ मधील तरतुदीनुसार ग्राममहसूल अधिकारी पूर्वीचे पदनाम तलाठी यांची कर्तव्य व जबाबदाऱ्या नमूद केलेले आहेत सदर कर्तव्य व जबाबदाऱ्या पार पाडताना ग्राममहसूल अधिकारी यांनी शासनाच्या नियमाचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे तसेच म.ना.से वर्तणूक नियम १९७९ अन्वये प्रत्येक शासकीय कर्मचारी अधिकारी यांनी त्यांचे कर्तव्य पालन करताना वर्तणूक विषयक नियम विहित करण्यात आलेले आहेत सदर नियमाचे पालन प्रत्येक शासकीय कर्मचारी अधिकारी यांनी करणे आवश्यक आहे, ग्राममहसूल अधिकारी हे नेमून दिलेल्या सध्याच्या ठिकाणी काम करतात सदर सज्जा कार्यालय शासकीय जागेमध्ये अथवा शासन मान्यता प्राप्त भाड्याच्या जागेमध्ये आहेत त्यामुळे ग्राम महसूल अधिकारी यांनी शासकीय कामकाज खाजगी कार्यालयातून करण्याचा प्रश्न उद्धवत नाही तसेच ग्राममहसूल अधिकारी यांनी शासकीय कामकाज करण्यासाठी खाजगी व्यक्ती मदतनीस नेमण्याबाबत शासन स्तरावरून कोणत्याही सूचना देण्यात आलेल्या नाहीत तलाठी सज्जा हे कामकाज खाजगी कार्यालयातून करत असल्याचे खाजगी जागेमध्ये शासकीय दस्तऐवज ठेवत असल्याचे निदर्शनास आल्यास तसे शासकीय कामकाज करण्यासाठी खाजगी व्यक्तीना नेमत असतील तर संबंधित तलाठी त्यांच्याविरुद्ध मनाचे शिस्त व अपील नियम १९७९ नुसार तात्काळ कारवाई करण्यात यावी तसेच या सूचना सर्व तलाठ्यांना निदर्शनास आणून द्याव्यात असे स्पष्ट आदेश महसूल व वन विभाग मंत्रालय मुंबई महाराष्ट्र राज्य यांनी सर्व विभागीय आयुक्त व सर्व जिल्हाधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे त्यानुसार आपल्या जिंतूर महसूल कार्यक्षेत्रात दिसून येत नाही. त्यामुळे आपल्या महसूल विभाग कार्यक्षेत्रा मध्ये माझ्या अशे निदर्शनास आले आहे की, महसूल कार्यक्षेत्रात शासन स्तरावरून आपण नेमणूक केलेले ग्राम महसूल अधिकारी तलाठी यांनी त्यांना नेमून दिलेल्या ठिकाणी तलाठी सज्जे सुरू केलेले नसून त्यांनी खाजगी मदतनीस नेमून त्यांचे मार्फत आपल्या सोयीनुसार कामकाज करत असून शासकीय दस्तऐवज त्यांच्याकडे ठेवत असून सर्वच सज्जे हे जिंतूर शहरातील टेलिफोन ऑफिस रोड शिवाजीनगर तहसील कार्यालयाच्या पाठीमागे आमदार कॉलनी आदी भागात सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना नाहक जिंतूर शहरात चकरा मारावी लागत आहे त्यामुळे शेतकऱ्यांना नाहक आर्थिक खर्च व विनाकारण वेळ घालवावा लागत आहे. तरी आपल्या महसूल कार्यक्षेत्रात येत असलेल्या तलाठी सज्जे ग्राम महसूल अधिकारी (तलाठी/ मंडळ अधिकारी) यांना नेमणूक केलेनुसार त्यांना नेमणूक आदेश दिलेनुसार त्यांच्या नेमणूक केलेल्या ठिकाणी तलाठी सज्जे स्थलांतरित करून तलाठी सज्जा दिलेल्या ठिकाणी सुरू करणे तसेच खाजगी व्यक्ती मदतनीस न ठेवणे संबंधी आपल्या स्तरावरून तातडीने दखल घेऊन त्यांना दिलेल्या ठिकाणी सज्जे सुरू करण्यास आदेशित करण्यात यावेत अन्यथा या सर्व बाबी वरिष्ठ कार्यालयाच्या निदर्शनास आणून देऊन पुढील होणाऱ्या कार्यवाहीस आपण जबाबदार राहाल असे निवेदन दिनांक ११ एप्रिल २०२५ रोजी तहसीलदार महसूल विभाग जिंतूर यांच्याकडे केली होती त्याअनुषंगाने तहसीलदार जिंतूर यांनी दिनांक १७ एप्रिल २०२५ रोजी जिंतूर महसूल कार्यक्षेत्रातील सर्वच तलाठी सज्जा यांना पत्राद्वारे कळविले आहे की, आपली कार्यालय हे शासकीय व शासनमान्य प्राप्त भाड्याचे जागेत आहे व न्यू दिलेल्या सज्जावर आहे तसेच आपले सज्जेवर खाजगी व्यक्ती कामासाठी नेमण्यात आले नसले बाबतचे प्रमाणपत्र या कार्यालयास तात्काळ सादर करावे विलंब होणार नाही याची दक्षता घ्यावी असे कळविले होते परंतु तहसीलदार जिंतूर यांच्या पत्राला केराची टोपली दर्शवून सदरील सर्वच तलाठी सज्जा हे तक्रार अर्जात नमूद केले प्रमाणे जिंतूर शहरात ठाण मांडून बसलले असल्याने जिल्हाधिकारी परभणी यांनी याकडे विशेष लक्ष देण्याची अत्यंत आवश्यक आहे त्यामुळे शेतकऱ्याना शेती विषयक व विद्यार्थी यांना शैक्षणिक कामासाठी ३ वर्षाचे उत्पन्न प्रमाणपत्र काढण्यासाठी तलाठी अहवाल घेण्यासाठी शहरात चकरा माराव्या लागत आहे एवढेच नव्हे तर चोरट्या मार्गाने गौण खनिज वाहतूक करणारे यांच्यावर कोणत्याही प्रकारची अंकुश राहिले नाही त्यामुळे शासनाचा महसूल बुडत आहे त्यामुळे जिल्ह्यातील सर्व तलाठी सज्जावर पाठविण्याबाबत एका आठवड्यात कार्यवाही सुरू करावी तसेच शासनाने जिल्हाधिकारी यांना दिलेल्या आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करावी अन्यथा शासनाने दिलेल्या आदेशाचे अनुपालन केले नसल्या संबंधी आदेशात नमूद केलेनुसार शासनाकडे जिल्हाधिकारी परभणी यांच्या विरुद्ध म.ना.से वर्तणूक नियम १९७९ अन्वये प्रत्येक शासकीय कर्मचारी अधिकारी यांनी त्यांचे कर्तव्य पालन करताना वर्तणूक विषयक नियम विहित करण्यात आलेले आहेत त्यानुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यासंबंधी मागणी करण्यात येईल, तसेच आपण परभणी जिल्ह्याचा पदभार स्वीकारल्या पासुन जिल्ह्यातील सर्व तलाठी यांच्यावर आपले नियंत्रण राहिले नसल्याचे निदर्शनास येत आहे यास आपले समर्थन आहे असे मला वाटते आपण परभणी जिल्ह्याचा पदभार स्वीकारण्यापुर्वी अशी परिस्थिती नव्हती हेही विशेष आहे, त्यामुळे शासनाने जिल्हाधिकारी कार्यालय परभणी येथे जे काही योजना राबविण्यासाठी आदेश दिले आहेत.
त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी केली किंवा नाही याबाबत शासनाकडे चौकशी करण्याची मागणी करण्यात येईल याची असे दिनांक ८ मे २०२५ रोजी जिल्हाधिकारी परभणी याना दिलेल्या निवेदन दिले असुन त्याची प्रत कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग मंत्रालय मुंबई महाराष्ट्र राज्य, विभागीय आयुक्त, संभाजीनगर, तहसील जिंतूर यांच्याकडे संजय रामराव आडे (सामाजिक कार्यकर्ते जिंतूर) यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे

## पूर्णा नगरपालिकेच्या त्या प्रकरणातील आरोपीने घेतली लाच

**संपत तेली**

**पूर्णा,/प्रतिनिधी :** वडिलांच्या संमतीपत्राच्या आधारे घराचे हस्तांतरण करण्याकरीता १० हजार रुपयांची लाच मागण्यासह स्विकारणाऱ्या पूर्णा नगरपालिकेतील नरहरी गोमाजी सातपुते या लिपीकासह रत्नदीप श्रीरंग वाघमारे या कंत्राटी संगणक ऑपरेटरला लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या एका पथकाने मंगळवारी (दि.१३) मोठ्या शिताफीने ताब्यात घेतले.



एका नागरीकाने त्यांच्या वडीलाचे संमतीपत्राच्या आधारे घराचे हस्तांतरण त्यांचे व भावाचे नावे करण्याकरीता ७ मे २०२५ रोजी रितसर अर्ज व कागदपत्रे पूर्णा नगरपालिकेस सादर केली. तेथील लिपीक नरहरी सातपुते यांची भेट घेवून त्या संबंधीची कल्पना दिली. परंतु, सातपुते यांनी हस्तांतराच्या कामाकरीता १० हजार रुपये द्यावे लागतील, असे स्पष्ट केले. लाच द्यावयाची इच्छा नसल्याने संबंधित नागरीकाने लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. या खात्याच्या पथकाने या तक्रारीची ८ मे रोजी पंचासमक्ष पडताळणी केली तेव्हा लिपीक नरहरी सातपुते याने लाच रक्कम १० हजार रुपये स्विकारण्याची सहमती दर्शविली.

दरम्यान, या खात्याच्या पथकाने मंगळवारी पंचासमक्ष सापळा रचला, तेव्हा लिपीक नरहरी सातपुते यांनी सांगितल्याप्रमाणे कंत्राटी संगणक ऑपरेटर रत्नदीप वाघमारे हा १० हजार रुपयांची लाच स्विकारतांना पकडला गेला. या खात्याच्या पथकाने लगेचच सातपुते यासही ताब्यात घेतले. या दोघांची अंगझडती घेतली असता एक-एक मोबाईल जप्त करण्यात आला. दरम्यान, या दोघांच्याही घरांची झडतीची प्रक्रिया सुरु होती. पूर्णा पोलिस ठाण्यात या प्रकरणात त्या दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्याचीही प्रक्रिया सुरु होती. दरम्यान, पोलिस अधिक्षक संदीप पालवे, अप्पर पोलिस अधिक्षक डॉ. संजय तुंगार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपअधिक्षक अशोक इप्पर, पोलिस निरिक्षक बसवेश्वर जक्कीकोरे यांच्या नेतृत्वाखाली सापळा पथकातील पोलिस निरीक्षक अलताफ मुलानी, सीमा चाटे, अतूल कदम, शेख जिब्राईल, शाम बोधणकर, कल्याण नागरगोजे, कदम, नरवाडे यांनी या कारवाईत सहभाग नोंदविला.

### जमजम कॉलनीतील त्या कुटूंबास अद्यापही मदत मिळेना

**परभणी,/प्रतिनिधी :** शहरातील जमजम कॉलनी येथील एका घराला आग लागून घरातील संसार उपयोगी साहित्य जळून खाक झाल्याची घटना मंगळवारी (दि.१३) सकाळी सव्वातीन वाजण्याच्या सुमारास घडली.

शहरातील जमजम कॉलनी येथील शेख युनूस शेख सुलतान यांच्या घरात मंगळवारी सकाळी सव्वा तीन वाजेच्या सुमारास आग लागली. सरवर शेख यांनी या घटनेची माहिती तात्काळ अग्निशमन दलास दिली. माहिती मिळताच अग्निशमन बंब घटनास्थळी दाखल झाला. अग्निशमन दलाच्या पथकाने ही आग आटोक्यात आणली, मात्र या आगीत घरातील संसार उपयोगी सर्व साहित्य जळून खाक झाले. महापालिकेचे सहाय्यक आयुक्त यांच्या नियंत्रणात प्रभारी अग्निशमन केंद्र अधिकारी डी. यु. राठोड यांच्या मार्गदर्शनात अग्निशामक जवान उमेश कदम, निखिल बेंडसुरे व वाहनचालक वसीम अखिल अहमद यांचा या पथकात सहभाग होता.

## विद्यार्थ्यांना सर्व प्रवेश प्रक्रियांबाबत मिळणार मोफत मार्गदर्शन

**ग्रामीण टेक्निकल अॅन्ड मॅनेजमेंट कॅम्पस नांदेडचा उपक्रम**

**परभणी,/प्रतिनिधी-** ग्रामीण टेक्निकल अॅन्ड मॅनेजमेंट कॅम्पस नांदेड यांच्या पुढाकारातून सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी अभियांत्रिकी पदवी व पदविका या सोबतच फार्मसी, कृषी, आयटीआय, यासारख्या सर्व प्रवेश प्रक्रियांची प्रक्रिया व मार्गदर्शन विद्यार्थी व पालकांसाठी मोफत केले जाणार आहे.

यासाठी सुपर मार्केट परिसरात असलेल्या देशमुख पेट्रोल पंपाच्या बाजूस मार्गदर्शन केंद्र उघडण्यात आले आहे. राज्यातील सर्व अभियांत्रिकी कृषी व फार्मसी महाविद्यालयातील पदवी व पदविका अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रवेशासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झालेल्या आहेत. या संपूर्ण प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने असल्यामुळे बहुतांश विद्यार्थी व पालकांना यामध्ये किचकट असल्याचे जाणवते. परिणामी अनेक विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहण्याची भीती असते. मुळातच बारावीच्या नंतर कुठल्या स्वरूपाचे अभ्यासक्रम स्वीकारावेत, या संदर्भात सुद्धा अनेक विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम अवस्था आहे. नेमकं हेच ओळखून ग्रामीण टेक्निकल अॅन्ड मॅनेजमेंट कॅम्पस यांच्या वतीने परभणी जिल्ह्यासाठी मोफत मार्गदर्शन आणि सोबतच संपूर्ण प्रवेश प्रक्रिया या केंद्रावर करून घेतले जाणार आहेत. यासाठी विद्यार्थ्यांनी या केंद्रास भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.



# तंबी देवूनही ट्रॅव्हल्सधारकांकडून प्रवाशांची बेसुमार लुट

**परभणी ,/प्रतिनिधी-** दरवर्षीप्रमाणे उन्हाळी सुट्ट्या लागल्या बरोबर खाजगी ट्रॅव्हल्सधारकांनी तिकीटांच्या दरात आव्वा की सव्वा वाढ करीत प्रवाशांची बेसुमार लूट सुरु केली आहे.

प्रत्येक उन्हाळी सुट्ट्या असो, किंवा दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये खाजगी ट्रॅव्हल्स धारकांकडून तिकीटाच्या दरात आव्वा की सव्वा रक्कमेची वाढ केली जात आहे. त्याद्वारे, प्रवाशांची बेसुमार लूट खूलेआमपणे होत आहे. यावर्षीसुध्दा १ मे रोजी उन्हाळी सुट्ट्या जाहीर झाल्याबरोबर खाजगी ट्रॅव्हल्सधारकांनी मे व जून चा अर्धा महिना पूर्णतः कॅश करण्याकरीता चढाओढीने तिकीटांच्या दरात मोठी वाढ केली आहे.

विशेषतः महानगरांकडे जाणाऱ्या प्रवाशांना या तिकीट दरातील वाढीचा मोठा तडाखा बसतो आहे. परभणी ते पुणे प्रत्येक प्रवाशामागे ८०० ते ९०० रुपये हे सर्वसाधारणपणे तिकीटाचे दर आहेत. परंतु, या उन्हाळी सुट्टीत ट्रॅव्हल्स कंपन्यांनी १४०० ते १६०० रुपये असे प्रति प्रवाशामागे तिकीटांची दर आकारणी सुरु केली आहे. पुणे पाठोपाठ मुंबईचेही तिकीटांचे दर भडकले आहेत. सर्वसाधारणपणे मुंबईस जाण्याकरीता प्रवाशास आता २२०० ते २४०० रुपये मोजावे लागत आहे. शनिवार व रविवार तर हे दर आणखीनच भडकत आहेत. ऑनलाईन व ऑफलाईनच्या दरामध्ये मोठा फरक आहे.

खाजगी ट्रॅव्हल्सधारकांनी दररोजच हे दर टप्प्या टप्प्याने वाढविण्याचे धोरण अवलंबविले आहे. शनिवार व रविवार या दोन दिवसात तर पुणे असो, मुंबई, कोल्हापुर, नागपुर असो किंवा सुरतकडे जाणाऱ्या बसेसच्या दरांमध्ये प्रचंड वाढ केली जात आहे.

### भंगार बसेस संख्या मोठया प्रमाणात...

**संपूर्ण उन्हाळी सुट्ट्यांचे सीझन कॅश करण्याकरीता ट्रॅव्हल्सधारकांनी भंगारात निघालेल्या बसेससुध्दा रस्त्यावर आणून धावण्याचे धोकादायक प्रकार अवलंबविले आहेत. परभणी शहरातून स्थानिक पातळीवरुन सर्वसाधारणपणे पुणे व मुंबई करीता ४० बसेस धावत आहेत. प्रवाशांची गर्दी ओळखून या कंपन्यांनी मोडकळीस निघालेल्या बसेस रस्त्यावर आणून धोकादायक पध्दतीने सुरु केल्या आहेत. त्यामुळे या भंगारात निघालेल्या बसेसमधून ग्राहकांचे मोठे हाल होत आहेत.**

## आरटीओ चिडीचूप धोरण कोणाच्या सांगण्यावरुन ?

**उन्हाळी सुट्ट्या पूर्णतः कॅश करण्याचा संकल्प खाजगी ट्रॅव्हल्सधारकांनी सोडला असून नियमित बसेस सोडणाऱ्या कंपन्यांनी आता आपल्या ताफ्यात प्रवाशांची गर्दी ओळखून मोडकळीस निघालेल्या बसेससुध्दा दाखल करीत त्यांच्याद्वारे प्रवाशांची लूट सुरु केली आहे. या बसेसमधून कोणत्याही प्रकारच्या सुविधा उपलब्ध नाहीत. विशेषतः निकृष्ट दर्जाची आसनव्यवस्था, मोडकळीस निघालेल्या खिडक्या तसेच हालणारे डुलणारे आसन, मळकट, कळकट गाद्या व त्यांचे कव्हर असे वाईट अनुभव प्रवाशी मूकपणे सहन करत आहेत. परंतु, त्याचे सोयरसुतक सरकारी यंत्रणेस नाही, हे दुर्देव आहे. प्रवाशीसुध्दा कुठेही तक्रार न करता निमूटपणे पैसे मोजून कसबसा पल्ला गाठण्याचा धोकादायक प्रयत्न करीत आहेत.**



सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# कै. वसंतराव नाईक यांच्या पुतळ्याचे गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते लोकार्पण

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२६ मे-**

हरित क्रांतीचे जनक तथा महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचा पुर्णाकृती पुतळा व परिसर सुशोभिकरण कामाचा लोकार्पण सोहळा आज केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते संपन्न झाला. या सोहळ्या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे उपस्थित होते.

नांदेड शहरातील कै. वसंतराव नाईक चौक येथे पार पडलेल्या या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्यासह महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, महिला व बालकल्याण राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, खासदार अशोक चव्हाण, बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष तथा विधान परिषद सदस्य आमदार हेमंत पाटील, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार बाबुसिंग महाराज राठोड, आमदार बाबुराव कदम, आमदार श्रीजया चव्हाण, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे आदी उपस्थित होते.



प्रारंभी मंचावर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आगमन झाल्यानंतर त्यांनी कै. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यानंतर श्री. शाह यांनी कळ दाबुन पुतळ्याचे अनावरण केले. तसेच त्यांच्या हस्ते नामफलकाचेही अनावरण करण्यात आले. याप्रसंगी बंजारा समाजाच्यावतीने श्री. शाह व श्री. फडणवीस यांचा पारंपारिक पद्धतीने सत्कार करण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने बंजारा समाजाचे नागरिक उपस्थित होते. हरितक्रांतीचे जनक कै. वसंतराव नाईक यांचा पूर्णाकृती पुतळा नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने नांदेड शहरातील कै. वसंतराव नाईक चौक परिसरात उभारला आहे. नऊ फूट उंचीच्या या पुतळ्याचे वजन सुमारे ७०० किलो आहे. पुतळ्याच्या उभारणीसाठी रुपये १३ लक्ष ९९ हजार एवढा खर्च आला आहे. २३२.६० चौ.मी. जागेत या पुतळ्याची उभारणी करण्यात आलेली आहे. सुशोभिकरणाचे अंदाजे ६९ लाख रुपयांची कामे आहेत.

# उद्योगांना दर्जेदार, सुरळीत व अखंडित वीज पुरवठा देण्याकरिता महावितरण कटिबद्ध

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२६ मे-**

उद्योगांना दर्जेदार, सुरळीत व अखंडित वीजपुरवठा करण्यासाठी महावितरण कंपनीची यंत्रणा कटीबद्ध आहे. अखंडित वीज पुरवठासाठी पावसाळ्यात महावितरणचे मनुष्यबळ व यंत्र सामुग्रीसह २४ तास ग्राहकांच्या सेवेसाठी सज्ज राहणार आहे.

नांदेड परिमंडळाचे मुख्य अभियंता राजाराम माने यांनी नांदेड जिल्ह्यातील नांदेड, कुष्णूर, खानापूर व किनवट एमआयडीसी मधील औद्योगिक ग्राहकांना अखंडित, सुरळीत व दर्जेदार वीज पुरवठा करण्यासाठी व औद्योगिक ग्राहकांचे, उद्योजकांचे अडचणी व समस्याचे निराकरण करण्यासाठी नांदेड जिल्हातील इंडस्ट्रियल असोसिएशनचे अध्यक्ष व पदाधिकारी, उद्योजक यांच्यासोबत बैठक घेण्यात आली सदर बैठकीस आंनद बिडवई, निलेश मुंदडा, महेश देशपांडे, शैलेश कऱ्हाळे, मोहन तनमारे-किनवट, आशिष कांचलवाड-किनवट व इतर उद्योजक, शिष्टमंडळ व पदाधिकारी तसेच महावितरण नांदेड मंडळाचे अधीक्षक अभियंता सुधाकर जाधव, नांदेड शहर, भोकर व देगलूर विभागाचे कार्यकारी अभियंता, संबंधित उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता उपस्थित होते.

सदर बैठकीत एमआयडीसी मधील औद्योगिक ग्राहकांच्या वीज पुरवठा संबंधित समस्या व अडचणीचे निराकरण करण्याचे आश्वासन नांदेड परिमंडळाचे मुख्य अभियंता राजाराम माने यांनी दिले. एमआयडीसीतील औद्योगिक ग्राहकांना वीजपुरवठा सुरळीत व अखंडित देण्याकरिता ३३ केव्ही, ११ केव्ही वीज वाहिनी वरील इंटरप्शन्स कमी करण्याकरिता तात्काळ सदर वीज वाहिनीची देखभाल व दुरुस्ती करणे, ट्री कटींग, एबी स्वीच बदली करणे, रोहित्राचे जुने खराब झालेले बॉक्स बदलणे, लघु दाब वाहिनीचे तारा ताणून घेणे व स्पेसर्स लावणे, उच्च दाब व लघु दाब वाहिनीचे जुने झालेली तारा बदलण्यासाठी



अंदाजपत्रक तयार करण्याचे सूचना संबंधित कार्यकारी अभियंता यांना देण्यात आली. तसेच ज्या ३३ केव्ही उपकेंद्रात अतिभारीत (ओव्हर लोड) पावर ट्रान्सफॉर्मर आहेत त्या ठिकाणी अतिरिक पॉवर ट्रान्सफॉर्मर किंवा क्षमता वाढविण्याचे कामे प्राधान्याने करण्याचे तसेच एमआयडीसी मधील ग्राहकांना वेगळे लाईनस्टॉफ देण्याची सूचना देण्यात आले.

तसेच एमआयडीसी व औद्योगिक क्षेत्रामध्ये वीज यंत्रणेची देखभाल व दुरुस्तीची कामे करणेकरिता वीज पुरवठा बंद करण्यापूर्वी उद्योजकांना पूर्व कल्पना देण्याकरिता कार्यकारी अभियंता यांना सूचना देण्यात आले. तसेच याप्रसंगी वीज पूरवठ्याशी संबंधित समस्याचे निराकरण करण्यासाठी दरमहा एमआयडीसी व औद्योगिक ग्राहकांची 'उर्जा मित्र' बैठक मंडल कार्यालयस्तरावर घेण्याची सूचना अधीक्षक अभियंता यांनी केली.

वीज ग्राहक हे महावितरणचे दैवत' असून त्यांना निरंतर व दर्जेदार वीज पुरवठा देणे व त्यांच्या समस्या अडचणीचे निवारण करणे करिता महावितरणची यंत्रणा सदैव सज्ज आहे. एमआयडीसी व औद्योगिक ग्राहकांना दर्जेदार, सुरळीत व अखंडित वीजपुरवठा करण्यासाठी महावितरण कंपनीची यंत्रणा कटीबद्ध आहे.

## संक्षिप्त वृत्त

### उमरी शहरातील पावसाळ्यापूर्वी नालीचे साफसफाई चे काम प्रगतीपथावर .

**उमरी** -उमरी शहरातील अनेक वार्डात पावसाळ्या पूर्वी स्वच्छता मोहीम मुख्याधिकारी निलम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रगतीवर जोमात चालू आहे . उमरी शहर स्वच्छता चे माहेर घर असून त्यांना महाराष्ट्रात स्वच्छतेचे नंबर वन पुरस्कार ही माजी आमदार बापूसाहेब देशमुख गोरठेकर सत्तेच्या काळात मिळाला आहे आज सत्तेचे वर्चस्व आहे मात्र नगरपरिषद प्रशासनाने त्याच स्वरूपात स्वच्छता बदल तक्रार करणाऱ्या वार्ड - प्रभागातील लोकाची दखल घेवून अवकाळी पाऊसात तुफान वाऱ्यात ही स्वच्छता मोहीम प्रगती पथावर आनली आहे . उमरी शहरातील कोरोना इतर शासकीय अभियान असो इतर सामाजिक कार्य सत्ताधारी विरोद्धक नेताच्या विकासात्मक दुष्टीकोन ठेवून नियमाची मायमली न मोडता उमरी शहरात कार्य करणारे वरिष्ट लिपीक गणेश मदने व शासकीय गुतेदार संजीव विठ्ठलराव सवई यांनी विकासाचे पर्व बदल्ले आहे . पक्ष कोणताही असो सतेत राहून उमरी शहराचा विकास केला आहे . उमरी शहरातील पाऊसकाळ्या अगोदर कामे उमरी शहरात प्रगतीपतावर आहेत . उमरी स्वच्छता अभियानात विशाल बाराते ,स्वच्छता निरीक्षक सूर्यवंशी , मुकदम चंद्रकांत श्रीकांबळे वरिष्ठ लिपिक गणेश मदने तसेच स्वच्छता कर्मचारी यांनी वैयक्तिक लक्ष देऊन पावसाळ्यापूर्वी उमरी शहरातील नाल्याचे साफसफाई चे नियोजन केले आहे त्या बदल उमरी शहरात प्रशासनाचे कौतूक होत आहे .

### छत्रपती शिवाजी महाराज पुतळा स्थापन संदर्भात बैठक

**किनवट** -शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा स्थापन संदर्भात सुरु असलेल्या जागे संदर्भातील मतभेदावर तोडगा काढण्यासाठी सहाय्यक जिल्हाधिकारी झेनिथ चंद्रा दोनतुला यांच्या अध्यक्षतेखाली एक महत्वपूर्ण बैठक पार पडली. ही बैठक त्यांच्या दालनात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीसाठी सामाजिक कार्यकर्ते अभय नगराळे, राहुल कापसे, अमरदीप कदम, बाळकृष्ण कदम, उमाकांत कऱ्हाळे पाटील, अजय कदम, विवेक ओंकार यांना अधिकृत पत्राद्वारे आमंत्रित करण्यात आले होते. तसेच, नगर परिषद किनवटतर्फे माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार आणि मुख्याधिकारी डॉ. अजय कुरवाडे हे उपस्थित होते. दरम्यान, माजी नगराध्यक्ष साजिद खान, माजी उपनगराध्यक्ष अभय महाजन, माजी नगरसेवक शिवा क्यातमवार यांनी आयत्या वेळी विनंती करून सहभाग नोंदवला.

### सक्षम चेस अकॅडमी नांदेडचा तृतीय क्रमांक

**नांदेड** -आर्यन्स एंटरप्रायझेस आयोजित स्व. भारतबाई हलकुडे स्मरणार्थ (एल बी एच एम) बुद्धिबळ महोत्सव या नावाने भव्य असा बुद्धिबळ सोहळा दिनांक १७ मे ते २५ मे २०२५ या दरम्यान संपन्न झाला.जागतिक बुद्धिबळ संघटना (फिडे); अखिल भारतीय बुद्धिबळ संघटना, महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेच्या (एमसीए) मान्यतेने वडगाव बुद्रूक येथील एस. के.एन., सिंहगड स्कूल ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, पुणे येथे पार पडली. या बुद्धिबळ महोत्सवात चार प्रकारच्या म्हणजेच,ओपन गट, बीलो १८००, रॅपिड रेटिंग ब्लिटज स्पर्धाचा दिमाखदार सोहळा १७ मे २०२५ रोजी उद्घाटन डॉ. नवले साहेब, राजेंद्र कोंढे व केतन खैरे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.. सदरील स्पर्धेमध्ये २१५४ खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता तसेच आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त १५६७खेळाडूंचा सहभाग होता त्यामध्ये रॅपिड प्रकारात प्रथम व्हिक्टोरिस चेस अकॅडमी पुणे, द्वितीय कला क्रीडा प्रबोधिनी पुणे तर सक्षम चेस अकॅडमी नांदेड यांचा तृतीय क्रमांक प्राप्त झाला. शौर्य आदित्य मुपानेनी याने क्लासिक व ब्लीट्स या क्रीडा प्रकारामध्ये नऊ वर्षाखालील खेळाडूंमध्ये मेडल प्राप्त केले तर प्रा. डॉ. दिनकर हंबर्डे यांनी बिलो १६०० क्रीडा प्रकारात चतुर्थ क्रमांक प्राप्त करत ३०००/- रुपये रोख रक्कम पारितोषक प्राप्त केले. सदरील पारितोषक आदरणीय प्रकाशजी कुंटे, राजेंद्र कोंडे (सहसचिव महाराष्ट्र चेस असोसिएशन )व नितीन शेनवी (चीफ अरबिटर) यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आले. अकॅडमीच्या खालील खेळाडूंना आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त होईल त्यामध्ये सक्षम हंबर्डे, आदित्य गायकवाड, सत्यजित गायकवाड, आशिष लोखंडे,गगनेश सिसोदिया, उत्कर्ष मुळे,स्वहम वाघमारे, रियांश घंटे, देवांश चव्हाण, आरुष विडेकर तसेच चमकदार कामगिरी करणारे सहभागी खेळाडू प्रथमेश सुतार,रणधीर बनकर,वरद बोखारे,अवनी कापसे, अक्षित विडेकर,सर्वज्ञ टाकळकर अकॅडमीच्या १८ खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेचे आयोजन नागनाथ हलकुडे सर व त्यांची सावली सौं वंदना हलकुडे मॅडम यांनी केलेले आहे... या स्पर्धेसाठी चिफ अरबिटर नितीन शेणवी सर, प्रवीण ठाकरे सर, पवन राठी व शशिकांत मक्तेदार यांच्या सर्व टीमने स्पर्धा यशस्वी केली. अकॅडेमी च्या या यशाबदल डी.पी. सावंत साहेब( माजी राज्यमंत्री महाराष्ट्र राज्य),डॉ.साहेबराव मोरे (अध्यक्ष नांदेड जिल्हा बुद्धिबळ संघटना),सुनील देशमुख (बारडकर ) (कोषाध्यक्ष बुद्धिबळ संघटना) , फादर मुथुस्वामी, सुचिता हंबर्डे,( संचालिका सक्षम चेस अकॅडमी, नांदेड,)ऍड. आदित्य मुप्पानेनी आदींनी अभिनंदन केले.माहिती दिली.

# नरसी चौकात किरकोळ कारणावरून चाकू हल्ला ; दोन गंभीर जखमी

**तभा वृतसेवा**
**नायगाव , दि.२६ मे-**

विवाहासाठी आलेल्या पाहुणे मंडळींच्या तरुण टोळक्याने रविवारी दुपारी नरसी मुख्य चौकातील मुखेड रोड वरील आकांक्षा बार परमीट समोर सिने स्टाईलने केलेल्या चाकू हल्यात दोन गंभीर जखमी झाले.

आदित्य राजू वाघमारे,चिमण्या, रोहन सुरेश भोळे सर्व ह. मु.रा बळीरामपुर नांदेडचे असुन हे दि.२५.रोज रविवारी सकाळी तालुक्यातील नरसी येथील शिवकृपा मंगल कार्यालयात रविवारी सकाळी मित्राच्या बहिणीचा विवाह सोहळा उरकल्यानंतर नरसी मुख्य चौकातील मुखेड रोड वरील आकांक्षाबार परमीट रुममध्ये मद्यपान करुन बाहेर येत असतांना नरसीतील ज्ञानेश्वर भानुदास बट्टेवाड,संतोष हुलगूलवाड यांच्यात शुल्लक कारणावरून वाद झाला व काही क्षणातच हा वाद विकोपाला जाऊन व-हाडी मंडळीतील आदित्य राजू वाघमारे, चिमण्या, रोहन सुरेश भोळे ह्या मद्यपी तरुण युवकाने आपल्या जवळील धार धार चाकुने ज्ञानेश्वर भानुदास बट्टेवाड,संतोष हुलगूलवाड नरसी कर यांच्यावर वार करीत या दोघांना ही गंभीर जखमी केले ही महीती समजता च रामतीर्थ पोलीस ठाण्यातील व नरसी बिटचे प्रभारी जमादार चंद्रमणी सोनकांबळे ,पोलीस.हे.कॉ गणपत राठोड ह्या पोलिस कर्मचार्यांनी प्रसंगावधान राखत आदित्य राजू वाघमारे, रोहन सुरेश भोळे ह्या मद्यपी तरुणांना वेळीच ताब्यात घेतले तर मुख्य आरोपी चिमण्या हा फरार होण्यात यशस्वी झाला असून .नरसी बिटचे जमादार चंद्रमणी सोनकांबळे व पो हे कॉ.गणपत राठोड या दोन कर्मचाऱ्यांच्या हस्तक्षेपामूळे मोठी अनर्थ घटना टळली आहे.ज्ञानेश्वर भानुदास बट्टेवाड,संतोष हुलगूलवाड रा.नरसीकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून रामतीर्थ पोलीस ठाण्याचे सहायक पोलिस निरिक्षक श्रीधर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय न्यायसंहितेच्या विविध कलमान्वये रात्री उशिरा रामतीर्थ ठाण्यात गून्हा नोंदविण्यात आला व पुढील तपास हा नरसी बिटचे जमादार चंद्रमणी सोनकांबळे यांच्याकडे वर्ग करण्यात आला.

# अनिल महामुने यांच्याकडे किनवट गटशिक्षणाधिकारी पदाचा पदभार

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.२६ मे-**

अनिल महामुने यांच्याकडे आज किनवट गटशिक्षणाधिकारी पदाचा पदभार देण्यात आला. त्यांनी गटशिक्षणाधिकारी कार्यालयात पदभार स्वीकारल्यानंतर अनेक शिक्षक व स्थानिक मान्यवरांनी त्यांचे स्वागत करत शुभेच्छा दिल्या.महामुने हे शिक्षण क्षेत्रात अनुभवी अधिकारी असून, यापूर्वीदेखील त्यांनी गटशिक्षणाधिकारी पदाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली आहे. त्यामुळे तालुक्यातील शैक्षणिक कामकाजात गती येण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. सध्या किनवट तालुक्यात अनेक प्रशासकीय पदांवर प्रभारी अधिकारी कार्यरत आहेत. अशा स्थितीत अनुभवी अधिकाऱ्याची नियमित नियुक्ती ही अत्यंत सकारात्मक बाब मानली जात आहे. विशेषतः शैक्षणिक सत्राच्या सुरुवातीस ही जबाबदारी त्यांच्याकडे दिल्यामुळे नियोजन,



प्रवेश प्रक्रिया व शाळांची पूर्वतयारी सुरळीत पार पडण्यास मदत होणार आहे. नांदेड जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) डॉ. बिरगे यांनी अनिल महामुने यांना नियुक्तीपत्र प्रदान केले. पदभार स्वीकारल्यानंतर महामुने यांनी सांगितले, शिक्षकांचे सहकार्य आणि आधीचा अनुभव या बळावर शैक्षणिक प्रगती साधण्याचा प्रयत्न करणार आहे.या वेळी अनेक शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक व अधिकारी उपस्थित होते.

# शाळेची पुस्तके तालुक्यांमध्ये पोहोचली शाळेच्या पहिल्याच दिवशी होणार पुस्तकांचे वितरण

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२६ मे-**

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक विभागामार्फत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी जिल्ह्यातील सर्व शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तसेच खाजगी अनुदानित शाळांतील इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात येणार आहे. यासाठी आवश्यक ती शालेय पुस्तके तालुकास्तरावर पोहोचवण्याची प्रक्रिया सुरू आहे. जिल्ह्यातील एकूण २ लाख ९४ हजार ६९६ विद्यार्थ्यांसाठी तब्बल १७ लाख १२ हजार ६४० पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात येणार असल्याची माहिती प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी



डॉ. सविता बिरगे यांनी दिली.

विभागीय पाठ्यपुस्तक भांडार, लातूर विभागामार्फत सदर पुस्तकांचे तालुकास्तरावर वितरण सुरू असून, आतापर्यंत तालुकास्तरावर ११ लाख ४१ हजार ९९४ पुस्तके प्राप्त झाली आहेत. उर्वरित पुस्तकेही शाळा सुरू होण्याच्या आधी प्राप्त होणार आहेत. शाळा सुरू होण्याच्या पहिल्याच दिवशी १६ जून रोजीच सर्व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके देण्यात येणार आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावर्षीपासून इयत्ता पहिलीसाठी उइडए पॅटर्न लागू करण्यात आला असून, त्यानुसार उइडए अभ्यासक्रमाची पाठ्यपुस्तकेही यामध्ये समाविष्ट आहेत. तालुकास्तरावर थेट वितरण प्रणालीद्वारे माध्यम- मराठी, उर्दू, सेमी इंग्रजी, उइडए तसेच संस्कृत विषयांच्या पुस्तकांचे वितरण केले जात आहे.



**मुखेड- ऑपरेशन सिंदूर यशस्वीरीत्या राबवून पहलगाम दहशतवादी हल्लयाचा बदला घेऊन इस्लामिक दहशतवादाचा अड्डा असलेल्या पाकिस्तानला धडा शिकवण्याची अभिमानास्पद कामगिरी केली भारतीय सैन्य दलाचा सन्मानार्थ मुखेड येथे आमदार डॉ. तुषार राठोड यांच्या नेतृत्वाखाली शहरातून भव्य सिंदूर यात्रा व तिरंगा रॅली काढण्यात आली. यावेळी शहरातील राष्ट्रप्रेमी युवा ज्येष्ठ नागरिकाणी हजारोच्या संख्येने सहभाग नोंदवला (छायाचित्रकार गणेश आंबेकर, मुखेड)**

# प्रत्येकांनी शासन योजनेच्या लाभासाठी आवश्यक पुर्तता करणे आवश्यकच; तहसीलदार सुरेखा नांदे



**तभा वृतसेवा**
**हदगाव , दि.२६ मे-**

केंद्र व राज्य शासनाकडून राबविण्यात येत असलेल्या ग्रामीण भागात जनजागृतीसाठी जिल्हा प्रशासनाच्या आदेशानुसार उपविभागीय अधिकारी अविनाश कांबळे, तहसीलदार श्रीमती सुरेखा नांदे यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवार २६ मे रोजी बरडशेवाळा महसूल मंडळा अंतर्गत बरडशेवाळा येथे शिव छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान राबविण्यात आले.यावेळी तहसीलदार श्रीमती सुरेखा नांदे यांनी शेतकरी बांधवांसाठी महत्त्वपूर्ण तालुक्यातील अनेक पांदन रस्ते मोकळे केल्याचे सांगत उपस्थितांना केंद्र व राज्य शासन राबवित असलेल्या विविध योजनांची माहिती देताना फार्मर आय. डी. सह विविध योजनांच्या लाभासाठी मिळत असलेल्या अल्प प्रतिसादासह शासन राबवित असलेल्या कार्यक्रमाला अत्यंत अल्प उपस्थितीची खंत व्यक्त केली. शासन राबवित असलेल्या विविध योजनांच्या लाभासाठी प्रत्येकांनी आवश्यक ती पुर्तता करणे आवश्यकच असल्याचे सांगितले.

यावेळी नायब तहसीलदार काकडे ,तालुका कृषी अधिकारी सदाशिव पाटील, विस्तार अधिकारी सावंत, मंडळ अधिकारी गोडबोले मॅडम, तलाठी बि.यु. ईप्पर, कोथळकर,माटे, सदावर्ते, हंबर्डे मॅडम,घावस ग्रामसेवक बेग,माहोरे, सरपंच ज्ञानेश्वर मस्के, अमोल पाटील सरपंच रुईकर , गायकवाड केदारनाथ यांच्या सह गावातील प्रतिष्ठित नागरिक शेतकरी, महिला मंडळी उपस्थित होते.यावेळी लाभार्थ्यांना विविध लाभाचे प्रमाणपत्र देण्यात आले.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन कुबेर राठोड किन्हाळकर यांनी केले तर आभार तलाठी बि.ई.ईप्पर यांनी केले.

# केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे नांदेड विमानतळावर आगमन



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२६ मे-**

केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांचे आज दुपारी येथील श्री गुरुगोबिंदसिंघजी नांदेड विमानतळावर आगमन झाले. यावेळी त्यांच्या सोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचेही आगमन झाले. यावेळी विविध मान्यवरांनी त्यांचे स्वागत केले.

यावेळी इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास व अपारंपारिक ऊर्जा मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर-साकोरे, माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, आमदार डॉ. तुषार राठोड, आमदार भीमराव केराम, आमदार जितेश अंतापूरकर, बाळासाहेब ठाकरे (हळद) हरिद्रा संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष तथा विधान परिषद सदस्य आमदार हेमंत पाटील, आमदार श्रीजया चव्हाण, सचखंड गुरुद्वाराचे प्रशासक डॉ. विजय सतबीरसिंग, जिल्हाधिकारी राहूल कर्डीले, नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, तसेच पदाधिकारी आदीची उपस्थिती होती.

# हिंगोली नगर पालिकेचा प्लास्टीक मुक्तीसाठी पुढाकार

## पर्यावरणपूरक पिशव्यांचा वापर करण्याचे मुख्याधिकाऱ्यांचे आवाहन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ मे**

जागतिक स्तरावर सुरू असलेल्या प्लास्टिक प्रदूषण निर्मूलन मोहिमेअंतर्गत हिंगोली नगर परिषदेमार्फत मुख्याधिकारी तथा प्रशासक अरविंद मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली हिंगोली येथील भाजी व फळ विक्रेत्यांना एकल वापराच्या प्लास्टिकचा वापर न करण्याचे आवाहन करण्यात आले. विक्रेत्यांना पर्यावरणपूरक पिशव्या व साहित्याचा वापर करण्याचे महत्त्व पटवून देण्यात आले.

प्लास्टीक वापरामुळे पर्यावरणाला धोका निर्माण होत असून या पिशव्यामुळे नाल्या तुंबण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे नागरिकांनी प्लास्टीकमुक्तीसाठी नगर पालिकेला सहकार्य करण्याचे आवाहन नगर पालिका प्रशासनाने केले आहे.

हिंगोली नगर परिषद प्रशासकीय इमारतीतही नगर परिषदेचे सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी प्लास्टिकमुक्त कार्यालय व परिसर घडविण्यासाठी शपथ घेतली. प्लास्टिकचा वापर टाळून पर्यावरणपूरक पर्यायांचा अवलंब करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. यावेळी उपमुख्याधिकारी प्रकाश साबळे, प्रशासकीय अधीक्षक देवीसिंग ठाकूर, स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर, अभियंता राजेश पदमने, आवटे मॅडम, लेखापाल अनिकेत नाईक, संदीप घुगे, विनय साहू, शिवाजी घुगे, शेख जहीर, बाबुराव काळे, गोविंद चव्हाण, मनोज भुर्से, उमेश वर्मा,अशोक आठवले, अथर्व वर्मा, आकाश गायकवाड, रवी जोंधळे, कुणाल कांबळे आदी अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

नगर पालिकेच्यावतीने दरवर्षी मोठ्या प्रमाणावर पथकांमार्फत प्लास्टीक जप्त करण्यात येत आहे. या पथकांची स्थापना करून प्लास्टीक पिशव्या विक्रेते व वापरकर्त्यांवर दंडही आकारण्यात आला होता.

# २९ मे पासून विकसित कृषी संकल्प अभियानाला सुरूवात

## दररोज दोन तालुक्यातील तीन गावात आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ मे**

जिल्ह्यातील ९० गावांमध्ये विकसित कृषी संकल्प अभियानाला दि. २९ मेपासून प्रत्येक दिवशी दोन तालुक्यांतील प्रत्येकी तीन गावांमध्ये घेण्यात येणार आहे. दि. २९ मे, २०२५ रोजी कळमनुरी तालुक्यातील वारंगा फाटा, तोंडापूर व भोशी, सेनगाव तालुक्यातील साबलखेडा, हाताळा व ताकतोडा येथे, दि. ३० मे रोजी कळमनुरी तालुक्यातील आडा, म्हैसगव्हाण व रुपूर आणि सेनगाव तालुक्यातील कहाकर, जामठी व केंद्रा येथे, दि. ३१ मे रोजी कळमनुरी तालुक्यातील हिवरा, वरुड व जामगव्हाण तर सेनगाव तालुक्यातील सवना, पिंपरी व मोप, दि. १ जून रोजी कळमनुरी तालुक्यातील कांडली, बऊर व पवनमारी तर सेनगाव तालुक्यातील ब्राम्हणवाडा, माळसेलू व जयपूर, दि. २ जून रोजी कळमनुरी तालुक्यातील सिंदगी, सोडेगाव व वारंगा मसाई तर सेनगाव तालुक्यातील पुसेगाव, खुडज व तळणी येथे, दि. ३ जून रोजी औंढा नागनाथ तालुक्यातील शिरडशहापूर, काटोडा व नागेशवाडी तर सेनगाव तालुक्यातील भानखेडा, हट्टा व गणेशपूर येथे, दि. ४ जून रोजी औंढा नागनाथ तालुक्यातील सेंदुरसना, मार्डी व उमरा तर सेनगाव तालुक्यातील सुलदली, पानकन्हेरगाव व कोळसा येथे, दि. ५ जून रोजी औंढा नागनाथ तालुक्यातील आसोला, कोंडसी व वडद तर हिंगोली तालुक्यातील सावरखेडा, करवडी व पिंपळखुटा येथे, दि. ६ जून रोजी औंढा नागनाथ तालुक्यातील पोटा खुर्द, रांजाळा व तपोवन तर हिंगोली तालुक्यातील दातेगाव, राहोली खुर्द व राहोली बु. येथे, दि. ७ जून रोजी औंढा नागनाथ तालुक्यातील गवळेवाडी, सारंगवाडी व टाकळगव्हाण तर हिंगोली तालुक्यातील देवळगाव रमा, सवड व घोटा येथे, दि. ८ जून रोजी कळमनुरी तालुक्यातील डोंगरगावपुल, कामठा व घोडा तर हिंगोली तालुक्यातील आजेगाव, खरबी व इडोळी येथे, दि. ९ जून रोजी कळमनुरी तालुक्यातील चुंचा, फुटाना व चिखली तर हिंगोली तालुक्यातील बलसोंड, बासंबा व भिरडा येथे, दि. १० जून रोजी कळमनुरी तालुक्यातील रेडगाव, दिग्रस व दांडेगाव तर हिंगोली तालुक्यातील कलगाव, माळहिवरा व खंडाळा येथे, कळमनुरी तालुक्यातील कोंढूर, दिग्रस व चिंचोर्डी तर हिंगोली तालुक्यातील चिंचाळा, आडगाव व बोंडाळा येथे, दि. १२ जून रोजी कळमनुरी तालुक्यातील धानोरा, वाई व ढोलक्याची वाडी तर हिंगोली तालुक्यातील कन्हेरगाव, फाळेगाव व कानडखेडा बु. येथे घेण्यात येणार आहे.

या अभियानास ग्रामपंचायत सरपंच व सदस्य मंडळी, शेतकरी, महिला शेतकरी, ग्रामीण तरुण, कृषि सखी, महिला बचत गट आणि उद्योजक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख व वरिष्ठ वैज्ञानिक डॉ. पी. पी. शेळके यांनी केले आहे.

# आ. तान्हाजीराव मुटकुळे यांचेहस्ते घंटागाडीचे लोकार्पण

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ मे**

शहरानजीक असलेल्या मालवाडी ग्रामपंचायतीला १५ वित्त आयोगातून गावातील कचरा गोळा करण्यासाठी घंटागाडी खरेदी करण्यात आली. या घंटागाडीचे दि २६ मे रोजी भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांचेहस्ते लोकार्पण करण्यात आले.



शहरानजीक असलेल्या मालवाडी ग्रामपंचायतीला १५ वित्त आयोगातील निधीतून कचरा घंटा गाडी खरेदी करण्यात आली. ही ग्रामपंचायत शहराला लागून असल्यामुळे या भागात आता मोठ्या प्रमाणावर नवीन वस्त्या तयार झाल्या आहेत. गावाची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने या भागात स्वच्छता तसेच इतर सुविधा देण्यासाठी आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी सुरूवातीपासूनच पुढाकार घेतला आहे. दि २६ मे राजी येथील ग्रामपंचायतीने खरेदी केलेल्या घंटागाडीचे लोकार्पण आ. मुटकुळे यांनी केले. यावेळी गटविकास अधिकारी डी वाय गायकवाड, ग्रामविकास अधिकारी एस एम झिंजाडे, सरपंच सौ जया गौरव चव्हाण, उपसरपंच सौ वर्षा कानबाराव डांगे, सदस्य सौ नंदा सुभाष शिरफुले, अनिल हिवरे, ॲड शरद कोकाटे, दिगांबर बांगर, अजय जऱ्हाड, राधाबाई पुंडगे, एन बी आठवले आदींची उपस्थिती होती. यावेळी मालवाडी गावातील नागरिकांची उपस्थिती होती.



**हिंगोली– येथील पंचायत समितीच्या आवारात ग्रामीण भागातून विविध कामांसाठी दररोज मोठ्या संख्येने नागरिक येतात. परंतु सदरील नागरिक त्यांची वाहने आवारात अस्ताव्यस्तपणे उभी करीत असल्यामुळे पंचायत समितीसमोरील रस्त्यावर नेहमीच वाहतुकीची कोंडी होत आहे. वारंवार सांगूनही नागरिक अस्ताव्यस्तपणे वाहने उभी करीत आहेत. छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### औंढ्यात रसाच्या आंब्याची मोठी आवक



हिंगोली– सध्या उन्हाळा चालू असून बाजारात फळांचा राजा आंबा विक्रीस आला आहे. त्यामध्ये केशर आंबा, दशहरी आंबा, बदाम आंबा, नीलम आंबा आम्रपाली आंबा, लालबाग आंबा ,लंगडा आंबा, कलमी आंबा, गावरान आंबा हे आंबे विक्रीला आले आहेत.सध्या या आंब्याचे भाव सर्वसामान्याला परवडणारे आहेत. सध्या औंढा नागनाथ येथील बाजारपेठ मध्ये केशर आंबा १०० रुपये किलो तर दशहरी आंबा १२० रुपये तर लालबाग व बदाम आंबा १०० रुपये दिड किलो, नीलम आंबा ७०रुपये किलो, आम्रपाली आंबा ८० रुपये किलो ,लंगडा आंबा १०० रुपये किलो ,गावरान आंबा ८० रुपये किलो, गावरान गोटि आंबा १०० रुपये किलो, कलमी आंबा १०० रुपये किलो या दराने विक्री होत आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना हे भाव परवडणारे असल्याने बाजारपेठेमध्ये रसाचे आंबे खरेदी करताना ग्राहक दिसत आहेत. तसेच औंढा नागनाथ येथील बाजारपेठेमध्ये रसाच्या आंब्याची आवक मोठ्या प्रमाणात वाढली आहे. औंढा नागनाथ शहरातील डॉक्टर हेडगेवार चौक, स्व.मीनाताई ठाकरे चौक, मुख्य बाजारपेठ, बसस्थानक परिसरात रसाचे आंबे विक्रीला आले आहेत. आंब्याचे भाव कमी असल्याने ग्राहक एक किलो ते दोन किलो ते पाच किलो आंबे रसाळीसाठी घेऊन जात आहेत असे व्यापारी सांगत आहेत.

### प्रभाकरराव जोशी यांचे निधन



हिंगोली– शहरातील हेमराज गल्लीतील प्रभाकरराव गोविंदशास्त्री जोशी गुरुजी वय ८७ यांचे वृध्दापकाळाने दि २५ मे रोजी धिन झाले आहे. प्रभाकरराव जोशी यांनी कळमनुरी तालुक्यातील अनेक ग्रामीण भागात गुणवत्तापूर्ण अध्यापन केले. त्यांनी अनेक विद्यार्थी घडविण्याचे कार्य केले. एक हाडाचा शिक्षक म्हणून त्यांनी संपूर्ण कालावधीत अध्यापनाचे काम केले. सुस्वभावी आणि इतरांना मदत करणारे व्यक्तीमत्व म्हणून त्यांची सर्वत्र ओळख होती. सकल ब्राम्हण समाजाचे कार्यकर्ते अभय जोशी यांचे ते वडील होत. त्यांच्या पार्थिवावर दि २६ मे रोजी सकाळी कयाधू वैकुंठ धाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने ब्राम्हण समाजातील प्रतिष्ठीत नागरिक तसेच शिक्षकवृंद, नागरिक उपस्थित होते.

# नराधम पित्याचा १२ वर्षीय मुलीवर अत्याचार, गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ मे**

कळमनुरी तालुक्यातील आखाडा बाळापूर पोलिस ठाण्यांतर्गत पित्याने त्याच्या १२ वर्षीय मुलीवर अत्याचार केल्याची घटना घडली असून मुलगी गरोदर राहील्याने ही घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पित्याविरोधात आखाडा बाळापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आखाडा बाळापूर ठाण्यांतर्गत एका गावात पिडीत मुलगी तिच्या दोन्ही डोळ्यांनी अंध असलेल्या आईसोबत राहते. तिचे दोन भाऊ, वडील आणि आई एका खोलीत राहतात. वडील रोजमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. डिसेंबर महिन्यात पिडीत मुलगी कुटुंबासह घरात झोपली असताना तिच्या पित्यानेच तिच्यावर जबरदस्तीने अत्याचार केला. मात्र सदर मुलीने मारहाणीच्या भितीने सदर प्रकार कोणालाही सांगितला नाही. मात्र मागील काही दिवसात तिच्या पोटात दुखत असल्याने तिच्या कुटुंबियांनी तिला थेट नांदेड येथे शासकीय रूग्णालयात उपचारासाठी दाखल केले.मात्र तिच्या आरोग्य तपासणीत सदर मुलगी गरोदर असल्याचे दिसून आले. सदर प्रकरण वेगळेच दिसून येत असल्याने वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सदर मुलीकडे विचारणा केल्यानंतर तिने डॉक्टरांना घराचा पत्ता व इतर माहीती दिली.

त्यावरून वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तातडीने आखाडा बाळापूर पोलिसांना घटनेची माहीती दिली. पोलिस निरीक्षक विष्णुकांत गुठ्ठे, सहाय्यक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर बसवंते, महिला पोलिस उपनिरीक्षक श्रीदेवी वग्गे यांच्या पथकाने तातडीने नांदेड येथे जाऊन त्या मुलीचा जवाब नोंदविला. यावरून पोलिसांनी तातडीने पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी आरोपी पित्याला अटक केली आहे. याप्रकरणी पोलिसांनी अधिक चौकशी सुरू केली आहे.

# औंढा भाजप तालुकाध्यक्षपदी सर्जेराव दिंडे यांची निवड



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ मे**

औंढा शहरातील शासकीय विश्रामगृहामध्ये सकल धनगर समाजबांधवांच्या वतीने २५ मे रोजी सकाळी ११ वाजता बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीमध्ये भाजपा तालुकाध्यक्षपदी सर्जेराव दिंडे यांची निवड झाल्याने त्यांचा पेढा भरून व शाल श्रीफळ हार घालून समाज बांधवांच्यावतीने सत्कार करण्यात आला.यावेळी डॉ.विलास खरात, प्रा. साहेबराव देवकते, सर्जेराव दिंडे, लखन शिंदे, उमेश पोले, हरीश पोले, सुरेश कुंडगिर, गंगाधर पोले, नितीन पोले, बालासाहेब पोले, बंडू पोले, किरण पोले, श्रीमंत गडदे, दत्ता पोले, सुनील पोले, संतोष उफाड, सुरेश पोले, गोपाल बिरगड, राम पोले, ओम पोले, राहुल पोले, गजानन सातपुते यांच्यासह सकल धनगर समाजबांधव उपस्थित होता.

# वसमत नवीन बसस्थानक कामामध्ये गुणवत्तेची पोलखोल

## लोखंडी सळई न वापरता टाकले कॉँक्रीटचे बेड



**तभा वृत्त सेवा**
**वसमत, २६ मे**

वसमत जुने बसस्थानक पाडून त्या ठिकाणी नवीन बसस्थानक उभारण्यात येत आहे. या नवीन बस स्थानकाच्या बांधकामात अनियमितता असून काम दर्जाहीन होत असल्याबाबत सुरुवातीपासूनच बोंबाबोंब होत आहे. त्यातच सामान्य नागरिकांनी आणि बस प्रवाशांनी तालुक्याचे आ. राजू नवघरे यांच्याकडे तक्रारी केल्या. दोन दिवसांपूर्वी वसमत बस स्थानकाला नवीन बसेस मिळाल्याने त्या बसेसला हिरवा झेंडा दाखवण्यासाठी आमदार राजू नवघरे बस स्थानकात दाखल झाले आणि नवीन बसेस स्थानकाच्या कामाची पाहणी केली असता कामातील अनियमितता आणि गुणवत्ता अतिशय वाईट असल्याचे आमदारांच्या लक्षात आले त्यांनी तातडीने संबंधित बांधकाम गुत्तेदाराला याबाबत जाब विचारून तंबी सुद्धा दिली आणि बांधकाम थांबविण्याचा सूचना केल्या.

> पर्यायी बस स्थानक तयार करण्यात आलेल्या जागी एसटी महामंडळाला हिरकणी कक्ष तयार करण्याचा विसर पडला आहे. शासन एकीकडे महिलांसाठी एसटीच्या प्रवासात सवलत देश आहे तर दुसरीकडे लाडकी बहीण योजन. वसमत पर्यायी बस स्थानकात हिरकणी कक्ष तयार करण्याचा विसर म्हणजेच महिलांची सुरक्षितता आणि त्यांचा अवमान वसमत एसटी प्रशासन करत आहे का? असे प्रश्न उपस्थित होत आहे.

जोपर्यंत बांधकामात गुणवत्ता आणि सातत्य येत नाही तोपर्यंत पुढील काम करायचे नाही. त्यासाठी प्रत्यक्ष येऊन चर्चा करण्याच्या सूचनाही आमदार महोदयांनी संबंधित गुत्तेदाराला दिल्या. वास्तविक बांधकाम सुरू झाल्यापासून या ना त्या कारणाने बस स्थानकाचे बांधकाम वादाच्या भोवऱ्यात अडकले आहे. सुरुवातीला पाया खोदणे नंतर बस स्थानकाचा बेस तयार करताना त्यात खडक भरण्याऐवजी मोठ्या प्रमाणात काळ्या मातीचा वापर करण्यात आला. तदनंतर प्रत्यक्ष वाळू न वापरता माती मिश्रित चुरीचा वापर करण्यात आला. त्यानंतर प्रथम कॉँक्रीटचे बेड टाकताना लोखंडी सळ्यां न टाकता बेड करण्यात आले. बांधण्यात बेडला पाणी न टाकल्याने जागोजागी तडे सुद्धा गेले आहेत. त्यामुळे मुळात पायातच नवीन बस स्थानकाचे बांधकाम वादातीत ठरले त्यामुळे भविष्यात ही वसमत शहराच्या वैभवांवर टाकणारी इमारत वादग्रस्त ठरली आहे.

याबाबत प्रवाशांनी आणि नागरिकांनी शंका व्यक्त केल्याने वर्तमानपत्रातून बातम्या प्रसिद्ध झाल्या तरीही थातूरमातूर बांधकाम करून वेळ मारून नेण्याचा प्रकार थांबला नाही. त्यामुळे प्रत्यक्ष आमदार महोदयांनी सदरील बस स्थानकाचे बांधकाम थांबवण्याच्या सूचना संबंधित गुत्तेदाराला दिल्या आहेत. बेडमध्ये लोखंडी सगळ्यांचा वापर केला असता तर संबंधित कॉँक्रीट बेस पक्का झाला असता आणि बांधकाम मजबूत झाले असते पण गुत्तेदारांनी कुठल्याच लोखंडी सळ्याचा वापर न करता डायरेक्ट बेड टाकल्याने बेडला तडे गेले आहेत. आता या बांधकामाची भविष्यातील गुणवत्ता कशी राहील हे पाहणे रंजक ठरणार आहे.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com



बीडः गेल्या आठ दिवसापासून बीड जिल्ह्यामध्ये होत असलेल्या अवकाळी पावसाने मोठेनुकसान झाले असेले तरी जुन-जुलै मध्ये होणार जोराचा पाऊस आणि त्यानंतर खळखळनारे पाणी पण त्या पुर्वीच कपिलधार येथील धबधबा ओसंडून वाहत असल्याने पर्यटकांची मोठ्या प्रमाणात गर्दी दिसत आहे (छाया कृष्णा शिंदे)

# मस्साजोगची नदी पाण्याने खचाखच भरली

## नामच्या मोफत कामाचे कौतुक

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२६ मे**

नाम फाउंडेशन मार्फत मोफत मशीन आणि मोफत डिझेल देऊन येथील जवळपास तीन किलोमीटर अंतरावरील नदीमध्ये खोलीकरण आणि रुंदीकरण करण्यात आले. मे महिन्यात आलेल्या अवकाळी पावसाने ही नदी खचाखच भरली असून परिसरातील गावातील शेतकऱ्यांनी नामचे कौतुक केले आहे. आज जनआंदोलनाचे विश्वस्त ड. अजित एम. देशमुख यांनी या साठलेल्या पाण्याची पाहणी केली.

सलग तीन किलोमीटर पाणी साठणार असल्याने आता या गावातील शेतकऱ्यांना फार मोठी ऊर्जा मिळाली आहे. शेतकऱ्यांना दोन पिके बिनधास्त घेता येतील आणि प्रत्येक वर्षी या पाण्याचा फायदा घेता येईल. दोन दिवसात झालेल्या पावसाने अनेकांच्या विहिरीत पाणी आले असून अनेकांची बंद पडलेले पाण्याचे बोअर देखील चालू झाले आहेत, असेही ग्रामस्थांनी यावेळी सांगितले. नदीत साठलेले पाणी पाहण्यासाठी शेतकऱ्यांचा ओढा वाढला असून एक वेगळा आनंद परिसरातील शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर दिसत आहे. त्यामुळे नाम फाउंडेशनच्या कामाचे अनेक जण कौतुक करत आहेत. या गावातून जाणारी नदी खोलीकरण आणि रुंदीकरणाचे काम गेल्या दीड महिन्यापूर्वी नामने हाती घेतले होते.



# आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना कृषी शिक्षणाबरोबर शास्त्रीय शेतीचे धडे

## सोयाबीन, कांदा, राजमा बीजोत्पादन व अन्य भाजीपाला विद्यार्थी पिकवतात

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२६ मे**

बीड आदित्य कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना कृषी शिक्षणाबरोबर आधुनिक वैज्ञानिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती कशी करावी. यात जमिनीची योग्य निवड, सिंचन, खत आणि कीटकनाशकांचा योग्य वापर कसा करावा. तसेच पीक व्यवस्थापनाचे तंत्रज्ञान कसे असावे याचे प्रात्यक्षिक थेट शेतीत केले जाते. दरवर्षी येथे विद्यार्थी सोयाबीन, कांदा, राजमा बीजोत्पादन व अन्य भाजीपाला विद्यार्थी पिकवतात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी कृषी शिक्षणाबरोबर शास्त्रीय शेती प्रात्यक्षिकांचे धडे प्रगतशील भारताच्या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांना यशस्वी होण्यासाठी महत्वाचे असल्याने वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या संकल्पनेतून दरवर्षी सोयाबीन, कांदा, राजमा बीजोत्पादन व अन्य भाजीपाला शेती विद्यार्थी, प्राध्यापक पिकवतात. त्यातून विद्यार्थ्यांना कृषी क्षेत्रातील सखोल माहिती मिळते.



कृषी पदवीधर विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाचा भाग म्हणून प्रत्यक्ष शेती व त्यातही शास्त्रीय दृष्ट्या व्यवस्थापन करण्याचा अनुभव मिळतो. त्यामुळे आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थी पदवी घेऊन बाहेर पडल्यानंतर घरच्या शेतीत किंवा नोकरी व्यवसायात त्याचा चांगला उपयोग होतो. आदित्य कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सतीश कचरे, प्रा. श्याम भूतडा, प्रा. अमोल सानप, प्रा.जुबेर बागवान. प्रा ज्ञानेश्वर गव्हाणे. प्रा. सुधीर चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी हा अनुभव दरवर्षी घेतात.

# आता ठेवीदार थेट मंत्रालयावर धडकणार

## प्रा.सचिन उबाळे यांच्या नेतृत्वात झालेल्या बैठकीत हजारो ठेवीदारांचा निर्धार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२६ मे**

जिल्ह्यातील दिवाळखोरीत निघालेल्या बीडमधील मल्टिस्टेट, पतसंस्थांमध्ये अडकलेल्या ठेवी परत मिळण्यासंदर्भात शासन, प्रशासनाकडून आजपर्यंत कसलीच ठोस कारवाई करण्यात आली नाही. यामुळे आता थेट मुंबई येथील मंत्रालयावर धडकण्याचा निर्धार सर्वच ठेवीदारांनी केला. ठेवीदार कृती समितीचे राज्य समन्वयक तथा स्वाभिमान संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा.सचिन उबाळे यांच्या नेतृत्वाखाली गुरुवारी (दि.२२) बीडमध्ये झालेल्या बैठकीत ठेवीदारांनी मंत्रालयावर धडकण्याचा निर्धार केला. यावेळी अॅड.विशाल कदम यांनी मल्टिस्टेट, पतसंस्थांविरोधात छत्रपती संभाजीनगर खंडपीठात याचिका दाखल करणार असल्याचे सांगितले.

जिल्ह्यातील ज्ञानराधा मल्टीस्टेट, साईराम मल्टीस्टेट, राजस्थानी मल्टीस्टेट (पतसंस्था), जिजाऊ मल्टीस्टेट, शुभ कल्याण मल्टीस्टेट, मातोश्री अर्बन, लक्ष्मीमाता अर्बन, मराठवाडा अर्बन (माजलगाव)आर्थिक दिवाळखोरीत निघालेल्या आहेत. यामध्ये मराठवाड्यातील लाखों ठेवीदारांच्या ठेवी अडकल्या आहेत. ठेवीदारांच्या ठेवी परत मिळाव्या यासाठी ठेवीदार कृती समितीचे राज्य समन्वयक तथा स्वाभिमानी संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा. सचिन उबाळे यांच्या नेतृत्वाखाली वारंवार उपोषण, आंदोलने करण्यात आली. आंदोलनामुळे सुरेश कुटे यांच्यासह जवळपास सर्वच मल्टिस्टेटमधील आरोपींना अटक झाली असून ज्ञानराधावर एमपीआयडी प्रस्ताव थेट मुख्यमंत्र्यांनी मंजूर केला. ईडीने ज्ञानराधाची प्रॉपर्टी जप्त केली. ठेवीदारासंदर्भात न्यायालयीन लढाई सुरू आहे, मात्र पुढे काहीच झाले नाही ? यामुळे न्यायालयीन लढा तीव्र करण्यासाठी व आंदोलनाची पुढील दिशा ठरविण्यासाठी प्रा.सचिन उबाळे यांच्या नेतृत्वाखाली आज अमृत मंगल कार्यालयात ठेवीदारांची बैठक झाली. यावेळी मल्टिस्टेट, पतसंस्थाप्रकरणाचा तपास संथ गतीने सुरू असल्याने ठेवीदारांनी संताप व्यक्त केला. ईडीने ज्ञानराधाच्या जप्त केलेल्या प्रॉपर्टी एमपीआयडी प्रस्तावात जोडून त्याचा तात्काळ लिलाव करुन ठेवीदारांच्या ठेवी परत द्या अशी मागणी करण्यात आली. जुनमध्ये ठेवीदारांच्या वतीने छत्रपती संभाजीनगर खंडपीठात पुन्हा याचिका दाखल करण्याचा निर्णय घेण्यात आला. आता मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधण्यासाठी थेट मंत्रालयावर धडकण्याचा निर्धार ठेवीदारांनी आजच्या बैठकीत घेतला. बैठकीस जिल्ह्यासह मराठवाड्यातील ठेवीदारा हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.

# अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन-विनायक रत्नपारखी

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२६ मे**

अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती निमित्त माजलगाव भाजपा व जयंती उत्सव समितीच्या वतीने शहरात विविध कार्यक्रम घेण्यात येणार असून या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन माजलगाव भाजपा शहराचे शहराध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी केले आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी सोहळ्यानिमित भाजपा व संयोजक समितीच्या वतीने श्री सिद्धेश्वर विद्यालय भारत माता सभागृह येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन केले असून दि ३० मे रोजी समाजाप्रती कार्य करणाऱ्या ११ महिलांना अहिल्या रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. अहिल्यादेवी होळकर यांनी केलेले कार्यायाबद्दल निबंध स्पर्धा घेण्यात येणार आहे व निबंध स्पर्धेत सहभाग घेतलेल्या अकरा स्पर्धकांचे बक्षीस वितरण कार्यक्रम समारंभ होणार आहे. तसेच अहिल्यादेवी यांचे कार्य सर्वांपर्यंत पोहोचण्यासाठी चित्र प्रदर्शनीचे उद्घाटन करून चित्र प्रदर्शन होणार आहे. दिनांक २७ रोजी रोजी माजलगाव तालुक्यातील देवखेडा , येथील केदारेश्वर महादेवाच्या मंदिर परिसरात स्वच्छता अभियान राबवून या ठिकाणी आरती करण्यात येणार आहे. दि. ३० मे रोजी सायंकाळी या अहिल्यादेवी देवी होळकर यांचे कार्य सर्वांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रसिद्ध व्याख्याते अशोक बांगर यांचे व्याख्यान होणार आहे. पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्म त्रिशताब्दी निमित्त भव्य व्याख्यान व विविध कार्यक्रमास आपण सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन माजलगाव भाजपा शहराचे मंडल अध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी केले आहे.

# शिक्षक वाचन समृद्धी २०२५ हा उपक्रम राज्य पातळी पर्यंत पोचावा-अभिजीत जोंधळे

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२६ मे**

जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था अंबाजोगाई व शिक्षक मैत्री प्रतिष्ठान अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू करण्यात आलेल्या शिक्षक वाचन समृद्धी उपक्रम २०२५ हा उपक्रमाची चळवळ होऊन ती वाढत जाऊन राज्य पातळीपर्यंत पोचावी व समस्त महाराष्ट्राला वाचनाची आवड निर्माण व्हावी असे प्रतिपादन अभिजीत पुस्तकालयाचे संचालक व अंबाजोगाई तालुक्यातील वाचन चळवळीतील अग्रगण्य साहित्यिक अभिजीत जोंधळे यांनी उपक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी केले. यावेळी व्यासपीठावर अभिजित जोंधळे, महाराष्ट्र राज्य राजपत्रित संघटना, डायटचे अध्यक्ष डॉ योगेश सुरवसे, प्राचार्य डॉ इब्राहिम नदाफ, श्रीधर नागरगोजे हे होते.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे येथील संचालक राहुल रेखावार यांच्या प्रेरणेतून जागतिक पुस्तक दिनाच्या निमित्ताने जिल्हा शिक्षण प्रशिक्षण



संस्था अंबाजोगाई जिल्हा बीड व शिक्षक मैत्री प्रतिष्ठान अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षकांसाठी शिक्षक वाचन समृद्धी उपक्रम २०२५ हा अभिनव उपक्रम सुरू करण्यात आला आहे. यामध्ये राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद पुणे ,महाराष्ट्र यांनी निर्देशित केलेल्या ५१ शिक्षण विषयक पुस्तकांचा अभ्यास करून त्याचे सारांश रूप शिक्षकांनीच इतर शिक्षकांसमोर मांडणी करणे व त्याचा आपल्या शालेय व्यवस्थापनात व दैनंदिन अध्यापनात कसा उपयोग होईल याबाबत सविस्तर विवेचन करणे असे या कार्यक्रमाचे स्वरूप आहे. हा अभिनव उपक्रम जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अंबाजोगाई चे अधिव्याख्याता तथा महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी संघटना डायटचे राज्य अध्यक्ष डॉ योगेश सुरवसे यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आला आहे.जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे अधिव्याख्याता डॉ. योगेश सुरवसे व प्राचार्य डॉ. इब्राहिम नदाफ साहेब, त्याचबरोबर शिक्षक मैत्री प्रतिष्ठान ,अंबाजोगाई यांच्या अनमोल सहकार्य व बळावर संपूर्ण वर्षभर आयोजित करण्याचे ठरवण्यात आले आहे. या उपक्रमात पुस्तकाचे विश्लेषण सादर करणाऱ्या शिक्षकांना विशेष सन्मान चिन्ह देऊन गौरवण्यात येते.

# सौ.मुक्ता आर्दड मॅडम यांना 'शिक्षण रत्न पुरस्कार' प्रदान!

**सर्व स्तरातून होतोय अभिनंदनचा वर्षाव!**

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२६ मे**

एकता सेवाभावी संस्था, महाराष्ट्र यांच्या वतीने शैक्षणिक क्षेत्रातून शैक्षणिक कार्याच्या गौरवार्थ दिला जाणारा राष्ट्रीय शिक्षण रत्न पुरस्कार राज्याचे सहकार मंत्री ना.बाबासाहेब पाटील, शिक्षक आ. विक्रम काळे, मा.आ.रामरावजी वडकुते, प्रसिद्ध अभिनेत्री पवित्र रिश्ता फेम उषा नाडकर्णी, फिल्म अभिनेता अली खान एकता सेवाभावी संस्थेचे महाराष्ट्र अध्यक्ष अझहर खान या मान्यवरांच्या हस्ते महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या मराठवाडा महिला सचिव तथा श्री संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालयाच्या शिक्षिका सौ. मुक्ता दिगंबर आर्दड (मोटे) मॅडम यांना देऊन सन्मानित करण्यात आले. सदरील शिक्षक रत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल सौ मुक्ता आर्दड (मोटे) मॅडम यांच्यावर सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



मुंबई येथील एकता सेवाभावी संस्थेच्या वतीने दरवर्षी समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींचा पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला जातो. यावर्षी शैक्षणिक क्षेत्रातून दिला जाणाऱ्या राष्ट्रीय शिक्षण रत्न पुरस्कारासाठी महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या मराठवाडा महिला सचिव तथा राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या गेवराई तालुकाध्यक्षा तसेच श्री संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालयाच्या शिक्षिका सौ. मुक्ता दिगंबर आर्दड (मोटे) मॅडम यांनी शैक्षणिक सामाजिक क्षेत्रातील केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल व शिक्षण क्षेत्रातील विविध प्रश्न सोडविण्यासाठी दिलेला लढा आता पर्यंत केलेले विविध आंदोलन, गोरगरीब विद्यार्थ्यांना केलेली मदत या सर्व बाबींची दखल घेऊन जाहीर करण्यात आला होता. दरम्यान सदर पुरस्काराचे वितरण दि.२० मे २०२५ मंगळवार रोजी मुंबई मराठी पत्रकार भवन आझाद मैदान महानगरपालिका मार्ग मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या शानदार सोहळ्यात सहकार मंत्री ना.बाबासाहेब पाटील, मराठवाडा शिक्षक आमदार विक्रम बप्पा काळे, मा.आ.रामरावजी वडकुते, एकता सेवाभावी संस्थेचे महाराष्ट्र अध्यक्ष अझहर खान,प्रसिद्ध अभिनेत्री पवित्र रिश्ता फेम उषा नाडकर्णी, फिल्म अभिनेता अली खान या मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

# ३१ मे रोजी जन्मणाऱ्या मुलींच्या नावे पाच हजार रुपयांचे फिक्स डिपॉझिट करणार

## माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त स्तुत्य उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२६ मे**

दि. २६ जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने दि. ३१ मे रोजी उपजिल्हा रुग्णालय, गेवराई येथे जन्म घेणार्या मुलींच्या भवितव्यासाठी पाच हजार रुपयांचे फिक्सडिपॉझिट करण्यात येणार आहे. राष्ट्रवादी सोशल मिडीयाचे तालुकाध्यक्ष संदिप मडके आणि र.भ.अट्टल महाविद्यालय विकास समितीचे सदस्य दत्ताभाऊ पिसाळ यांनी अमरसिंह पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त गेल्या दोन वर्षांपासून या स्तुत्य उपक्रमाचे आयोजन केले आहे. दि. ३१ मे रोजी जन्मलेल्या मुलींच्या आईच्या नावाने प्रत्येकी पाच हजार रुपयांचे फिक्स डिपॉझिट करण्यात येणार आहे.राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने गेवराई तालुक्यात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रवादी सोशल मिडीयाचे तालुकाध्यक्ष संदिप मडके आणि र.भ. अट्टल महाविद्यालय विकास समितीचे सदस्य दत्ताभाऊ पिसाळ यांच्या वतीने बुधवार दि. ३१ मे रोजी उपजिल्हा रुग्णालय, गेवराई येथे जन्मलेल्या मुलींच्या आईच्या नावे पाच हजार रुपये शिवशारदा मल्टीस्टेट, गेवराई येथे फिक्स डिपॉझिट करण्यात येणार आहे. शुक्रवार दि. ३० मे रात्रौ १२ वाजल्या पासुन ते शनिवार दि. ३१ मे रात्रौ १२ वाजेपर्यंत या कालावधीत जन्मलेल्या मुलींच्या आईच्या नावाने पाच हजार रुपयांची मुदत ठेव विस वर्षाच्या मुदती करता ठेवण्यात येणार आहे. गेल्या दोन वर्षांपासून त्यांनी हा उपक्रम राबविला असून हे तिसरे वर्ष आहे.उपजिल्हा रुग्णालयाचे अधिक्षक यांना तसे लेखी कळविण्यात आले असुन उपजिल्हा रुग्णालयातील प्रमाणपत्राच्या आधारे फिक्त डिपॉझिटची पावती संबंधितांना दिली जाणार आहे. स्त्रीभृण हत्या आणि कमी झालेला मुलींचा जन्मदर या बाबी लक्षात घेता या उपक्रमाला महत्व प्राप्त झाले आहे. नेत्याचा वाढदिवस सामाजिक उपक्रमातुन साजरा करत त्यांना जन्मदिनाच्या शुभेच्छा देण्यात असल्याची माहिती संदिप मडके आणि दत्ता पिसाळ यांनी दिली.

# नाद-स्वर-चैतन्य संगीत अकादमीमध्ये सातवी शास्त्रीय संगीत सभा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२६ मे**

शहरातील सहयोग नगर भागीतल नाद-स्वर-चैतन्य संगीत अकादमीमध्ये सातवी शास्त्रीय संगीत सभा मोठ्या उत्साहात संपन्न झाली.

या संगीत सभेत हरीश नखाते यांचे स्वतंत्र तबला वादन व सुरंजन जायभाये आणि भक्ती जायभाये यांच्या शास्त्रीय गायनाने सुरुवात झाली. सभेमध्ये सुरुवातीला हरीश नखाते यांनी तबला वादनात ताल तीन ताल मध्ये घराणेदार कायदे, रेले, पारंपरिक बंदिशी व अतिशय तयारीचे वादन सादर केले. त्यानंतर सुरंजन जायभाये यांनी राग बागेश्रीने मैफिलीची सुरुवात केली. कु. भक्ती हीने घेई छंद मकरंद हे नाट्यगीत अतिशय ताकदीने सादर केले, पुढे गात असतांना भक्ती यांनी कुहु कुहु बोले कोयलीया, रुणु-झुणु रुणु-झुणु रे भ्रमरा. सुरंजन यांनी - कानडा राजा पंढरीचा अभंग, का करू सजनी ही प्रचलित ठुमरी गाऊन श्रोत्यांची मनं जिंकली, पुढे कृपाळु सज्जन तुम्ही संत जन या भैरवीने अगदी आनंदी वातावरणात मैफिलीचा समारोप झाला.तबल्यावर साथ संगत संचालक नरहरी दळे, हरीष नखाते यांनी केली. संवादिनीवर साथ सांगत अमेय बेहरे यांनी केली. पुढे होणार्या संगीत मैफिलीचा आस्वाद घ्यावा असे श्रोत्यांना आवाहन नाद स्वर चैतन्य संगीत अकादमीचे संचालक नरहरी दळे यांनी केले आहे.

